# कार्यक्रम अंदाजपत्रक

२०१७-२०१८

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

# अनुक्रमणिका

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग


| प्रकरण | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | समग्र कार्यक्रम | २ |
| ३. | कार्यक्रम– | |
| | (१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (आस्थापना) | ८ |
| | (२) ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम | १२ |
| | (३) ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम | ३९ |
| | (४) नागरी पाणी पुरवठा, मलनिःस्सारण व स्वच्छता कार्यक्रम | ४२ |
| | (५) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | ५६ |

## प्रस्तावना–

राज्यात सर्व शहरांना व गावांना स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवठ्याचा कार्यक्रम परिणामकारकरित्या राबविण्यासाठी शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. शाकानि-१०९५/सीआर-२८९/१८ (रवका), दिनांक ९ नोव्हेंबर १९९५ अन्वये "पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग" या स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आलेली आहे. सन १९९७-९८ या आर्थिक वर्षापासून या विभागाचे स्वतंत्र कार्यक्रम अंदाजपत्रक प्रकाशित करण्यात येत आहे.

२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे सन २०१७-२०१८ चे कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये खालील पाच प्रकरणांचा समावेश केला आहे.

(१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (आस्थापना)

(२) ग्रामीण पाणी पुरवठा

(३) ग्रामीण स्वच्छता

(४) नागरी पाणी पुरवठा, मलनिःसारण व स्वच्छता कार्यक्रम;

(५) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा.

३. कार्यक्रम अंदाजपत्रक म्हणजे मूल्यमापन अहवाल नव्हे. तरी पण् पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून कार्यान्वित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचे स्वरूप लक्षात घेऊन उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे सर्व कार्यक्रमांची अद्ययावत माहिती प्रकाशनात देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

# समग्र कार्यक्रम

**१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग :-**

संपूर्ण महाराष्ट्र स्वच्छ बनविण्यासाठी "घरात शौचालय दारात पाणी" हे उद्दिष्ट साध्य करण्याचा निर्धार शासनाने केलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत लोकसहभागातून गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देवून किफायतशीर खर्चात आणि पर्यावरणात्मकदृष्ट्या शाश्वत पद्धतीने ग्रामीण व नागरी भागातील रहिवाश्यांना सुरक्षित पिण्याचे पाणी व स्वच्छता सेवा पुरविणे आणि पाण्याच्या पुनर्भरण उपाययोजनांवर भर देण्यात आलेला आहे.

१.१ पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखाली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा ही क्षेत्रीय कार्यालये कार्यरत आहेत. प्रधान सचिव विभागाचे प्रमुख आहेत. त्याचे मदतीस एक विशेष कार्य अधिकारी, चार उपसचिव तसेच अवर सचिव आणि कक्ष अधिकारी असे वर्ग-१ आणि वर्ग-२ चे राजपत्रित अधिकारी व अन्य कर्मचारी आहेत.

१.२ पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची कार्ये स्थूलमानाने पुढीलप्रमाणे आहेत–

(१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (खुद्द) ची आस्थापना, विभागाच्या नियंत्रणाखालील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेची व जिल्हा परिषदांच्या पाणी पुरवठा विभागाची आस्थापना.

(२) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमांबाबत धोरण ठरविणे, तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाची अंमलबजावणी.

(३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वैधानिक, घटनात्मक, धोरणविषयक आणि आस्थापना संबंधीच्या प्रकरणांबाबत कार्यवाही करणे; आणि

(४) पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रम राबविण्यासंबंधात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषदा आणि भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, यांच्या कामाचे समन्वयन व संनियंत्रण करणे.

**२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण :–**

राज्यातील पाणी पुरवठा कार्यक्रमाचे योजनाबद्ध रितीने नियोजन, जलद विकास व उचित संनियंत्रण करण्याच्या दृष्टीने औपचारिकरित्या सन १९७६ मध्ये अधिनियमान्वये महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाची स्थापना करण्यात आली. राज्यातील पाणी पुरवठा व मलनिःसारण क्षेत्रातील योजनासंदर्भात संकल्पनेपासून प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत तसेच आर्थिक नियोजन आणि योजनांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती या सर्व बाबींमध्ये संपूर्णतः महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा एकात्मिक सहभाग होता. प्रस्तुत योजना राबविण्याप्रित्यर्थ योजनेवरील आस्थापना, अवजारे आणि अंमलबजावणीच्या खर्चापोटी सर्वसाधारणतः १७.५० टक्के एवढी रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास मिळत असे. यातून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा दैनंदिन खर्च/वेतन व अन्य प्रशासकीय खर्च भागविला जात असे. सन १९९७ मध्ये उपरोक्त अधिनियमांत सुधारणा करण्यात येऊन, "महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाचे" **महाराष्ट्र जीवन प्राधिकरण** असे नामकरण करण्यात आले. तथापि ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार शासनाच्या विविध कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजना राबविण्याचे संपूर्ण अधिकार शासनाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना बहाल केल्यामुळे आणि बव्हंशी स्थानिक स्वराज्य संस्थांचा कल योजना स्वतः राबविण्याकडे असल्याने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला मिळणारा महसूल कमी झाला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उत्पन्नवाढीच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचारी संख्येत एकूण ५१३७ पैकी १५२१ एवढे अभियंते आहेत. त्यांच्यापैकी बहुतेकांना किमान २० वर्षांचा प्रत्यक्ष कामाचा/अंमलबजावणीचा अनुभव आहे. यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही पाणी पुरवठा व मलनिःसारण क्षेत्रातील अभियांत्रिकीदृष्ट्या तंत्रज्ञान संपन्न व अनुभव संपन्न अभियंते असलेली देशातील अग्रगण्य संस्था आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आतापर्यंत ४१५ नागरी योजना पूर्ण केल्या असून, ११३०८ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांदेखील पूर्ण केल्या आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत ३७ नागरी आणि १७७ ग्रामीण अशी एकूण २१४ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. २४ नागरी पाणी पुरवठा केंद्रे व ३० ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती करण्यात येत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उपरोक्त २४ नागरी पाणी पुरवठा केंद्रांपैकी १७ केंद्रासंदर्भात प्रस्तुत सुधारणांची कामे हाती घेण्यात आली आहेत. प्रस्तुत सुधारणा कामांच्या दृष्टीकोनातून अत्यावश्यक अत्याधुनिक तंत्रज्ञान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध व्हावे यादृष्टीने पाणी पुरवठा क्षेत्रातील सिंगापूर येथील पब्लीक युटीलिटी बोर्ड आणि मलेशियातील रॅनहिल या अग्रगण्य संस्थांशी तंत्रज्ञानाच्या देवाण-घेवाणीबाबत सामंजस्य करार केले आहेत. प्रस्तुत सामंजस्य करारानुसार या संस्थांकडील विना महसूल पाण्याचे प्रमाण कमी करणे व **"गळती संशोधन"** या दोन्ही बाबींशी संलग्न असे अद्ययावत तंत्रज्ञान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला उपलब्ध होत असून, याचा फायदा प्राधिकरणामार्फत राज्यातील इतर स्थानिक स्वराज्य संस्थांनाही होऊ शकेल.

**२.१ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पुनर्रचना :–**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची सध्याच्या व्हर्टीकल संरचनेत मुख्य अभियंत्यांची कार्यालये ठाणे, पुणे व नाशिक येथे स्थित असल्यामुळे क्षेत्रिय कार्यालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या व नागरी पाणी पुरवठा केंद्रांच्या कामाच्या संदर्भात स्थानिक पातळीवरील विधानमंडळ सदस्य व नागरिक, पदाधिकारी व अधिकारी यांना मुख्य अभियंता यांना भेटण्यासाठी ठाणे, पुणे व नाशिक येथे यावे लागते. त्यामुळे व्हर्टीकल्सची रचना अभिप्रेत असलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे कामे करण्यास अडचणी येत आहेत. एखाद्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नेमक्या कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावयाचा याबाबत सर्वसामान्य नागरिक व पदाधिकारी यांच्यामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. व्हर्टीकल संरचनेत सद्यःस्थितीत येत असलेल्या अनुभवानुसार व लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्था व मा. मंत्री महोदयांकडून होत असलेल्या मागणीनुसार पूर्वीप्रमाणेच प्रादेशिक मुख्य अभियंता स्वरूपाची संरचना अस्तित्वात आणण्याबाबतची बाब विचाराधिन होती. त्या अनुषंगाने सध्याची पुनर्रचना संपुष्टात आणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दिनांक २९ एप्रिल २०१५ च्या आदेशानुसार ६ प्रादेशिक विभाग, मुख्य अभियंता कार्यालये दिनांक १ मे २०१५ पासून अस्तित्वात आणण्यात आली आहेत.

**२.२.१ मध्यवर्ती कार्यालयः–**

मध्यवर्ती कार्यालयामध्ये सदस्य सचिव कार्यालय व त्या अंतर्गत संचालक (तांत्रिक), मुख्य प्रशासकीय अधिकारी, संचालक (वित्त), मुख्य अभियंता (म. नि.) अधीक्षक अभियंता, मुख्यालय/समन्वय/गुणवत्ता परीक्षण पथक/मध्यवर्ती नियोजन संनियंत्रण व संकल्पचित्र कक्ष व अधीक्षक अभियंता (यांत्रिकी-ठाणे व नागपूर) कार्यकारी अभियंता, गुणवता परीक्षण पथक (यांत्रिकी-पुणे, औरंगाबाद व नागपूर) ही कार्यालये समाविष्ट आहेत.

**२.२.२ क्षेत्रिय कार्यालये :–**

प्राधिकरणाच्या मुख्य अभियंत्यांच्या अधिपत्याखाली असलेले मंडळ/विभाग/उप विभाग यांचा गोषवारा खालीलप्रमाणे.

| महसूल प्रादेशिक विभाग | कार्यालये | | | | एकूण कार्यालये |
|---|---|---|---|---|---|
| | मुख्य अभियंता | मंडळ | विभाग | उपविभाग | |
| प्रादेशिक विभाग, ठाणे | १ | २ | ७ | २२ | ३२ |
| प्रादेशिक विभाग, पुणे | १ | २ | ७ | ३१ | ४१ |
| प्रादेशिक विभाग, नाशिक | १ | २ | ५ | १९ | २७ |
| प्रादेशिक विभाग, औरंगाबाद | १ | ३ | ७ | २० | ३१ |
| प्रादेशिक विभाग, अमरावती | १ | २ | ६ | २१ | ३० |
| प्रादेशिक विभाग, नागपूर | १ | २ | ५ | १५ | २३ |
| एकूण ... | ६ | १३ | ३७ | १२८ | १८४ |

**मित्रा : महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था, मित्रा, नाशिक :–**

(महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक मजीप्रा-२०१२/प्र. क्र. १४३/पापु-२३, दिनांक २१-५-२०१२ चे आदेशान्वये (संशोधन व प्रशिक्षण केंद्र, नाशिक) स्वायत्त संस्था करण्यात आलेली आहे.)

**जोडपत्र—२ (क)**

सन २०१७-२०१८ या वर्षातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील पदांचा गोषवारा.

| वर्ग | मंजूर पदे | | एकूण | कार्यरत कर्मचारी | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | म.जी.प्रा. | जि. प. | | म.जी.प्रा. | जि. प. | इतर प्रतिनियुक्ती | |
| अ | ३९३ | २४० | ६३३ | २४८ | १९० | ४५ | ४८३ |
| ब | ११५५ | ... | ११५५ | ८१८ | १२० | १५४ | १०९२ |
| क | २३२४ | ... | २३२४ | ११९० | २४ | ११ | १२२५ |
| ड | ९३८ | ... | ९३८ | ४८३ | १४ | ७ | ५०४ |
| एकूण | ४८१० | २४० | ५०५० | २७३९ | ३४८ | २१७ | ३३०४ |
| | | | | | | रूपांतरीत स्थायी/अस्थायी आस्थापना | १८३३ |
| | | | | | | एकूण | ५१३७ |

## ANNEXURE-II

**Statement Showing the Organisational Set up of Field Staff the Office During 2017-2018 (dated 1-4-2017 to 31-3-2018)**

| Sr. No. | Zone of the Chief Engineer | | No. of Circles | No. of Works Dn. | No. of Works Sub Dn. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 4 | 5 |
| 1. | Chief Engineer, Aurangabad | 1 | 3 | 7 | 20 |
| 2. | Chief Engineer, Nagpur | 1 | 2 | 5 | 15 |
| 3. | Chief Engineer, Nashik | 1 | 2 | 5 | 19 |
| 4. | Chief Engineer, Pune | 1 | 2 | 7 | 31 |
| 5. | Chief Engineer, Thane | 1 | 2 | 7 | 22 |
| 6. | Chief Engineer, Amravati | 1 | 2 | 6 | 21 |
| | Total | 6 | 13 | 37 | 128 |

**STATEMENT 2 (B)**

| | | |
|---|---|---|
| 1. | Central Office, CIDCO Bhavan. | 1 |
| 2. | Superintending Engineer (H. Q.) | 1 |
| 3. | Superintending Engineer C.P.D.M. Circle. | 1 |
| 4. | Superintending Engineer (Co-ordination) | 1 |
| 5. | Superintending Engineer (Mech.) | 2 |
| 6. | Superintending Engineer (Quality Control) | 1 |
| 7. | Executive Engineer (Mech.) | 1 |
| 8. | Executive Engineer (Quality Control) | 3 |
| 9. | Research and Training Center, Nashik. | 1 |
| 10. | Internal Audit Center. | 6 |
| 11. | Zonal Office. | 5 |

**STATEMENT 2 (B)**

| Class | Sanction Staff | | Total | Present Staff | | | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | MJP | Z. P. | | MJP | Z. P. | Other deputation | |
| A | 393 | 240 | 633 | 248 | 190 | 45 | 483 |
| B | 1155 | ... | 1155 | 818 | 120 | 154 | 1092 |
| C | 2324 | ... | 2324 | 1190 | 24 | 11 | 1225 |
| D | 938 | ... | 938 | 483 | 14 | 7 | 504 |
| Total | **4810** | **240** | **5050** | **2739** | **348** | **217** | **3304** |
| | | | | Permanents/Temporary Estt. | | | **1833** |
| | | | | | Total | | 5137 |

**ANNEXURE—II (A)**

**Statement Showing the Organizational set up of fielded Staff the office during 2017—2018 (dated 1-4-2017 To 31-3-2018)**

**MJP's Offices**

**1. Field Offices**

| Section | Offices | | | | Total Offices |
|---|---|---|---|---|---|
| | Chief Engineer | Circle | Division | Sub Divisions | |
| Chief Engineer, Thane | 1 | 2 | 7 | 22 | 32 |
| Chief Engineer, Pune | 1 | 2 | 7 | 31 | 41 |
| Chief Engineer, Nashik | 1 | 2 | 5 | 19 | 27 |
| Chief Engineer, Aurangabad | 1 | 3 | 7 | 20 | 31 |
| Chief Engineer, Amravati | 1 | 2 | 6 | 21 | 30 |
| Chief Engineer, Nagpur | 1 | 2 | 5 | 15 | 23 |
| **Total** | **6** | **13** | **37** | **128** | **184** |

**ANNEXURE—II (B)**

**Meetra :—**Maharashtra Environmental Engineering Training and Research Academy Nashik (Vide Govt. Resolution No. MJP/2012/CR-143/PP-23 dated 21-5-2012 Govt. declared Meetra as a Independent organization under the control of Govt. Of Maharashtra)

**ANNEXURE—II (C)**

| Class | Sanction Staff | | Total | Present Staff | | | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | MJP | Z. P. | | MJP | Z. P. | Other deputation | |
| A | 393 | 240 | 633 | 248 | 190 | 45 | 483 |
| B | 1155 | ... | 1155 | 818 | 120 | 154 | 1092 |
| C | 2324 | ... | 2324 | 1190 | 24 | 11 | 1225 |
| D | 938 | ... | 938 | 483 | 14 | 7 | 504 |
| Total | **4810** | **240** | **5050** | **2739** | **348** | **217** | **3304** |
| | | | | Permanents/Temporary Estt. | | | **1833** |
| | | | | | Total | | 5137 |

**३. पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रम :–**

१. "पिण्याचे पाणी" ही लोकांची मुलभूत गरज आहे, हे लक्षात घेऊन पेयजल पुरवठ्यास राज्य शासनाने तसेच केंद्र शासनानेही प्राधान्य दिले आहे.

२. राज्य शासनाच्या सुधारित धोरणानुसार, सन २०००-०१ पासून पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रम हा मागणी आधारित व समूहसहभाग या तत्वावर राबविला जातो.

३. आर्थिक वर्ष सन २००९-२०१० पासून राज्यात पाणी पुरवठा योजनांसाठी केंद्र शासन पुरस्कृत "राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (National Rural Drinking Water Programme-NRDWP)" राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्याकरीता मंजूर निधी व गत काही वर्षातील मंजूर पाणी पुरवठा योजनांचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले की, गत तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीतील रखडलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांपैकी बहुतांश योजना लोकवर्गणी अभावी व लोकवर्गणीशी निगडीत ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या प्रश्नांमुळे रखडलेल्या आहेत. त्यामुळे दिनांक ९ जुलै २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारण्यात येत असलेली लोकवर्गणी पूर्णतः रद्द करण्यात आली आहे. तथापि, या शासन निर्णयापूर्वी ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी पूर्णतः अथवा अंशतः लोकवर्गणीची रक्कम जमा करण्यात आलेली असेल तर अशी जमा केलेली लोकवर्गणीची रक्कम संबंधित संस्थेस अथवा अंमलबजावणी यंत्रणेस परत केली जाणार नाही व अशा पाणीपुरवठा योजनांमधील उर्वरित लोकवर्गणीची तरतूद पाणी पुरवठा योजनांच्या किंमतीमध्ये समाविष्ट करण्यात येईल, अशी तरतूद च्या शासन निर्णयात करण्यात आलेली आहे.

४. ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमांतर्गत (१) सर्वसाधारण योजना, (२) मागासवर्गीयांसाठी विशेष घटक योजना, आणि (३) आदिवासी भागासाठी आदिवासी उपयोजना, या प्रमाणे राज्य वार्षिक योजनेत जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेनुसार स्वतंत्र तरतूद करण्यात येते.

५. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत नळ योजना (खास उपाय), साध्या विहिरी व विंधण विहिरी या उपाययोजना घेण्यात येतात. उच्च क्षमतेच्या विंधण विहिरीवर वीज पंप बसवून लघु नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात येतात. ज्या ठिकाणी साधी विहिर अथवा विंधण विहीरीव्दारे पाणी पुरवठा करणे शक्य नसते, अशा गावांसाठी नळ पाणीपुरवठा योजना राबविली जाते.

६. दिनांक ९ जुलै, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रियेत आमुलाग्र बदल करण्यात आले असून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणी, त्रयस्थ तांत्रिक परीक्षण व देखभाल दुरुस्तीचे सुधारित निर्देश खालीलप्रमाणे विनिर्दिष्ट करण्यात आले आहेत.

**६.१ तांत्रिक मान्यतेचे अधिकार**

| अनु-क्रमांक | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | तांत्रिक मान्यतेचे अधिकार | | |
|---|---|---|---|---|
| | | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| १. | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु. २.०० कोटीपर्यंत | रु. २.०० कोटी ते रु. ७.५० कोटी | रु. ७.५० कोटीवरील सर्व |
| २. | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु. २.०० कोटीपर्यंत | रु. २.०० कोटी ते रु. ७.५० कोटी | रु. ७.५० कोटीवरील सर्व |

### ६.२ प्रशासकीय मान्यतेचे अधिकार

| अनु-क्रमांक | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | प्रशासकीय मान्यतेचे अधिकार (दरडोई खर्चाच्या निकषात बसणाऱ्या योजनांसाठी) | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्रामसभा | जिल्हा जल व्यवस्थापन समिती, जिल्हा परिषद | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (शासन) |
| १. | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु. ५०.०० लाखापर्यंत | रु. ५०.०० लाख ते रु. ७.५० कोटी | रु. ७.५० कोटीवरील सर्व |
| २. | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | — | रु. ७.५० कोटीपर्यंत | रु. ७.५० कोटीवरील सर्व |

### ६.३ अंमलबजावणीचे अधिकार

| अनु-क्रमांक | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | अंमलबजावणीचे अधिकार | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती | जिल्हा परिषद | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| १. | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु. २.०० कोटीपर्यंत | रु. २.०० कोटी ते रु. ७.५० कोटी | रु. ७.५० कोटीवरील सर्व |
| २. | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | — | रु. ७.५० कोटीपर्यंत | रु. ७.५० कोटीवरील सर्व |

(जिल्हा परिषदेस रु. ५.०० कोटी ते रु. ७.५० कोटीपर्यंतच्या योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करावयाची असल्यास जिल्हा परिषदेने त्याबाबतचा ठराव करणे आवश्यक राहील.)

### ६.४ त्रयस्थ तांत्रिक परीक्षण

सर्व प्रकारच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्रयस्थ तांत्रिक परीक्षणाबाबतचे सविस्तर निर्देश शासनामार्फत दिनांक १५ जून २०१५ च्या शासन निर्णयान्वये पारीत करण्यात आले आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्यासाठी शासकीय पदवी/पदविका अभियांत्रिकी महाविद्यालये व शासकीय आय. आय. टी. संस्था यांना मुभा देण्यात आलेली आहे. या निर्णयाद्वारे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे दोन टप्प्यावर त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्याचे बंधन घालण्यात आले आहे. त्रयस्थ तांत्रिक परीक्षणामुळे ग्रामीण पाणी पुरवठा योजना विहित मुदतीत, निश्चित केलेल्या तपशिलानुसार पूर्ण होणे अभिप्रेत आहे.

### ६.५ देखभाल दुरुस्ती

ग्रामीण पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर ती योजना किमान एक वर्ष चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक करण्यात आले असून, संबंधित कंत्राटदारामार्फत किमान तीन ते पाच वर्षांच्या कालावधीसाठी योजनेची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी करारनामा करण्याची मुभा अंमलबजावणी यंत्रणांना देण्यात आली आहे.

७. पाणी पुरवठा योजनांचे स्त्रोत बळकटीकरणासाठी राज्यात **"शिवकालीन पाणी साठवण योजना"** राबविण्यात येत आहे.

८. ग्रामीण व नागरी पाणी पुरवठ्याच्या नियमित कार्यक्रमाशिवाय, टंचाई परिस्थितीत पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी अनेक कायम, निमकायम व तात्पुरत्या उपाययोजना घेण्यात येतात.

९. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या धोरणानुसार योजनेची निवड, आखणी व अंमलबजावणी ही संबंधीत गावाच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने करावयाची असून, योजनेच्या देखभाल दुरुस्तीवरील १०० टक्के खर्च संबंधित लाभार्थ्यांनी करावयाचा आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीमधील शासन यंत्रणेचा सहभाग हा सहाय्यकर्त्याचा राहणार आहे. त्यामुळे दिनांक १७ ऑक्टोबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना पारीत करण्यात आल्या आहेत. या शासन निर्णयानुसार देखभाल दुरुस्तीसाठी खालील बाबींचा अवलंब करण्याची मुभा योजना अंमलबजावणी यंत्रणांना देण्यात आली आहे—

- ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती करण्याची मुख्य जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था/अंमलबजावणी यंत्रणांची आहे.
- ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी शासन स्तरावरुन दरवर्षी देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान वितरीत करण्यात येते.
- ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती सुरळीतपणे न होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे योजना पूर्णत्वानंतर योजना चालविण्यासाठी दरवर्षी किती रकमेची आवश्यकता आहे, याचा आर्थिक ताळेबंद स्थानिक स्वराज्य संस्थांकडे/अंमलबजावणी यंत्रणांकडे नाही. त्यामुळे दरवर्षी किती पाणीपट्टी आकारण्यात यावी, याचे नियोजन नाही. (आकारण्यात येणारी पाणीपट्टी ही आवश्यकतेपेक्षा फारच कमी आहे) तसेच आकारण्यात येत असलेल्या पाणीपट्टीची वसुली देखील फार कमी आहे.
- दिनांक १७ ऑक्टोबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्ती प्रक्रियेत आमुलाग्र बदल करण्यात आले असून, या संदर्भातील दिनांक १७ ऑगस्ट २००९ व दिनांक २० एप्रिल २०१२ रोजीचे शासन निर्णय रद्द करण्यात आले आहेत.

* दिनांक १७ ऑक्टोबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयातील महत्वाच्या तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत—

(१) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल-दुरुस्ती करण्यासाठी पारित केलेल्या सूचना अंमलबजावणी यंत्रणांना बंधनकारक नसून, त्या मार्गदर्शक स्वरुपाच्या ठेवण्यात आल्या आहेत. ग्राम पाणी पुरवठा योजनांच्या दुखभाल-दुरुस्तीची मुख्य जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणांची/समित्यांची असल्याने या यंत्रणा/समित्या त्यांची स्वतंत्र देखभाल-दुरुस्तीची प्रक्रिया राबवू शकतात.

(२) ग्राम पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर किमान एक वर्ष ही योजना चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक करण्यात आले आहे.

(३) योजना हस्तांतरित झाल्यानंतर योजनेच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी योजना हस्तांतरित करून घेणाऱ्या यंत्रणांवर सोपविण्यात आली आहे.

(४) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद स्तरावर स्थापन केलेल्या जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीमध्ये शासनाकडून देय असलेल्या देखभाल-दुरुस्ती निधीचे वितरण सर्व जिल्हा परिषदांना मंजूर वार्षिक कृती आराखड्याच्या रकमेच्या प्रमाणात थेट करण्याचे निश्चित केले. (यापूर्वी जिल्हापरिषदांकडील मागणीनुसार निधीचे वितरण केले जात होते.)

(५) जिल्हा देखभाल-दुरुस्ती निधीमध्ये जिल्हा परिषदांनी त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या किमान २० टक्के रक्कम जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ही २० टक्के रक्कम भरण्यासाठी पिण्याच्या पाण्यावरील पाणीपट्टी विचारात घेता येणार नाही.

(६) जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे नियंत्रण ठेवण्यात आले आहे.

(७) योजनांची देखभाल-दुरुस्ती नियमितपणे होण्यासाठी व स्थानिक पातळीवर होण्यासाठी यंत्रणा/समित्यांकडील कर्मचाऱ्यांना व अधिकृत नळजोडणीकारांना प्रशिक्षण देण्याचे निश्चित केले आहे.

(८) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल-दुरुस्ती खाजगी यंत्रणा/कंत्राटदारांकडून करून घेण्यासही काही अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे.

(९) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीकरिता पुरेसा निधी उपलब्ध होण्यासाठी व देखभाल-दुरुस्तीकडे काटेकोर लक्ष देता यावे यासाठी देखभाल-दुरुस्तीचा स्वतंत्र अर्थसंकल्प तयार करण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे.

(१०) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीकरिता निधी वितरीत करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

(११) दिनांक १७ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेले देखभाल-दुरुस्तीच्या निधी वितरणाचे निकष रद्द करण्यात आले असून, जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीमध्ये प्राधान्यक्रम ठरवून देखभाल-दुरुस्तीची कामे हाती घेण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात आले आहेत.

(१२) दिनांक २० एप्रिल २०१२ च्या शासन निर्णयान्वये तयार केलेल्या योजना नुतनीकरण निधीची तरतूद रद्द करण्यात आली असून, योजना नुतनीकरण निधीमध्ये उपलब्ध असलेला सर्व निधी जिल्हा देखभाल-दुरुस्ती निधीमध्ये वर्ग करण्याच्या सूचना सर्व संबंधीतांना देण्यात आल्या आहेत.

(१३) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी दिनांक १७-१०-२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांना दिनांक १० मार्च २०१५ रोजी शुद्धीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक १७ ऑक्टोबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयातून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सूट देण्यात आली असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाला देखभाल-दुरूस्ती प्रोत्साहन अनुदानाची रक्कम शासन स्तरावरून थेट वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

१०. पाणी पुरवठा योजनांसाठी राज्य तसेच केंद्र शासनाच्या निधीव्यतिरिक्त हुडको, नाबार्ड व आयुर्विमा महामंडळाकडून कर्ज आणि कर्जरोख्याद्वारे निधी उपलब्ध करण्यात येतो. तसेच जागतिक बँक, आणि बाह्य देशांच्या अर्थसहाय्याने ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता प्रकल्प राबविण्यात येतात.

११. राज्यात सर्व ३४ ग्रामीण जिल्ह्यात केंद्र शासनाच्या अर्थसहाय्याने स्वच्छ भारत मिशन कार्यक्रम लागू करण्यात आला आहे.

१२. राज्यात सन २०००-२००१ पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे.

१३. नागरी भागात सन २००२-२००३ या वर्षापासून संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे.

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय (आस्थापना)

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील (खुद्द) पदांचा आढावा दिनांक ४ सप्टेंबर २००२ च्या शासन निर्णयाअन्वये निश्चित केला असून, विभागातील एकूण १६१ पदांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यानंतर विभागाच्या कामकाजात झालेली वाढ विचारात घेऊन, दिनांक २२ मार्च २०१२ च्या शासन निर्णयान्वये २५ नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत. तसेच जागतिक बँक अर्थसहाय्यित जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत निर्माण करण्यात आलेली परंतु विभागाच्या आकृतीबंधामध्ये समाविष्ट नसलेली ३ अस्थायी पदे, दिनांक २३ सप्टेंबर २०१४ च्या शासन निर्णयान्वये विभागाच्या मंजूर आकृतीबंधामध्ये समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या विभागाचे प्रमुख प्रधान सचिव हे पद भारतीय प्रशासन सेवेतून भरण्यात येते. या विभागाकरीता ४ उपसचिवांची पदे मंजूर असून, त्यापैकी १ पद भारतीय प्रशासन सेवेतून भरण्यात येते. या व्यतिरिक्त, मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकाऱ्याचे १ पद मंजूर असून हे पद महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील मुख्य अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्ती करून भरण्यात येते. विभागात अवर सचिवांची १० पदे व कक्ष अधिकारी गट 'ब' राजपत्रित अधिकाऱ्यांची १९ पदे असून त्यांच्या मदतीस सहायक कक्ष अधिकारी, लिपिक-टंकलेखक व अन्य गट-ड संवर्गातील कर्मचारीवृंद कार्यरत आहे.

राज्यातील प्रत्येक नागरिकाला पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून देणे व स्वच्छतेविषयी सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देणे हे या विभागाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या विभागामार्फत जलस्वराज्य टप्पा-२, केंद्र परस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, शिवकालीन पाणी साठवण योजना, संत गाडगेबाबा नागरी/ग्रामीण स्वच्छता अभियान, केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा), महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प, जलविज्ञान प्रकल्प सुजल निर्मल अभियान अशा विविध महत्वाकांक्षी योजना राबविल्या जातात. केंद्र शासनाकडून या विभागास उपलब्ध होणाऱ्या अनुदानाचे संनियंत्रण पाणी पुरवठा व स्वच्छता सहाय्य संस्था या संस्थेमार्फत केले जाते.

या विभागातील उपसचिव (अर्थसंकल्प) यांच्या अधिपत्त्याखालील कार्यासनांमार्फत, ग्रामीण पाणी पुरवठा विषयक धोरणात्मक बाबी, विभागास केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सर्व निधींचे नियोजन, वाटप, ताळमेळ या बाबी हाताळल्या जातात. उपसचिव (आस्थापना) यांच्या अधिपत्त्याखालील कार्यासनांमार्फत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील (खुद्द), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापनाविषयक व सेवाविषयक बाबी हाताळल्या जातात. उपसचिव (भाप्रसे) यांच्या अधिपत्त्याखालील कार्यासनांकडून ग्रामीण पाणी पुरवठ्यांशी संबंधीत निधी वितरण तसेच ग्रामीण स्वच्छतेशी संबंधीत धोरणात्मक व निधी वितरण विषयक बाबी, जलस्वराज्य टप्पा-२, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता राखण्याविषयी धोरणात्मक बाबी व निधी वितरण या बाबी हाताळल्या जातात. या विभागातील उप सचिव (नागरी योजना) यांच्या अधिपत्त्याखालील कार्यासनामार्फत, नागरी दलित वस्ती विषयक प्रशासकीय बाबी व निधी वितरण तसेच नागरी पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक बाबी हाताळल्या जातात. अधिक्षक अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी यांच्या अधिपत्याखालील कार्यासनांमार्फत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रस्तावांची छाननी करून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देणे, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देणे तसेच निधी वितरण विषयक कामे हाताळली जातात.

या विभागाच्या अधिपत्त्याखाली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग अशा ३ यंत्रणा कार्यरत आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची कामे करण्यात येतात. तर, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत भूजलाशी निगडीत कामकाज हाताळले जाते व जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत जिल्ह्यातील ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या पाणी पुरवठा योजनांशी संबंधित कामे हाताळली जातात.

## तक्ता क्र. १

# पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (आस्थापना)

**(दोन) वित्तीय आवश्यकता :**

(रुपये हजारात)

| अ.क्र. | तपशील | प्रत्यक्ष खर्च, २०१५-२०१६ | | | अर्थसंकल्पीय अंदाज, २०१६-२०१७ | | | सुधारित अंदाज, २०१६-२०१७ प्रस्तावित | | | अर्थसंकल्पीय अंदाज, २०१७-२०१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | योजनेतर | योजनांतर्गत | एकूण | योजनेतर | योजनांतर्गत | एकूण | योजनेतर | योजनांतर्गत | एकूण | प्रस्तावित तरतुद |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| (अ) | कार्याचे वर्गीकरण– | | | | | | | | | | |
| | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, आस्थापना. ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | एकूण (अ) स्थूल | ८३२६१ | ... | ८३२६१ | १०२८८२ | ... | १०२८८२ | ९३१८२ | ... | ९३१८२ | १०६३५३ |
| | वजा–वसुली | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | एकूण (अ) निव्वळ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| (ब) | उद्दिष्टवार वर्गीकरण– | | | | | | | | | | |
| (१) | वेतन ... | ७८५५१ | ... | ७८५५१ | ९७५३१ | ... | ९७५३१ | ८७५३१ | ... | ८७५३१ | १००२३० |
| (२) | प्रवास खर्च ... | ६९६ | ... | ६९६ | १००० | ... | १००० | १००० | ... | १००० | १४०० |
| (३) | कार्यालयीन खर्च ... | २४८६ | ... | २४८६ | २५०० | ... | २५०० | २७०० | ... | २७०० | २७०० |
| (४) | पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचा संगणकीकरणावरील खर्च | ४४३ | ... | ४४३ | ५२२ | ... | ५२२ | ६२२ | ... | ६२२ | ६२२ |
| (५) | पेट्रोल, तेल व वंगण ... | २५८ | ... | २५८ | ३२८ | ... | ३२८ | ३२८ | ... | ३२८ | ४०० |
| (६) | इतर खर्च ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| (७) | अतिकालीन भत्ता ... | ... | ... | ... | ... | ... | ... | १ | ... | १ | १ |
| (८) | दूरध्वनी, वीज खर्च ... | ६२९ | ... | ६२९ | ७५० | ... | ७५० | ७५० | ... | ७५० | ७५० |
| (९) | इतर प्रशासकीय खर्च ... | १९८ | ... | १९८ | २५० | ... | २५० | २५० | ... | २५० | २५० |
| | एकूण (ब) स्थूल | ८३२६१ | ... | ८३२६१ | १०२८८२ | ... | १०२८८२ | ९३१८२ | ... | ९३१८२ | १०६३५३ |
| | एकूण (ब) निव्वळ | ८३२६१ | ... | ८३२६१ | १०२८८२ | ... | १०२८८२ | ९३१८२ | ... | ९३१८२ | १०६३५३ |
| (क) | वित्त व्यवस्थेची साधने– | | | | | | | | | | |
| | प्रधान शीर्ष ३४५१ | ८३२६१ | ... | ८३२६१ | १०२८८२ | ... | १०२८८२ | ९३१८२ | ... | ९३१८२ | १०६३५३ |
| | एकूण (क) स्थूल | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | एकूण (क) निव्वळ | ८३२६१ | ... | ८३२६१ | १०२८८२ | ... | १०२८८२ | ९३१८२ | ... | ९३१८२ | १०६३५३ |

तक्ता क्रमांक-२

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या आस्थापनेवर दिनांक ३१-१२-२०१६ रोजी असलेली राजपत्रित/अराजपत्रित स्थायी/अस्थायी पदे

| अनुक्रमांक | पदाचे नाव | वेतन श्रेणी (रुपये) | स्थायी पदे | अस्थायी पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | **गट—अ राजपत्रित** | | | |
| १. | प्रधान सचिव ... ... ... | २,११,३०० | १ | ... | १ |
| २. | मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी ... | ३७,४००-६७,००० + ग्रेड वेतन–८,९०० | १ | ... | १ |
| ३. | उपसचिव ... ... ... | १५,६००-३९,१०० + ग्रेड वेतन-७,६०० | २ | २ | ४ |
| ४. | प्रकल्प व्यवस्थापक (प्रकल्प अधिकारी) ... ... | १५,६००-३९,१०० + ग्रेड वेतन-६,६०० | ... | १ | १ |
| ५. | अवर सचिव ... ... ... | १५,६००-३९,१०० + ग्रेड वेतन-६,६०० | ६ | ४ | १० |
| ६. | प्रशिक्षण अधिकारी ... ... ... | १५,६००-३९,१०० + ग्रेड वेतन-६,६०० | ... | १ | १ |
| ७. | क्षमता बांधणी तज्ञ (प्रशिक्षण अधिकारी)... ... | १५,६००-३९,१०० + ग्रेड वेतन-६,६०० | ... | १ | १ |
| ८. | उप अभियंता ... ... ... | १५,६००-३९,१०० + ग्रेड वेतन-५,४०० | १ | ३ | ४ |
| | | (अ) एकूण पदे ... | ११ | १२ | २३ |
| | | **गट—ब राजपत्रित** | | | |
| १. | कक्ष अधिकारी ... ... ... | ९,३००-३४,८०० + ग्रेड वेतन-४,८०० | १२ | ७ | १९ |
| २. | लेखा अधिकारी ... ... ... | ९,३००-३४,८०० + ग्रेड वेतन-४,६०० | १ | १ | २ |
| ३. | सांख्यिकी अधिकारी ... ... ... | ९,३००-३४,८०० + ग्रेड वेतन-४,४०० | १ | १ | २ |
| ४. | एमआयएस को-ऑर्डिनेटर ... ... ... | ९,३००-३४,८०० + ग्रेड वेतन-४,४०० | १ | ... | १ |
| ५. | निवडश्रेणी लघुलेखक ... ... ... | ९,३००-३४,८०० + ग्रेड वेतन–४,६०० | १ | ... | १ |
| | | (ब) एकूण पदे ... | १६ | ९ | २५ |
| | | **गट—ब अराजपत्रित** | | | |
| १. | उच्चश्रेणी लघुलेखक ... ... ... | ९,३००-३४,८०० + ग्रेड वेतन–४,४०० | २ | २ | ४ |
| २. | निम्नश्रेणी लघुलेखक ... ... ... | ९,३००-३४,८०० + ग्रेड वेतन-४,३०० | ६ | ४ | १० |
| ३. | सहायक कक्ष अधिकारी/रोख लेखापाल... ... | ९,३००-३४,८०० + ग्रेड वेतन-४,३०० | ३१ | ११ | ४२ |
| ४. | संगणक यंत्रचालक ... ... ... | ९,३००-३४,८०० + ग्रेड वेतन-४,३०० | ... | १ | १ |
| ५. | सहायक लेखाधिकारी ... ... ... | ९,३००-३४,८०० + ग्रेड वेतन-४,३०० | १ | ... | १ |
| | | गट—ब एकूण पदे ... | ४० | १८ | ५८ |
| | | **गट—क** | | | |
| १. | लपुटंकलेखक ... ... ... | ५,२००-२०,२०० + ग्रेड वेतन-२,४०० | १ | २ | ३ |
| २. | सांख्यिकी सहायक ... ... ... | ५,२००-२०,२०० + ग्रेड वेतन-२,८०० | १ | ... | १ |
| ३. | लिपिक-टंकलेखक ... ... ... | ५,२००-२०,२०० + ग्रेड वेतन-१,९०० | ३९ | १२ | ५१ |
| ४. | रोखपाल ... ... ... | ५,२००-२०,२०० + ग्रेड वेतन-१,९०० | ... | १ | १ |
| ५. | उपलेखापाल ... ... ... | ९,३००-३४,८०० + ग्रेड वेतन-४,२०० | ... | १ | १ |
| ६. | वाहनचालक-नि-सर्वसा. सहा. ... ... ... | ५,२००-२०,२०० + ग्रेड वेतन-१,९०० | ... | २ | २ |
| ७. | वाहनचालक ... ... ... | ५,२००-२०,२०० + ग्रेड वेतन-१,९०० | १ | ... | १ |
| | | गट—क एकूण पदे ... | ४२ | १८ | ६० |
| | | **गट—ड** | | | |
| १. | हवालदार ... ... ... | ४,४४०-७,४४० + ग्रेड वेतन-१,६०० | १ | ... | १ |
| २. | आवेष्टक ... ... ... | ४,४४०-७,४४० + ग्रेड वेतन-१,६०० | १ | ... | १ |
| ३. | चक्रमुद्रक ... ... ... | ४,४४०-७,४४० + ग्रेड वेतन-१,६०० | १ | ... | १ |
| ४. | नाईक ... ... ... | ४,४४०-७,४४० + ग्रेड वेतन-१,६०० | ... | १ | १ |
| ५. | शिपाई ... ... ... | ४,४४०-७,४४० + ग्रेड वेतन-१,३०० | १३ | ६ | १८ |
| | | गट—ड एकूण पदे ... | १६ | ७ | २३ |
| | | विभागातील एकूण पदे ... | १२५ | ६४ | १८९ |

**तक्ता क्रमांक-२ (चालू)**

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्षासाठी दिनांक ३१-१२-२०१६ पर्यंत मंजूर असलेली राजपत्रित/अराजपत्रित स्थायी/अस्थायी पदे

| अनुक्रमांक | पदाचे नाव | वेतन बँड (रुपये) | ग्रेड वेतन रुपये | २०१६-२०१७ पदांची संख्या स्थायी | अस्थायी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ |
| | **गट—अ राजपत्रित** | | | | | |
| १. | उपसचिव व संचालक (सुसप्रव्यक) ... ... | १५,६००-३९,१०० | ७,६०० | ... | १ | १ |
| २. | प्रकल्प व्यवस्थापक (प्रकल्प अधिकारी) ... ... | १५,६००-३९,१०० | ६,६०० | ... | १ | १ |
| ३. | क्षमता बांधणी तज्ञ (प्रशिक्षण अधिकारी)... ... | १५,६००-३९,१०० | ६,६०० | ... | १ | १ |
| ४. | तांत्रिक अधिकारी (उप अभियंता)... ... ... | १५,६००-३९,१०० | ६,६०० | ... | १ | १ |
| | | | एकूण | ... | ४ | ४ |
| | **गट—ब अराजपत्रित** | | | | | |
| १. | उच्च श्रेणी लघुलेखक ... ... ... | ९,३००-३४,८०० | ४,४०० | ... | १ | १ |
| २. | उपलेखापाल ... ... ... | ९,३००-३४,८०० | ४,२०० | ... | १ | १ |
| | | | एकूण | ... | २ | २ |
| | **गट—क अराजपत्रित** | | | | | |
| १. | लिपिक ... ... ... | ५,२००-२०,२०० | १,९०० | ... | १ | १ |
| २. | लिपिक-टंकलेखक ... ... ... | ५,२००-२०,२०० | १,९०० | ... | १ | १ |
| ३. | वाहन चालक व सर्वसाधारण सहायक ... ... | ५,२००-२०,२०० | १,९०० | ... | २ | २ |
| | | | एकूण | ... | ४ | ४ |
| | **अराजपत्रित वर्ग—४** | | | | | |
| १. | शिपाई ... ... ... | ४,४४०-७,४४० | १,३०० | ... | २ | २ |
| | | | एकूण | ... | २ | २ |
| | | | सु. स. प्र. व्य. कक्ष एकूण पदे ... | ... | १२ | १२ |

**जागतिक बँक अर्थसहाय्यित जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत निर्माण करण्यात आलेली परंतु विभागाच्या आकृतीबंधामध्ये समाविष्ट नसलेली खालील ३ अस्थायी पदे दिनांक २३-९-२०१४ च्या शासन निर्णयान्वये विभागाच्या मंजूर आकृतीबंधामध्ये समाविष्ट नसलेली ३ अस्थायी पदे**

| अनुक्रमांक | पदनाम | वेतन बँड (रुपये) | ग्रेड वेतन (रुपये) | २०१६-२०१७ च्या पदांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | अवर सचिव (आस्थापना) ... ... | १५,६००-३९,१०० | ६,६०० | ... | १ | १ |
| २. | सहायक कक्ष अधिकारी ... ... | १५,६००-३४,८०० | ४,३०० | ... | १ | १ |
| ३. | लिपिक (रोखशाखा) ... ... | ५,२००-२०,२०० | १,९०० | ... | १ | १ |
| | | | एकूण | ... | ३ | ३ |

# ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम

## १. फ्लॅगशिप योजना :—

फ्लॅगशिप योजना ही केंद्र शासनामार्फत राबविण्यात येत असून त्या अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या १६ योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामध्ये या विभागाच्या खालील **दोन योजनांचा** समावेश आहे.

१. **राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम** : दि. २७ जुलै २००० रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने मागणी आधारित लोक सहभागाचे लोकाभिमुख धोरण स्विकारलेले आहे. आर्थिक वर्ष सन २००९-२०१० पासून केंद्र शासनाने वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे रुपांतर "राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (National Rural Drinking Water Programme-NRDWP)" असे केलेले आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून राज्याने आर्थिक वर्ष सन २००९-२०१० पासून राज्यात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. या कार्यक्रमांतर्गत स्त्रोत शाश्वती, पाण्याची गुणवत्ता व कुटुंब पातळीवर जलसुरक्षा यावर भर देण्यात आलेला आहे. त्यानुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

   १. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (व्याप्ती) NRDWP (Coverage)

   २. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (पाणी गुणवत्ता) NRDWP (Water Quality)

   ३. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (स्त्रोत शाश्वतता) NRDWP (Sustainability)

२. **स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)** : केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम सन २०००-२००१ पासून राबविण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला. या कार्यक्रमांचे दिनांक १ एप्रिल २०१२ पासून निर्मल भारत मिशन (ग्रामीण) व त्यानंतर दिनांक २ ऑक्टोबर २०१४ पासून स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) असे पुनर्नामांकन करण्यात आलेले आहे. त्यानुसार ३४ जिल्ह्यांमध्ये स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) योजना राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाअंतर्गत केवळ शौचालये न बांधता स्वच्छतेच्या अन्य बाबी जसे शोषखड्डे घेणे, शाळा/ अंगणवाडीतून स्वच्छतागृहांची सोय करणे, माहिती व लोकशिक्षणाचा कार्यक्रम राबविणे, आवश्यक तेथे महिलांसाठी सामुहिक स्वच्छतागृहे बांधणे, स्वच्छताविषयक साहित्याची उत्पादन तथा विक्री केंद्रे उभारणे इत्यादींची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

## २. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे स्वरूप :—

२.१ राज्यात एकूण १००४८८ गावे/वाड्या आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील एकूण ११.२३ कोटी लोकसंख्येपैकी ग्रामीण लोकसंख्या ६.६१४ कोटी म्हणजेच ५५ टक्के आहे. राज्याचा १/३ भाग पर्जन्यछायेत येतो. परंतु याच भागात जास्त पाणी लागणारी पिके घेतली जातात. कोंकण प्रदेश हा अति पावसाचा प्रदेश आहे. परंतु उतार व सच्छिद्र खडकामुळे पाण्याची साठवणूक होऊ शकत नाही. तसेच या भागात भरपूर व उथळ भूगर्भ साठे आहेत, सदर भाग नैसर्गिक, रासायनिक प्रदूषणग्रस्त आहे.

२.२ पाणी ही मूलभूत गरज असल्याने, केंद्र शासनाने व राज्य शासनाने ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमास प्रथम प्राधान्य दिलेले आहे.

२.३ साध्या विहिरी, विंधण विहिरी, लघु पाणी पुरवठा योजना, नळ पाणी पुरवठा योजना, अशा उपाययोजनांद्वारे ग्रामीण भागात **पिण्याचे पाणी** उपलब्ध करण्यात आले आहे. तथापि, प्रत्येक गावात पाणी पुरवठा योजना असूनही वाढती लोकसंख्या, प्रत्येक **वर्षी पडणारा अपुरा पाऊस**, शेतीसाठी भूगर्भातील व भूपृष्ठावरील पाण्याचा अनिर्बंध वापर, तसेच पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत अनेक **कारणामुळे दूषित होवू लागल्याने, पिण्याच्या** पाण्याच्या उपलब्धतेत घट झाली. यामुळे, पिण्यासाठी पुरेसे पाणी पुरविण्याबरोबरच ते शुध्द **स्वरूपात पुरविण्यालाही प्राधान्य देण्यात आले आहे.** पावसाळ्यानंतर पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणाऱ्या गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी **विशेष उपाययोजना घेण्यात येतात. त्याचप्रमाणे दुषित** पाणी पुरवठा असलेल्या भागाला शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी उपाय**योजना करण्यात येतात.**

२.४ सुधारित धोरणानुसार आता हा कार्यक्रम मागणी आधारित व **समूहसहभाग या तत्वानुसार राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागातील जनतेला** दरडोई दरदिवशी ४० लिटर या प्रमाणात **शुद्ध स्वरुपात पिण्याचे पाणी या कार्यक्रमाद्वारे उपलब्ध केले जाते. नवीन पाणी पुरवठा योजना घेताना** त्यामध्ये १०० टक्के घरगुती नळ **जोडण्याचा समावेश अनिवार्य करण्यात आला आहे.**

२.५ राज्यामध्ये ग्रामीण पाणी पुरवठा **योजनांच्या प्रभावी कार्यान्वयनासाठी राज्यातील सर्व प्रादेशिक व स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजनाद्वारे** पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे **वापरानुसार मोल अदा करण्याची संकल्पना** प्रत्यक्षात आणण्यासाठी **सर्व घरगुती व बिगर घरगुती नळ जोडणी** धारकांसाठी मीटर पद्धती लागू करण्**यात आली आहे.**

## ३. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे धोरण :—

३.१ राज्य शासनाने ग्रामीण पाणी पुरवठा कार्य**क्रमासंबंधात सन २०००–२००१ पासून सुधारित धोरण** राबविण्यास सुरुवात केली. त्यापूर्वी पुरवठा आधारित धोरणात कार्यक्रम लोकाभिमुख नव्हता. **त्यामुळे कार्यक्रम अपेक्षेप्रमाणे यशस्वी** होऊ शकला नाही. मागील धोरणातील त्रुटी विचारात घेऊन त्यात आवश्यक सुधारणा करून केंद्र **शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार** सुधारित धोरण आता राज्यात राबविले जात आहे.

३.२ सुधारित धोरणानुसार हा कार्यक्रम मागणी आधारित व समुहसहभाग या तत्वानुसार राबविला जात आहे. या धोरणानुसार योजना निश्चितीपासून ते योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यात व व्यवस्थापनात लोकांचा सक्रीय सहभाग ग्रामसभेद्वारे अनिवार्य केला असून योजनेच्या भांडवली खर्चाचा १० टक्के भाग लाभार्थ्यांची लोकवर्गणी म्हणून खर्च होते, परंतु ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची किंमत पाहता, योजनेची लोकवर्गणी भरणे ग्रामस्थांना/स्थानिक स्वराज्य संस्थांना अवघड होऊ लागले आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारली जाणारी लोकवर्गणी जमा करण्यामध्ये खूप अडचणी येत असल्याचे शासनाचे निदर्शनास आले. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्याकरीता मंजूर निधी व गत काही वर्षातील मंजूर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा आढावा घेण्यात आला असता असे निदर्शनास आले आहे की, गत तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीतील रखडलेल्या योजनांपैकी बहुतांश योजना लोकवर्गणी अभावी व लोकवर्गणीशी निगडीत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या प्रश्नांमुळे रखडलेल्या आहेत. लोकवर्गणीच्या अटीमुळे योजना राबविण्यास विलंब होत असून केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी पर्याप्त प्रमाणात खर्च होवू शकत नाही. त्यामुळे केंद्र व राज्य शासनाचा प्राप्त झालेला निधी मोठ्या प्रमाणावर अखर्चित राहत आहे. या बाबींचा विचार करून मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने **दि. ९ जुलै २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारण्यात येत असलेली लोकवर्गणी पुर्णतः रद्द करण्यात आली आहे.** तथापि, यापूर्वी ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरीता पूर्णतः अथवा अंशतः लोकवर्गणीची रक्कम जमा केलेली असेल अशी लोकवर्गणीची रक्कम संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेस अथवा अंमलबजावणी यंत्रणेस परत केली जाणार नाही व अशा पाणी पुरवठा योजनांमधील उर्वरित लोकवर्गणीची रक्कम योजनांच्या किंमतीमध्ये समाविष्ट करण्यात येईल, अशी तरतूद शासन निर्णयात करण्यात आलेली आहे.

३.३ **दिनांक १७ मार्च २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :-**

३.३.१ गावातील सर्व नागरीकांना घरोघरी किमान ४० लिटर दरडोई दर दिवशी या प्रमाणे पाणी उपलब्ध होईल असा कृती आराखडा तयार करणे.

३.३.२ गावात अस्तित्वात असलेल्या सर्व पिण्याच्या पाण्याच्या उपाययोजनांचा (existing drinking water infrastructure) आढावा घेवून त्यातील स्त्रोतांचे संवर्धन व बळकटीकरण करणे, अस्तित्वात असलेल्या योजनांमध्ये सुधारणा करणे.

३.३.३ गुणवत्ताबाधीत गावांमध्ये सुरक्षित स्त्रोत विकसित करण्याकरिता उपाययोजना घेणे.

३.३.४ गावाच्या लोकसंख्येत झालेल्या वाढीमुळे पूरक योजनांचा विचार करणे.

३.३.५ उपाययोजना प्रस्तावित करताना, वेगवेगळ्या विकल्पांपैकी, किमान खर्चावर तसेच देखभाल दुरुस्तीच्या किमान खर्चावर आधारित विकल्पाचा विचार करणे.

३.३.६ एका गावातील वाड्या/वस्त्यांसाठी एकच योजना करण्यापेक्षा विकेन्द्रित उपाययोजना किफायतशीर असल्यास त्याला प्राधान्य देणे. योजना आखताना सर्व भूजल व भूपृष्ठावरील सार्वजनिक व खाजगी स्त्रोतांचा अभ्यास करून नियोजन करणे.

३.३.७ प्रस्तावित नळ योजनांमध्ये स्त्रोत बळकटीकरण व १०० टक्के घरगुती नळ जोडण्यांचा समावेश अनिवार्य करणे.

३.३.८ जलस्वराज्य प्रकल्पाच्या धर्तीवर प्रस्तावित उपाययोजनेचा भाग म्हणून गाव कृती आराखडा तयार करणे बंधनकारक राहील. या अंतर्गत लोकसहभागातून गावातील सर्व स्त्रोतांचा सर्वंकष विचार करून पाण्याचा ताळेबंद तयार करणे.

३.३.९ पाण्याची गुणवत्ता टिकविण्याकरिता गावात संपूर्ण स्वच्छता आवश्यक असून गाव हागणदारी मुक्त होणे ही अट नवीन योजनांचे काम सुरु करण्याकरिता अनिवार्य करणे.

**३.४ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा वार्षिक कृती आराखडा तयार करताना खालीलप्रमाणे गावांना प्राधान्य देण्यात येते.**

**३.४.१** योजना मंजूर करताना मागील तीन वर्षात टँकर्सद्वारे पाणी पुरवठा केलेल्या गावांना प्राधान्य देणे.

**३.४.२** १०० टक्के हागणदारी मुक्त झालेली गावे.

**३.४.३** ४० लिटर प्रती दिन पेक्षा कमी पाणी पुरवठा होत असलेली गावे.

**३.४.४** १० लिटर प्रती दिन पेक्षा कमी पाणी पुरवठा होत असलेल्या गावांना कृती आराखड्यात सर्वोच्च प्राधान्य देणे.

३.४.५ ज्या गावांमध्ये पाणी पुरवठा योजना नाहीत अशा गावांचा कृती आराखड्यात समावेश करणे.

३.४.६ अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना वाढत्या लोकसंख्येमुळे अपुरी पडत असलेली गावे.

३.४.७ ज्या गावांमधील अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना कालबाह्य झालेल्या आहेत, अशा गावांचा कृती आराखड्यात समावेश करणे.

३.५ **महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांची अंमलबजावणी करतांना राज्य शासनामार्फत घेण्यात आलेल्या काही महत्वाच्या धोरणात्मक निर्णयांची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे :-**

३.५.१ **ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाच्या निकषात वाढ :-**

या विभागाच्या दि. १८ मे १९९६ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाअंतर्गत दरडोई दरदिवशी ५५ लिटर क्षमतेने पाणी पुरवठा करण्यासाठी दरडोई खर्चाचे निकष निश्चित करण्यात आले होते. दरम्यानच्या काळात केंद्र शासनाने दरडोई दरदिवशी ५५ लिटरऐवजी ४० लिटर हे स्विकारलेले धोरण, सन १९९६ ते २०१३ या कालावधीत पाणी पुरवठा योजनांच्या साहित्याच्या किंमतीमध्ये झालेली वाढ, अनेक जिल्हा परिषदा व लोक

प्रतिनिधींकडून दरडोई खर्चाच्या निकषात वाढ करण्याची होत असलेली मागणी या बाबी विचारात घेवून मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने दिनांक ९ ऑक्टोबर २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाच्या निकषात पुढीलप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे.

| क्षेत्र | दि. १८ मे १९९६ च्या शासन निर्णयाप्रमाणे दरडोई खर्चाची मर्यादा | दरडोई खर्चाचे सुधारित दर | | |
|---|---|---|---|---|
| | | ४० लिटर दरडोई दरदिवशी (दि. १८ मे १९९६ च्या शासन निर्णयातील दरात ३० टक्के वाढ करून अथवा दि. १३ ऑगस्ट २०१२ च्या शासन निर्णयातील बिगर पाणी गुणवत्ता बाधित गावांप्रमाणे) | ५५ लिटर दरडोई दरदिवशी (सन १९९६ चे दर × १.५) | ७० लिटर दरडोई दरदिवशी (५५ LPCD च्या दरात १० टक्के वाढ करून) |
| **कोंकण वगळता राज्याच्या इतर भागासाठी—** | | | | |
| १. निर्देशित डोंगरी भाग | २१२० | २७५६ | ३१८० | ३४९८ |
| २. ३० मी. पेक्षा जास्त Static lift असलेल्या नळ योजना | १७९० | २३२७ | २६८५ | २९५३ |
| ३. ३० मी. पर्यंत Static lift असलेल्या नळ योजना | १३९० | १८०७ | २०८५ | २२९३ |
| **कोंकण क्षेत्रासाठी—** | | | | |
| १. निर्देशित डोंगरी भाग | २३३० | ३०२९ | ३४९५ | ३८४४ |
| २. ३० मी. पेक्षा जास्त Static lift असलेल्या नळ योजना | १९७० | २५६१ | २९५५ | ३२५० |
| ३. ३० मी. पर्यंत Static lift असलेल्या नळ योजना | १५३० | १९८९ | २२९५ | २५२४ |

उपरोक्त दरडोई खर्चाच्या निकषात बसणाऱ्या पाणी पुरवठा योजनांना संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत मान्यता देण्यात येते. जास्तीत जास्त योजना विभागस्तरावर निकाली निघाव्यात, यासाठी विहित निकषाच्या १०० टक्केपर्यंत जास्त दरडोई खर्च असलेल्या योजनांना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत शासनस्तरावरून मान्यता देण्यात येते. उपरोक्त विहित निकषाच्या १०० टक्केहून अधिक दरडोई खर्च असणाऱ्या योजनांच्या प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे.

**दिनांक २७ मार्च २०१५ चे शासन शुद्धीपत्रक** : या शासन शुद्धीपत्रकानुसार विहित दरडोई खर्चाच्या अधिक दरडोई खर्च असणाऱ्या पाणी पुरवठा योजनांच्या मान्यतेच्या तरतुदीमध्ये बदल करण्यात आला असून, विहित दरडोई खर्चाच्या निकषाच्या ५० टक्के पर्यंत अधिक दरडोई खर्च असणाऱ्या योजनांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्तरावरून तर विहित निकषाच्या अधिक ५० ते १०० टक्के पर्यंतच्या दरडोई खर्चाच्या योजनांना शासन स्तरावरून मान्यता देण्याचे निश्चित केले आहे.

**३.५.२ जलस्वराज्य टप्पा-१ मधील अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत :—**

जलस्वराज्य टप्पा-१ अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या ८६ ग्राम पंचायतीमधील १०२ ग्रामीण पाणी पुरवठा योजना बंद असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. अपूर्ण अवस्थेतील योजनांची उर्वरित कामे पूर्ण न केल्यास या योजनांवर शासनाने केलेला खर्च वाया जाऊ शकतो व या योजना अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे लाभार्थ्यांना पाणी पुरवठा होऊ शकणार नाही. त्यामुळे ग्रामस्थांकडून नवीन पाणी पुरवठा योजनांची मागणी येवू शकते. ही वस्तूस्थिती विचारात घेवून जलस्वराज्य टप्पा-१ प्रकल्पांतर्गत हाती घेण्यात आलेल्या, परंतु अपूर्ण अवस्थेत असलेल्या ८६ ग्राम पंचायतीमधील १०२ पाणी पुरवठा योजनांची अपूर्ण कामे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत पूर्ण करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या योजना पूर्ण करण्यासाठी खालील अटी व शर्ती विहित करण्यात आलेल्या आहेत :–

१. अपूर्ण योजनांमधील उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर समिती स्थापन करून त्या समितीमार्फत अपूर्ण अवस्थेतील पाणी पुरवठा योजनांची सद्यःस्थिती तपासून घ्यावी. सदर समितीमध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) हे सदस्य म्हणून तर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील.

२. योजना अपूर्ण असलेल्या गावे/वाड्या/वस्त्यांमध्ये पर्यायी योजनांमधून निकषाप्रमाणे पाणी पुरवठा होत नसेल, अशाच गावे/वाड्या/वस्त्यांमधील अपूर्ण योजनांचे काम राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पूर्ण करण्यात यावे. याबाबतची खातरजमा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करावी.

३. अपूर्ण कामे पूर्ण करण्याच्या प्रस्तावांचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा वार्षिक कृती आराखड्यात समावेश करून त्यास राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीची मान्यता घ्यावी.

४. अपूर्ण योजनेतील उर्वरित कामांची अंदाजपत्रके व आराखडे तयार करताना जलस्वराज्य प्रकल्पातील मूळ योजनेत समाविष्ट असलेल्या उपांगांपैकी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या अपूर्ण उपांगांचाच योजना पूर्ण करण्यासाठी विचार

करण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीमध्ये जलस्वराज्य प्रकल्पाच्या मूळ मंजूर अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट असलेल्या आणि अपूर्ण असलेल्या बाबी वगळता अन्य उपांगासाठी NRDWP मधून खर्च अनुज्ञेय राहणार नाही, ही बाब तपासण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांची राहील.

५. जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत यापूर्वी झालेल्या कामांचे मूळ मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेले मुल्यमापन सर्वसाधारणपणे विचारात घेणे आवश्यक आहे. तथापि, मूळ मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेल्या कामांविषयी तक्रारी असल्यास, सदर तक्रारींच्या चौकशीनंतर कायम करण्यात आलेले मुल्यांकन विचारात घेणे आवश्यक राहील.

६. अपूर्ण असलेल्या आर. सी. सी. कामांच्या बांधकाम स्थैर्याची शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांकडून तपासणी करून घ्यावी.

७. अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी अंदाजपत्रके/आराखडे तयार करणे, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे, लोकवर्गणी, निधी वितरण याबाबत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

८. रकमेचा अपहार झाल्यामुळे योजनेचे काम अपूर्ण असेल अशा योजनेची उर्वरित कामे जिल्हास्तरीय यंत्रणेमार्फत करावीत व ही कामे पूर्ण करण्यासाठी प्रथम अपहाराची रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात यावी. वसूल करण्यात आलेल्या रकमेचा विनियोग योजनेची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी करण्यात यावा. ही जबाबदारी मुख्य कार्यकारी आधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

९. या योजनांसाठी राज्य शासनाकडून भविष्यात कोणताही निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही व या अपूर्ण योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमामधून पूर्ण करणे बंधनकारक राहील.

**३.५.३ राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीचे सुधारित धोरण :-**

राज्यातील ग्रामीण भागामध्ये उघड्यावर शौचास बसण्याच्या सामान्य जनतेच्या सवयीमध्ये जाणीवपूर्वक बदल व्हावा, गावांमध्ये स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण निर्माण व्हावे व त्याहीपेक्षा स्त्रीयांचा सन्मान राखला जावा, यादृष्टीने दिनांक २ मे २००५ पासून राज्यात ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीचे धोरण स्विकारण्यात आले आहे. दि. १७ मार्च २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी प्रस्ताव तयार करताना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असणे व प्रगतीपथावरील योजनांना शासन हिश्श्यांचा दुसरा हप्ता वितरीत करतांना संबंधित गाव १०० टक्के हागणदारी मुक्त असणे या दोन अटी विहित करण्यात आलेल्या आहेत. मात्र या अटींची काही भागात पुर्तता होत नसल्याने ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर विपरीत परिणाम होत असून, योजनांकरिता निधी वितरीत करण्यास व योजना विहित कालावधीत पूर्ण होण्यास अडचणी निर्माण होत आहेत. जनगणना २०११ व पायाभूत सर्वेक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या माहितीवरून ग्रामीण भागामध्ये वैयक्तीक शौचालय बांधकामाबाबत उदासिनता असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वैयक्तीक शौचालय बांधकाम व वापरात अधिक गती देणेही आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करता ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरीता विहित केलेली हागणदारी मुक्तीची अट पूर्णपणे काढून टाकणे संयुक्तीक ठरणार नाही. यासाठी संतुलित दृष्टीकोण स्विकारून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीच्या धोरणात दिनांक २२ जानेवारी २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | बाब | | निधी वितरीत करण्यासाठी हागणदारी मुक्तीची सुधारित अट |
|---|---|---|---|
| १. | योजनेचा प्रस्ताव तयार करतांना | ... | संबंधित गावाने सन २०१२ मध्ये निर्मल भारत अभियानांतर्गत झालेल्या पायाभूत सर्वेक्षणानुसार (Baseline Survey) शौचालय असलेल्या कुटुंब संख्येमध्ये २५ टक्के वाढ करणे अथवा एकूण कुटुंब संख्येच्या ६० टक्के हागणदारी मुक्त असणे यापैकी जी कमी असेल ती. |
| २. | योजनेस शासन निधीचा पहिला हप्ता वितरीत करतांना | ... | योजनेचा प्रस्ताव तयार करण्यासाठी वर नमुद केलेल्या अटीच्या अधीन राहून पहिला हप्ता वितरीत करण्यात यावा. |
| ३. | योजनेस शासन निधीचा दुसरा हप्ता वितरीत करतांना | ... | संबंधित गावाने सन २०१२ मध्ये निर्मल भारत अभियानांतर्गत झालेल्या पायाभूत सर्वेक्षणानुसार (Baseline Survey) शौचालय असलेल्या कुटुंब संख्येमध्ये ५० टक्के वाढ करणे अथवा एकूण कुटुंब संख्येच्या ७० टक्के हागणदारी मुक्त असणे यापैकी जी कमी असेल ती. |
| ४. | योजनेस शासन निधीचा तिसरा हप्ता वितरीत करतांना | ... | संबंधित गावाने सन २०१२ मध्ये निर्मल भारत अभियानांतर्गत झालेल्या पायाभूत सर्वेक्षणानुसार (Baseline Survey) शौचालय असलेल्या कुटुंब संख्येमध्ये ७५ टक्के वाढ करणे अथवा एकूण कुटुंब संख्येच्या ८० टक्के हागणदारी मुक्त असणे यापैकी जी कमी असेल ती. |
| ५. | योजनेस शासनाचा अंतिम १० टक्के निधी वितरीत करतांना | ... | संबंधित गावाने सन २०१२ मध्ये निर्मल भारत अभियानांतर्गत झालेल्या पायाभूत सर्वेक्षणानुसार (Baseline Survey) शौचालय असलेल्या कुटुंब संख्येमध्ये १०० टक्के वाढ करणे अथवा एकूण कुटुंब संख्येच्या ९० टक्के हागणदारी मुक्त असणे यापैकी जी कमी असेल ती. |

**३.५.४ राज्यातील शहरालगतच्या ग्रामपंचायती/वाड्या/वस्त्यांमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-**

राज्यातील महानगरे वा शहरांच्या लगत असणाऱ्या ग्राम पंचायती/वाड्या/वस्त्यांचा भाग हा ग्रामीण भागच असल्याने या ग्रामीण भागामध्ये देखील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येते. तथापि, शहरे/महानगरे यांच्या लगत असणाऱ्या ग्रामीण भागात मलःनिस्सारण योजना अस्तित्वात नसल्याने, राज्य शासनावर येत असलेला अधिकचा आर्थिक भार तसेच लगतच्या शहरी निकषानुसार योजना राबविण्याची संबंधित ग्रामपंचायत/वाडी/वस्तीची नसलेली आर्थिक व तांत्रिक कुवत या बाबींचा विचार करून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत शहरालगतच्या ग्रामपंचायती/वाड्या/

वस्त्यांमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना दिनांक ११ सप्टेंबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

१. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत शहरालगतच्या ग्रामपंचायती/वाड्या/वस्त्यांमध्ये दरडोई दर दिवशी अधिकतम ७० लिटरपर्यंतच्या सुधारित/नवीन पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करता येईल.

२. शहरालगतच्या ग्रामपंचायती/वाड्या/वस्त्या नगरपालिकेच्या/महानगरपालिकेच्या सीमारेषेपासून १० किलोमिटरच्या परिघातील असणे आवश्यक आहे.

३. शहरालगतच्या ग्रामपंचायती/वाड्या/वस्त्या ह्या पाणी पुरवठ्याच्या दृष्टीकोनातून निश्चित करण्यासाठी तसेच त्यांचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती रद्द करून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समितीची रचना करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| ब) | संबंधित उपायुक्त, महानगरपालिका/मुख्याधिकारी, नगर परिषद | सदस्य |
| क) | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता/ग्रामपंचायत | सदस्य |
| ड) | सहायक/उपसंचालक (नगर रचना) | सदस्य |
| इ) | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ई) | वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | सदस्य |
| उ) | संबंधित कार्यकारी अभियंता, ग्रा. पा. पु., जिल्हा परिषद | सदस्य/सचिव |

४. सदर शासन निर्णयान्वये मंजूर केल्या जाणाऱ्या सर्व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी खालीलप्रमाणे सर्विस लेवल बेंच मार्क पूर्ण करणे बंधनकारक केले आहे.

| अ. क्र. | प्रस्तावित निर्देशक (Proposed Indicators) | बेंचमार्क |
|---|---|---|
| १. | वैयक्तिक नळ जोडण्यांची व्याप्ती (Coverage of Connections) | **१०० टक्के** |
| २. | प्रति व्यक्ती प्रतिदीन पाणीपुरवठा (Per Capita Water Supply) | **योजनेच्या मंजूर प्रकल्प अहवालाप्रमाणे** |
| ३. | पाणी वाटपाच्या मीटरचा विस्तार (Extent of metering of water connections) | **१०० टक्के (मीटरची किंमत प्रकल्प अहवालामध्ये समाविष्ट केली जाणार नाही. मीटरचा खर्च लाभार्थ्यांनी उचलणे आवश्यक आहे.)** |
| ४. | बिगर महसुली पाण्याची मर्यादा (Extent of non-revenue water) | **अधिकतम २० टक्के** |
| ५. | दररोज नियमित पाणी पुरवठ्याचा कालावधी (Continuity of Water Supply) | **किमान १० तास** |
| ६. | पुरविण्यात येणाऱ्या पाण्याची गुणवत्ता (Quality of Water Supplied) | **१०० टक्के शुद्ध** |
| ७. | ग्राहक तक्रार निवारण्याची कार्यक्षमता (Efficiency in redressal of customer complaints) | **१०० टक्के** |
| ८. | पाणीपट्टीची वसुली (Cost Recovery in Water Supply Services) | **किमान ८० टक्के** |

**३.५.५ राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी देखभाल दुरुस्ती करीता सुधारित मार्गदर्शक सूचना :-**

दिनांक १७ ऑक्टोबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी देखभाल दुरुस्तीच्या सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या असून या सूचना अंमलबजावणी यंत्रणांना बंधनकारक नसून, त्या मार्गदर्शक स्वरूपाच्या ठेवण्यात आल्या आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणांची/पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांची असल्याने त्या यंत्रणा/समित्या त्यांची स्वतंत्र देखभाल दुरुस्ती प्रक्रिया राबवू शकतात. सदर शासन निर्णयातील प्रमुख तरतुदी या पुढीलप्रमाणे आहेत.

१. ग्रामीण पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर किमान एक वर्ष ही योजना चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक करण्यात आले आहे.

२. योजना हस्तांतरित झाल्यानंतर योजनेच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी योजना हस्तांतरित करून घेणाऱ्या यंत्रणांवर सोपविण्यात आली आहे.

३. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद स्तरावर स्थापन केलेल्या जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीमध्ये शासनाकडून देय असलेल्या देखभाल-दुरुस्ती निधीचे वितरण सर्व जिल्हा परिषदांना मंजूर वार्षिक कृती आराखड्याच्या रकमेच्या प्रमाणात थेट करण्याचे निश्चित केले. (यापूर्वी जिल्हापरिषदाकडील मागणीनुसार निधीचे वितरण केले जात होते.)

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी दिनांक १७ ऑक्टोबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांना, दिनांक १० मार्च २०१५ रोजी शुद्धीपत्रक निर्गमित करण्यात आले असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला देखभाल-दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाची रक्कम शासन स्तरावरुन थेट वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच दिनांक १७ ऑक्टोबर २०१४ रोजीच्या निर्णयातून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सूट देण्यात आली.

४. जिल्हा देखभाल-दुरुस्ती निधीमध्ये जिल्हा परिषदांनी त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या किमान २० टक्के रक्कम जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ही २० टक्के रक्कम भरण्यासाठी पिण्याच्या पाण्यावरील पाणीपट्टी विचारात घेता येणार नाही.

५. जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे नियंत्रण ठेवण्यात आले आहे.

६. योजनांची देखभाल-दुरुस्ती नियमितपणे होण्यासाठी व स्थानिक पातळीवर होण्यासाठी यंत्रणा/समित्यांकडील कर्मचाऱ्यांना व अधिकृत नळजोडणीकारांना प्रशिक्षण देण्याचे निश्चित केले आहे.

७. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल-दुरुस्ती खाजगी यंत्रणा/कंत्राटदारांकडून करून घेण्यास काही अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे.

८. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीकरिता पुरेसा निधी उपलब्ध होण्यासाठी व देखभाल-दुरुस्तीकडे काटेकोर लक्ष देता यावे यासाठी देखभाल-दुरुस्तीचा स्वतंत्र अर्थसंकल्प तयार करण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे.

९. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीकरिता निधी वितरीत करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

१०. दिनांक १७ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेले देखभाल-दुरुस्तीच्या निधी वितरणाचे निकष रद्द करून जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीमध्ये प्राधान्यक्रम ठरवून देखभाल-दुरुस्तीची कामे हाती घेण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात आले आहेत.

११. दिनांक २० एप्रिल २०१२ च्या शासन निर्णयान्वये तयार केलेल्या योजना नुतनीकरण निधीची तरतूद रद्द करून योजना नुतनीकरण निधीमध्ये उपलब्ध असलेला सर्व निधी जिल्हा देखभाल-दुरुस्ती निधी मध्ये वर्ग करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

३.५.६ **साध्या विहिरींच्या कामासाठी निधी वितरणाची सुधारित पध्दत :—**

दिनांक १७ मार्च २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या निधी वितरणाची कार्यपद्धती विहित केली असून निधी वितरण चार हप्त्यात करण्याचे निश्चित केले आहे. यातील चौथा हप्ता १० टक्के निधीचा असून हा निधी योजना पुढील एक वर्ष यशस्वीरित्या चालविल्यानंतर अदा करण्यात येतो. ही १० टक्के निधीची तरतूद ठेवण्यामागचा उद्देश हा केवळ योजना पूर्णत्वानंतर योजनेची सफल चाचणी व्हावी, योजनेचे एक वर्ष कंत्राटदारामार्फत संनियंत्रण व्हावे असा आहे. तथापि, साध्या विहिरींच्या कामासाठी चाचणी कालावधीची आवश्यकता नसल्याने, केवळ साध्या विहिरींच्या कामाकरिता निधी वितरणाचा शेवटचा चौथा हप्ता रद्द करून दिनांक २८ नोव्हेंबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये साध्या विहिरींच्या कामाकरीता खालील प्रमाणे निधी वितरणाचे टप्पे निश्चित करण्यात आलेले आहेत.

अ) निधीचा पहिला हप्ता ... ३० टक्के

ब) निधीचा दुसरा हप्ता ... ३० टक्के

क) निधीचा तिसरा (अंतिम) हप्ता ...४० टक्के

३.५.७ **ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्विकृतीचे अधिकार :—**

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या जिल्हा वार्षिक कृती आराखड्याच्या आर्थिक व भौतिक प्रगतीचे संनियंत्रण करणे ही पूर्ण जबाबदारी जिल्हा परिषदांवर सोपविण्यात आली आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणी प्रक्रियेत जिल्हा परिषद महत्वाची भूमिका बजावणार आहे. त्यामुळे, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्विकृती प्रक्रियेत सुसुत्रता आणण्यासाठी दिनांक १६ फेब्रुवारी २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्विकृतीचे अधिकार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आलेले आहेत.

| अ. क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्विकृतीचे अधिकार (अंदाजपत्रकीय दराने प्राप्त होणाऱ्या निविदांसाठी) | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्रामसभा | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | निविदा समिती, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| १. | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु. ५०.०० लक्ष पर्यंत | रु. ५०.०० लक्ष ते रु. ७.५० कोटी पर्यंत | रु. ७.५० कोटीहून अधिक |
| २. | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | — | रु. ७.५० कोटी पर्यंत | रु. ७.५० कोटीहून अधिक |

अंदाजपत्रकीय दरापेक्षा अधिक रकमेच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदा स्विकृतीसाठी शासनाची पूर्वमान्यता घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

**३.५.८ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदा आणि ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना प्रशासकीय खर्चासाठी अनुज्ञेय असलेल्या निधीबाबत सुधारित निर्देश :–**

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणी करिता तांत्रिक सेवा पुरवठादारांची नियुक्ती करण्यात येत होती. तांत्रिक सेवा पुरवठादारांना त्यांच्या सेवेसाठी प्राकलने व आराखड्याप्रमाणे (Plan and Estimates) मंजूर प्रकल्प खर्च किंवा योजनेवर अंतिमरित्या झालेल्या कामावरील प्रत्यक्ष एकूण खर्च यापैकी जी रक्कम कमी असेल त्या खर्चाच्या २ टक्के पर्यंत प्राकलने व आराखडे शुल्क आणि ५ टक्के पर्यंत प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सल्ला शुल्क देण्यात येत होते. त्यानंतर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी तांत्रिक सेवा पुरवठादारांऐवजी कंत्राटी अभियंत्यांची नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या कंत्राटी अभियंत्यांचे मानधन व भत्ते यांचा खर्च जिल्हा परिषदांकडे जमा झालेल्या २ टक्के आणि ५ टक्के निधीतून करण्यात येतो. या खर्चाव्यतिरिक्त शिल्लक राहणाऱ्या निधीतून करावयाच्या खर्चासाठी शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि, बऱ्याच जिल्ह्यांमध्ये कंत्राटी अभियंत्यांची नियुक्ती करण्याची आवश्यकता नसल्याने हा निधी मोठ्या प्रमाणात अखर्चित राहतो. तसेच, ज्या जिल्हा परिषदांनी कंत्राटी अभियंत्यांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत अशा जिल्हा परिषदांमध्ये कंत्राटी अभियंत्यांच्या वेतन व भत्त्यावर खर्च होऊन देखील २ टक्के व ५ टक्के निधीमधून मोठ्या प्रमाणावर रक्कम शिल्लक राहते असे शासनाच्या निदर्शनास आल्याने व जिल्हा परिषदेकडील ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या कामांसाठी तांत्रिक सेवा पुरवठादारांच्या सेवा खंडित केलेल्या असल्यामुळे दिनांक २० फेब्रुवारी २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेकडील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची प्राकलने व आराखडे तयार करण्यासाठी असलेल्या २ टक्के निधीची, योजनेच्या प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सल्ल्यासाठी असलेल्या ५ टक्के निधीची व प्रशासकीय खर्चासाठी असलेल्या २ टक्के निधीची तरतूद रद्द करण्यात आली आहे. या बाबींद्वारे जिल्हा परिषदांकडे शिल्लक असलेला संपूर्ण निधी हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी वापरण्यात येणार असून, शिल्लक असलेल्या निधीचा खर्च अन्य कोणत्याही बाबींसाठी अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, या शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढे जिल्हा परिषदेकडील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी एकूण प्रत्यक्ष कामांच्या खर्चाच्या रकमेच्या अधिकतम ४ टक्के मर्यादेपर्यंतचा खर्च प्रशासकीय कामासाठी अनुज्ञेय ठेवण्यात आला आहे. जिल्हा परिषदेकडे उपलब्ध होणाऱ्या प्रशासकीय निधीचा विनियोग खालील कामांसाठी करण्याचे ठरविले आहे.

१. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत होणाऱ्या पाणी पुरवठा योजनांच्या प्रशासकीय खर्चाची प्रतिपूर्ती करणे.

२. कंत्राटी अभियंत्यांचे मानधन, प्रवास भत्ते व भ्रमणध्वनी भत्ते या बाबींवर खर्च करणे.

३. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जिल्हा स्तरावर व उप विभाग स्तरावर कार्यरत असलेल्या कंत्राटी डाटा एंट्री ऑपरेटर यांचे मानधन अदा करणे.

४. जिल्हा स्तरावरील ग्राम पाणी पुरवठा विभाग/उप विभाग याकरिता नियमित वाहन उपलब्ध नसल्यास, प्रतिमाह रु. ४०,००० मर्यादेपर्यंत भाडेतत्वावर वाहन उपलब्ध करून घेणे.

५. पाणी पुरवठा योजनेच्या सर्वेक्षणासाठी आवश्यक साधन सामुग्री/मनुष्यबळ उपलब्ध करून घेणे.

६. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परिक्षणाचा खर्च करणे.

७. पाणी पुरवठा योजनेची प्राकलने व आराखडे तयार करण्यासाठी आवश्यक असलेली स्टेशनरी, टंकलेखन, बाईडिंग व झेरॉक्स इ. बाबींवर खर्च करणे.

८. **ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे सनदी लेखापालाकडून (CA) लेखापरीक्षण करणे**– ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची सनदी लेखापालाकडून (CA) लेखापरिक्षण करून घेण्याची जबाबदारी जिल्हा परिषदांची राहील.

९. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयाच्या इंटरनेट व दूरध्वनी सुविधेची बिले अदा करणे.

१०. जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागासाठी संगणक व प्रिंटर उपलब्ध करून घेणे; मुख्य कार्यकारी आधिकारी/कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद, यांना पाणी पुरवठा योजनेच्या कामाकरिता शासनाच्या विहित पद्धतीनुसार लॅपटॉप उपलब्ध करून घेणे.

**३.५.९ उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद व कार्यालयीन अधीक्षक, जलस्वराज्य-२ या पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करण्याबाबत :–**

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, स्वच्छ भारत मिशन व जलस्वराज्य-२ या तीन महत्वाकांक्षी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता, जिल्हा परिषद हे पद नव्याने निर्माण करण्यात आलेले आहे. हे पद निर्माण करतांना उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद या पदावरील भार कमी करण्याचा उद्देश असून उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांच्या कामकाजात सुसुत्रता आणणे आवश्यक असल्याने दिनांक २ मार्च २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वच्छ भारत मिशन, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व जलस्वराज्य टप्पा-२ या कार्यक्रमांकरीता (१) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता (२) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद व (३) कार्यालयीन अधीक्षक, जलस्वराज्य टप्पा-२ या तिन्ही पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

**३.५.१० त्रयस्थ तांत्रिक परीक्षण :–**

दिनांक १५ जून २०१५ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परीक्षणाची कार्यवाही सर्व पाणी पुरवठा योजनांसाठी अनिवार्य करण्यात आली आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्यासाठी शासकीय पदवी/पदवीका अभियांत्रिकी महाविद्यालये,

शासकीय आय. आय. टी संस्था व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे गुणवत्ता व संनियंत्रणक पथक यांना मुभा देण्यात आलेली आहे. राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रण करणाऱ्या प्रादेशिक यंत्रणांची कार्यक्षमता वाढविणे, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या कामाचा दर्जा उंचावणे व पाण्याची गुणवत्ता वाढविणे तसेच पाणी गुणवत्ता बाधित व टंचाईग्रस्त भागामध्ये गुणवत्तापूर्ण आणि शाश्वत पाणी पुरवठ्याच्या सोयी/सुविधा उपलब्ध करण्यावर भर देण्यासाठी ग्रामीण पुरवठा योजनांच्या प्रगतीचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण किमान २ वेळा म्हणजेच साधारणपणे योजनेचे २० ते ३० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर व ६० ते ७० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर करण्यात यावे, असे बंधन घालण्यात आले आहे. तथापि, अंमलबजावणी यंत्रणा यापेक्षा अधिक वेळा योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करून घेऊ शकतात.

त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणाऱ्या यंत्रणा/संस्था यांना त्यांचे सर्व कामकाज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली पार पाडावयाचे आहे. तसेच त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणाऱ्या यंत्रणेद्वारे पडताळणी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व आवश्यकतेप्रमाणे प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना सादर करावयाचा आहे.

**४. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी- :—**

४.१. योजनेची निश्चिती झाल्यानंतर, योजनेच्या अंमलबजावणीसाठी ग्रामसभेच्या मान्यतेने **"ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची"** स्थापना करण्यात येते. या समितीत ग्रामपंचायतीचे १/३ सदस्य, ५० टक्के महिला व मागासवर्गीय प्रतिनिधी आणि गाव/वाडी/वस्त्याचे प्रतिनिधी असतात. योजनेसाठी प्राप्त होणारा शासकीय निधी व लोकवर्गणीची रक्कम ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सदर समितीच्या नावाने बँकेत उघडलेल्या स्वतंत्र खात्यात जमा केली जाते. योजनेसंबंधीचे सर्व आर्थिक व्यवहार करण्याचे अधिकार या समितीला आहेत. या योजनेच्या कामाचा आढावा वेळोवेळी ग्रामसभेमध्ये घेतला जातो.

४.२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास शासनामार्फत थेट निधी उपलब्ध करून दिला जातो.

४.३ राज्य शासनाचा किमान गरजा कार्यक्रम (महाजल), केंद्र शासनाचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, जलस्वराज्य प्रकल्प, आपलं पाणी याद्वारे पाणी पुरवठा योजना राबविल्या जातात.

४.४ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करताना रु. १.०० लक्ष पेक्षा जास्त अशी कोणतीही खरेदी करताना तसेच रु. ५.०० लक्ष व त्यापेक्षा जास्त मूल्य किमतीची कामे करताना ई निविदा प्रक्रियेचा अवलंब केला जातो.

४.५ भूजलाच्या अति उपशामुळे पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांवर विपरित परिणाम होतो. यासाठी भूजल कायदा १९९३ अंतर्गत टँकरग्रस्त गावात पाणी साठा वाढविण्यासाठी उपलब्ध पाण्याचे न्याय्य वाटप करण्यासाठी व भूजलाचा अति उपसा रोखण्यासाठी त्रिसूत्री कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाने ग्रामसभेला ग्रामस्तरावर अधिकार दिलेले आहेत.

**५. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (MRDWP) :—**

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राज्यातील एकूण १,००,६३९ गावे/वाड्यापैकी दिनांक १ एप्रिल २०१६ पर्यंत ८९,४०४ गावे/वाड्या पूर्णतः हाताळण्यात आल्या असून, उर्वरित ११,२३५ अंशतः हाताळलेल्या गावे/वाड्यांचा समावेश सन २०१५-२०१६ च्या वार्षिक कृती आराखड्यात करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाने, दिनांक ११ मे २०१५ च्या पत्रान्वये प्रगतीपथावरील ग्रामीण पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यास प्राधान्य देण्याचे सूचित केले असून, दिनांक २९ जून २०१५ च्या पत्रान्वये जास्त कालावधीसाठी रखडलेल्या पाणी पुरवठा योजनांची बाब राज्य शासनाच्या निदर्शनास आणली आहे. त्यानुसार (१) फ्लोराईड व आर्सेनिक बाधित गावे/वाड्यांसाठी कायमस्वरुपी व तात्पुरती उपाययोजना (२) संसद आदर्श ग्राम योजनेअंतर्गत समाविष्ट गावे/वाड्या व (३) राज्यामध्ये प्रगतीपथावर योजना नसल्यासच नवीन योजना घेणे या वर्गवारीतील गावे/वाड्यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही नवीन योजना घेण्यात येऊ नयेत अशा सूचना केंद्र शासनाने दिल्या आहेत.

राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हाताळण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा एकमेव कार्यक्रम राबविण्यात येत असून पाणी पुरवठा या मुलभूत बाबीसाठी राज्यास पूर्णपणे केंद्र शासनावर अवलंबून राहावे लागत आहे. केंद्र शासनाकडून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमामधून तूर्त बंद केलेले निधी वितरण व राज्याचे केंद्र शासनावर असलेले अवलंबित्व या बाबींचा विचार करता ग्रामीण भागात पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा पुरवठा करण्यासाठी राज्य शासनाचा स्वतःचा महत्वाकांक्षी कार्यक्रम असणे अत्यंत आवश्यक झाले होते.

वरील परिस्थिती विचारात घेऊन मंत्रिमंडळाच्या दिनांक ६ एप्रिल २०१६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार राज्यातील ग्रामीण भागातील पाणी पुरवठा क्षेत्रात करण्याच्या उद्देशाने व ग्रामीण जनतेस स्वच्छ आणि पुरेसे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाचा स्वतःचा सर्वसमावेशक असा ग्रामीण पाणी पुरवठ्याचा कार्यक्रम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याविषयी सर्वकष विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :—

राज्यातील ग्रामीण भागातील दीर्घकालीन गरजांचा व आरोग्याचा विचार करुन ग्रामीण जनतेस पुरेसे व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याकरिता "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (Mukhyamantri Rural Drinking Water Programme- MRDWP)" या नावाखाली एक सर्वसमावेशक कार्यक्रम राबविण्यास, दिनांक ७ मे २०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राज्यभरात सन २०१६-२०१७ ते २०१९-२०२० या चार वर्षासाठी राबविण्यात येणार असून या कार्यक्रमाचे तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाची उद्दिष्टे, व्याप्ती, कार्यक्रमाचे वर्गीकरण, कार्यक्रमातील घटक, दरडोई पाणी पुरवठ्याचे प्रमाण, गाव निवडीचे निकष, प्राधान्यक्रम, योजनांची तांत्रिक, प्रशासकीय मान्यता, योजनांची अंमलबजावणी, देखभाल दुरुस्ती, त्रयस्थ तांत्रिक परीक्षण, मानके, योजनांचे नियोजन, अटी-शर्ती, योजनांची आखणी, निधीची तरतूद, अंमलबजावणीसाठी वेळापत्रक, प्रशासकीय यंत्रणा इत्यादि बाबी पुढीलप्रमाणे राहतील :—

**१. कार्यक्रमाची उद्दिष्टे :—**

(अ) राज्यातील ग्रामीण जनतेस पुरेसे व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे.

(आ) राज्यातील ग्रामीण भागात (गावे/वाड्या/वस्त्या) पाणी पुरवठा योजना राबविणे.

या कार्यक्रमांतर्गत राज्यातील ग्रामीण भागात पिण्याचा पाणी पुरवठा करण्यासाठी शासनमान्य मानकांप्रमाणे दर्जा वाढ करण्यासाठी पाणी पुरवठा योजना हाती घेण्यात येतील.

**२. कार्यक्रमांतर्गत राबवावयाच्या योजनांकरिता प्रशासकीय निधीची तरतूद :—**

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची प्राक्कलने व आराखडे तयार करण्यासाठी, योजनेच्या प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सल्ल्यासाठी आणि योजनेच्या प्रशासकीय खर्चासाठी ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या एकूण प्रत्यक्ष कामाच्या खर्चाच्या अधिकतम ४ टक्के मर्यादेपर्यंतचा खर्च प्रशासकीय खर्च म्हणून अंदाजपत्रकात तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच प्रशासकीय निधीची तरतूद जिल्हा परिषदांसाठी लागू करण्यात आली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी, दिनांक २८ सप्टेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये एकूण प्रत्यक्ष कामाच्या खर्चाच्या अधिकतम ४ टक्के मर्यादेपर्यंतचा खर्च प्रशासकीय खर्च म्हणून अंदाजपत्रकात तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राज्यभरात सन २०१६-२०१७ ते २०१९-२०२० या चार वर्षांसाठी राबविण्यात येणार असून, या कार्यक्रमाचे प्रामुख्याने **खालील तीन प्रकारात वर्गीकरण** करण्यात आले आहे.

(अ) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या **नवीन योजना.**

(आ) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत **बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन.**

(इ) **प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती.**

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता सन २०१६-२०१७ ते २०१९-२०२० या चार वर्षांसाठी खालीलप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे—

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | कार्यक्रमाचे उपघटक/वर्गीकरण | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | (MRDWP) अंतर्गत घ्यावयाच्या नवीन योजना | ५००.०० | ५००.०० | ५००.०० | ५००.०० | २०००.०० |
| २. | बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन. | १३०.८६ | ... | ... | ... | १३०.८६ |
| ३. | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती. | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | ४००.०० |
| | एकूण ... | ७३०.८६ | ६००.०० | ६००.०० | ६००.०० | २५३०.८६ |

(अ) **मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या नवीन योजना :—**

(i) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या एकूण १००३ नवीन योजनांपैकी ९७२ योजना स्वतंत्र स्वरुपाच्या आहेत. तर ३१ योजना प्रादेशिक स्वरुपाच्या आहेत. याकरिता रुपये २,००० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

(ii) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नव्याने हाती घ्यावयाच्या पाणी पुरवठा योजनांची व्यवहार्यता तपासण्यासाठी अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

(iii) रुपये ५.०० कोटी किंमतीपर्यंतच्या व दरडोई खर्चाच्या निकषात बसणाऱ्या योजनांना जिल्हा परिषद स्तरावरुन प्रशासकीय मंजुरी देण्यात येणार आहे. त्याकरिता जिल्हा परिषद स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

(iv) रुपये ५.०० कोटी पेक्षा जास्त किंमतीच्या व दरडोई खर्चाच्या निकषात न बसणाऱ्या योजनांना शासन स्तरावरुन (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) प्रशासकीय मंजुरी देण्यात येणार आहे. त्याकरिता मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

(v) तसेच रुपये ५.०० कोटी किंमतीपर्यंतच्या योजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषदेमार्फत व रुपये ५.०० कोटी पेक्षा जास्त किंमतीच्या योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे.

(ब) **राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन :—**

(i) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या तथापि, सद्यःस्थितीत बंद असलेल्या ८. [illegible]शिक पाणी पुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्यासाठी रुपये १३०.८६ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

(ii) या योजनांच्या पुनरुज्जीवनाची, पुढील देखभाल दुरुस्तीची, संचलन व संनियंत्रणाची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची राहणार आहे.

**(क) प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती :—**

(i) राज्यातील ५३१ प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीकरिता सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या कालावधीत प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता रु. १०० कोटी याप्रमाणे एकूण रुपये ४०० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

(ii) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता रुपये ५००.०० कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**६. स्त्रोत बळकटीकरण :—**

६.१ पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांचे स्त्रोतांचे बळकटीकरण करण्यासाठी राज्यात **"शिवकालीन पाणी साठवण योजना"** राबविण्यात येत आहे. या योजनेत स्त्रोत बळकटीकरणासाठी पारंपारिक व अपारंपारिक जसे जॅकेटवेल, फ्रॅक्चर सिल सिमेंटेशन, नाला तळ विस्फोटक तंत्र इत्यादी उपाययोजना घेणे, घरांच्या/इमारतींच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे संकलन करून पिण्यास उपलब्ध करणे व त्याचा उपयोग भूजल पुनर्भरणासाठी करणे, व डोंगरी भागात खडकातील टाक्या बांधून पावसाचे पाणी साठविणे या उपाययोजनांचा समावेश आहे.

६.२ शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांना मंजुरी देण्याचे अधिकार जिल्हास्तरावरील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील समितीस देण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत निवड करावयाच्या गावांनी जल अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, गावातील एकूण उपलब्ध पाणी विचारात घेवून गावाने पिक पद्धती ठरवावयाची आहे.

६.३ शिवकालीन पाणी साठवण योजनेंतर्गत वरील सर्व कामे लोकसहभागावर आधारित असून प्रस्तावित योजनेच्या १० टक्के सहभाग हा गावाने देणे अनिवार्य होते. तथापि, शासनाने घेतलेल्या सुधारित धोरणात्मक निर्णयानुसार आता शिवकालीन पाणी साठवण योजनेमध्ये रु. १० लाख पर्यंतच्या खर्चाच्या योजनांना लोकवर्गणीतून सूट देण्यात आली आहे.

६.४ शिवकालीन पाणी साठवण योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा ही प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा (Project Implementing Agency) म्हणून काम करणार असून योजनेच्या संनियंत्रणासाठी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा अंतर्गत राज्य, विभाग व जिल्हास्तरावर स्वतंत्र कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे.

६.५ केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP) २००९-२०१० पासून सुरु केलेला आहे. या कार्यक्रमाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार स्त्रोत बळकटीकरणाच्या उपयोजनांसाठी केंद्र शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीच्या १० टक्के निधी शिवकालीन पाणी साठवण योजनेकरिता वापरण्यात येत आहे. सन २०१५-२०१६ च्या स्त्रोत बळकटीकरण कार्यक्रमाच्या कृती आराखड्यानुसार राज्यात ४२०० गावे/वाड्यात उपाययोजना राबविण्यात येत आहेत, माहे मार्च २०१६ पर्यंत १५६६ गावे/वाड्यांचे उद्दिष्ट साध्य करण्यात आले असून, यासाठी केंद्र व राज्य हिस्सा मिळून एकूण रु. १०६७.७० कोटी (केंद्र रु. ५८४.०० व राज्य रु. ४८३.७०) कोटी खर्च झालेला आहे, तसेच १८९१ गावे/वाड्यांचे उद्दिष्ट सन २०१६-२०१७ मध्ये घेण्यात आले असून, त्यापैकी ३८० गावे/वाड्यांचे उद्दिष्ट ऑक्टोबर २०१६ अखेर पूर्ण करण्यात आले आहे.

६.६ दिनांक १ एप्रिल २०१६ रोजीच्या सर्वेक्षणानुसार राज्यात १००६३९ गावे/वाड्या असून, राज्यातील एकूण ११.२३ कोटी लोकसंख्येपैकी ग्रामीण लोकसंख्या ६.६१४ कोटी म्हणजेच ५५ टक्के आहे. या कार्यक्रमाअंतर्गत दिनांक ३१ मार्च २०१६ पर्यंत ८९४५५ गावे/वाड्याच्या योजना हाताळल्या असून एकूण ११२३५ अंशतः हाताळण्यात आल्या आहेत.

**७. जलस्वराज्य-२ :—**

जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने जलस्वराज्य-२ हा प्रकल्प राज्यातील ग्रामीण भागात राबविण्यास मंत्रीमंडळाने, दिनांक २० नोव्हेंबर २०१३ च्या बैठकीत मान्यता प्रदानित केली आहे.

जलस्वराज्य-२ या जागतिक बँक सहाय्यीत कार्यक्रमास अर्थसहाय्य करण्याबाबत केंद्र शासनाने तत्वतः सहमती दर्शविली आहे व त्यासंदर्भात दिनांक ३० मे २०१४ रोजी जागतिक बँकेबरोबर करार करण्यात आलेला असून, जलस्वराज्य-२ कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे.

सदर कार्यक्रमाचा कालावधी कार्यक्रम सुरू झाल्यापासून ६ वर्षांचा राहणार आहे. (२०१४-२०२०) या कार्यक्रमाची किंमत २३५ दशलक्ष डॉलर असून त्यापैकी ७० टक्के कर्ज (१६५ दशलक्ष डॉलर) जागतिक बँक व ३० टक्के (७० दशलक्ष डॉलर) राज्य शासनाचा सहभाग राहणार आहे.

**कार्यक्रमाची उद्दिष्टे :—**

७.१ राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता सेवांचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व शाश्वतता या क्षेत्रातील संस्थांच्या कामगिरीचा दर्जा उंचाविणे.

७.२ निम शहरी गावांमध्ये आणि पाणी गुणवत्ता बाधित व पाणी टंचाईच्या भागांमध्ये गुणवत्तापूर्ण आणि शाश्वत पाणी पुरवठा सेवा पुरविणे.

**कार्यक्रमाचे घटक :–**

जलस्वराज्य-२—कार्यक्रमामधील गुंतवणूक ही तीन मुख्य घटकांतर्गत होणार आहे.

**(अ) मुख्य भौतिक गुंतवणूक :—**

या अंतर्गत निम शहरी भागातील जनतेला वाढीव पाणी पुरवठा व स्वच्छता सेवा सुविधा पुरविणे, पाणी गुणवत्ता बाधित गावे/वाड्या/वस्त्यांसाठी कमी खर्चाच्या रासायनिक दुषितीकरण सौम्य करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, दुर्गम किंवा पाणी टचाई असलेल्या भागामध्ये पर्जन्यजल साठवण उपाययोजना आणि अतिशोषित पाणलोट क्षेत्रामध्ये जलधर स्तरावर पाणी व्यवस्थापन विकसित करणे या बाबी समाविष्ट आहेत.

(ब) **इतर भौतिक गुंतवणूक :—**

या अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागातील तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील प्रयोगशाळांचे बळकटीकरण, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्थेस (मित्रा, नाशिक) पाणी व स्वच्छता क्षेत्रातील उत्कृष्टता केंद्र म्हणून विकसित करणे, जिल्हा परिषदांमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील उपविभागीय कार्यालयांमध्ये सोयी सुविधा विकसित करणे या बाबी समाविष्ट आहेत.

(क) **मृदू घटकांसाठीची गुंतवणूक :—**

यामध्ये पाणी पुरवठा आणि स्वच्छता क्षेत्रातील संस्थांचे बळकटीकरण, क्षमता बांधणी, कार्यक्रम व्यवस्थापन तसेच क्षेत्र सुधारणेसाठी निर्माण केलेल्या पदांचे वेतन, भत्ते व अनुषंगिक खर्च, क्षेत्रस्तरीय संनियंत्रण व मूल्यमापन प्रणाली विकसित करणे इत्यादी घटक समाविष्ट आहेत.

२. **कार्यक्रमाचे कार्यक्षेत्र :—**

जलस्वराज्य-२ कार्यक्रमातील मुख्य भौतिक गुंतवणूक व अनुषंगिक बाबींची अंमलबजावणी राज्यातील सहा महसुली विभागातील प्रत्येकी २ अशा खालील १२ जिल्ह्यांमध्ये करण्यात येईल.

| अनुक्रमांक | महसूल विभाग | | जिल्हे |
|---|---|---|---|
| १. | अमरावती | ... ... | अमरावती व बुलढाणा |
| २. | औरंगाबाद | ... ... | नांदेड व औरंगाबाद |
| ३. | कोकण | ... ... | रायगड व रत्नागिरी |
| ४. | नागपूर | ... ... | नागपूर व चंद्रपूर |
| ५. | नाशिक | ... ... | जळगाव व अहमदनगर |
| ६. | पुणे | ... ... | पुणे व सातारा |

या व्यतिरिक्त इतर गुंतवणूक राज्यातील ३४ ग्रामीण जिल्ह्यांमध्ये करण्यात येईल.

**जलस्वराज्य-२ या कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे कर्मचारीवृंद आहे**

## मंत्रालयीन आस्थापनेवरील पदे

| अनुक्रमांक | पदनाम | | वेतन बँड (रुपये) | ग्रेड वेतन (रुपये) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| १. | संचालक तथा उपसचिव | ... ... | १५,६००-३९,१०० | ७,६०० | १ |
| २. | प्रकल्प व्यवस्थापक | ... ... | १५,६००-३९,१०० | ७,६०० | १ |
| ३. | क्षमता बांधणी तज्ञ | ... ... | १५,६००-३९,१०० | ७,६०० | १ |
| ४. | तांत्रिक अधिकारी | ... ... | १५,६००-३९,१०० | ७,६०० | १ |
| ५. | लघुलेखक | ... ... | ९,३००-३४,८०० | ४,३०० | १ |
| ६. | उप लेखापाल | ... ... | ९,३००-३४,८०० | ४,२०० | १ |
| ७. | लिपिक-टंकलेखक | ... ... | ५,२००-२०,२०० | १,९०० | २ |
| ८. | वाहन चालक-नि-सर्वसाधारण सहायक | ... | ५,२००-२०,२०० | १,९०० | २ |
| ९. | शिपाई | ... ... | ४,४४०-७,४४० | १,३०० | २ |
| | | | | एकूण ... | १२ |

**मंत्रालयीन आस्थापनेवरील तात्पुरती पदे**

| अनुक्रमांक | पदनाम | | वेतन बँड (रुपये) | ग्रेड वेतन (रुपये) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| १. | अवर सचिव (आस्थापना) | ... ... | १५,६००-३९,१०० | ६,६०० | १ |
| २. | सहायक | ... ... | ९,३००-३४,८०० | ४,३०० | १ |
| ३. | लिपिक (रोखशाखा) | ... ... | ५,२००-२०,२०० | १,९०० | १ |
| | | | | एकूण ... | ३ |

**जलस्वराज्य-२ कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्षासाठी कार्यक्रम कालावधीकरिता निर्माण करण्यात आलेली तात्पुरती पदे**

| अनुक्रमांक | पदनाम | वेतन बँड (रुपये)/ एकत्रित मानधन | ग्रेड वेतन (रुपये) | एकूण पदे | नियुक्तीची पद्धत (प्रतिनियुक्ती/कंत्राटी) |
|---|---|---|---|---|---|
| १. | वित्त नियंत्रक ... | १५,६००-३९,१०० | ७,६०० | १ | प्रतिनियुक्ती |
| २. | कार्यकारी अभियंता ... | १५,६००-३९,१०० | ६,६०० | १ | प्रतिनियुक्ती |
| ३. | जल-भू-वैज्ञानिक ... | १५,६००-३९,१०० | ५,४०० | १ | प्रतिनियुक्ती |
| ४. | उप अभियंता ... | १५,६००-३९,१०० | ५,४०० | १ | प्रतिनियुक्ती |
| ५. | वरिष्ठ लेखाधिकारी ... | १५,६००-३९,१०० | ५,४०० | १ | प्रतिनियुक्ती |
| ६. | संनियंत्रण व मूल्यमापन तज्ञ ... | प्रतिनियुक्तीसाठी १५,६००-३९,१०० किंवा कंत्राटीसाठी एकत्रित रु. ५०,००० | ६,६०० | १ | प्रतिनियुक्ती/कंत्राटी |
| ७. | कक्ष अधिकारी ... | १५,६००-३९,१०० | ५,४०० | १ | प्रतिनियुक्ती |
| ८. | सहायक लेखा अधिकारी ... | ९,३००-३४,८०० | ४,४०० | २ | प्रतिनियुक्ती |
| ९. | सहायक संनियंत्रण व मूल्यमापन तज्ञ | ९,३००-३४,८०० कंत्राटीसाठी एकत्रित रु. ३०,००० | ४,४०० | २ | प्रतिनियुक्ती/कंत्राटी |
| १०. | कनिष्ठ शाखा अभियंता ... | ९,३००-३४,८०० | ४,४०० | २ | प्रतिनियुक्ती |
| ११. | लघुलेखक ... | ९,३००-३४,८०० | ४,३०० | १ | प्रतिनियुक्ती |
| १२. | शिपाई ... | ४,४००-७,४४० | १,३०० | १ | प्रतिनियुक्ती |
| १३. | संपादणूक तज्ञ ... | रु. ५०,००० | | १ | कंत्राटी |
| १४. | वित्तीय तज्ञ ... | रु. ५०,००० | | १ | कंत्राटी |
| १५. | पर्यावरण व्यवस्थापन तज्ञ ... | रु. ५०,००० | | १ | कंत्राटी |
| १६. | ज्ञान व्यवस्थापन तज्ञ ... | रु. ५०,००० | | १ | कंत्राटी |
| १७. | समाज व्यवस्थापन तज्ञ ... | रु. ५०,००० | | १ | कंत्राटी |
| १८. | व्यवस्थापन माहिती प्रणाली तज्ञ ... | रु. ५०,००० | | १ | कंत्राटी |
| १९. | माहिती तंत्रज्ञान तज्ञ ... | रु. ५०,००० | | १ | कंत्राटी |
| २०. | लेखा सहायक ... | रु. ३०,००० | | १ | कंत्राटी |
| २१. | सहायक व्यवस्थापन माहिती प्रणाली तज्ञ | रु. ३०,००० | | १ | कंत्राटी |
| २२. | सहायक माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ | रु. ३०,००० | | १ | कंत्राटी |
| २३. | सहायक क्षमता व बांधणी तज्ञ ... | रु. ३०,००० | | १ | कंत्राटी |
| २४. | निम्न व्यवसायी (डेटाएन्ट्री ऑपरेटर) | रु. १२,००० | | १० | कंत्राटी |
| | | | एकूण ... | ३६ | |

**राज्यस्तरीय विशेष संनियंत्रण कक्ष (तांत्रिक) करिता मंजूर पदे खालीलप्रमाणे**

| अनुक्रमांक | पदनाम | वेतन बँड (रुपये) | ग्रेड वेतन (रुपये) | एकूण पदे | नियुक्तीचा प्रकार (प्रतिनियुक्ती/कंत्राटी) |
|---|---|---|---|---|---|
| १. | अधीक्षक अभियंता ... | १५,६००-३९,१०० | ७,६०० | १ | प्रतिनियुक्ती |
| २. | कार्यकारी अभियंता ... | १५,६००-३९,१०० | ६,६०० | १ | प्रतिनियुक्ती |
| ३. | उप अभियंता ... | १५,६००-३९,१०० | ५,४०० | १ | प्रतिनियुक्ती |
| ४. | कनिष्ठ/शाखा अभियंता ... | १५,६००-३९,१०० | ४,४०० | १ | प्रतिनियुक्ती |
| ५. | सहायक लेखाधिकारी ... | ९,३००-३४,८०० | ४,४०० | १ | प्रतिनियुक्ती |
| ६. | निम्न व्यवसायी (डेटाएन्ट्री ऑपरेटर) | रु. १२,००० | | २ | कंत्राटी |
| | | | एकूण ... | ७ | |

८. **पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था :—**

८.१ केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील पाणी व स्वच्छता संस्थेमध्ये संवाद व क्षमता विकास कक्ष आणि भारत निर्माण कक्ष यांचे विलिनीकरण करून एकंदर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेची (WSSO) स्थापन करण्यात आली आहे. सदर संस्थेचे मुख्यालय सिडको भवन (दक्षिण कक्ष), दुसरा माळा, बेलापूर, नवी मुंबई येथे आहे.

पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेमध्ये खालीलप्रमाणे **शाखा स्थापन** करण्यात आल्या आहेत.

१. पाणी पुरवठा शाखा
२. पाणी गुणवत्ता शाखा
३. माहिती-शिक्षण-संवाद शाखा
४. मानव संसाधन विकास शाखा
५. संशोधन व विकास शाखा
६. स्वच्छता शाखा
७. लेखा शाखा
८. आस्थापना शाखा

पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेचे संचालक, अतिरिक्त संचालकांचे व केंद्र शासन सहाय्यीत सल्लागार यांचे वेतन व भत्ते राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत केंद शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सहाय्य निधीमधून अदा करण्यात येतात. UNICEF सहाय्यीत सल्लागारांचे वेतन व भत्ते UNICEF कडून अदा करण्यात येतात.

**८.२ पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेची कार्ये व जबाबदारी :—**

१. ग्रामीण पाणी पुरवठा व ग्रामीण स्वच्छता क्षेत्राच्या कार्यप्रणाली विषयक (Software Aspects) बाबी हाताळणे,
२. शासनाचा पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा आणि जिल्हा परिषद यामधील दूवा म्हणून काम करणे,
३. पंचायत राज संस्था आणि ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांचेसाठी जलसुरक्षा योजना तयार करणे, जलसुरक्षा योजनेवर आधारित ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी व देखभाल-दुरुस्ती करिता सहाय्य करणे,
४. मनुष्यबळ विकास व माहिती, शिक्षण व संवाद यामधील कामे हाती घेणे,
५. पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाचे मूल्यमापन व परिणाम निर्धारण अभ्यास करणे, संशोधन व विकास यामधील कामे हाती घेणे व त्यातील निष्कर्षाच्या आधारे विविध कार्यक्रमात सुधारणा करण्यासाठी ते शासनास सादर करणे,
६. पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण आणि इतर बाबींकरिता एमआयएस व संगणकीकरण, GIS Mapping आणि Online संनियंत्रण पद्धती विकसीत करणे,
७. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) कार्यक्रम इ. चे भौतिक व आर्थिक संनियंत्रण करणे, आढावा घेणे,
८. जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन आणि गट संसाधन केंद्रे यामधील सल्लागार व कर्मचारी यांच्या कामकाजाचे संनियंत्रण व समन्वय करणे,
९. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) कार्यक्रम इत्यादिच्या संदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व जिल्हा परिषदा यांच्याशी समन्वय साधणे,
१०. केंद्र व राज्य शासन यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशांचे पालन करणे.
११. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम योजनेचे संनियंत्रण व मूल्यमापन करणे.

**८.३ जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष :—**

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांच्या संनियंत्रणाखालील संपूर्ण स्वच्छता अभियान कक्ष (TSC Cell) आणि कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांच्या संनियंत्रणाखाली जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष (DWSM Cell) यांचे विलिनीकरण करण्यात येऊन एकिकृत **जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष** स्थापन करण्यात आला आहे.

जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन कक्षात **खालीलप्रमाणे शाखा** स्थापन करण्यात आल्या आहेत.

१. स्वच्छता शाखा (SANITATION CELL)
२. पाणी पुरवठा शाखा (WATER SUPPLY CELL)
३. पाणी गुणवत्ता शाखा (WQ CELL)
४. माहिती-शिक्षण-संवाद शाखा (IEC CELL)
५. मनुष्यबळ विकास शाखा (HRD CELL)
६. संनियंत्रण व मुल्यमापन शाखा (M & E CELL)
७. वित्त शाखा (FINANCE CELL)
८. आस्थापना शाखा (ESTABLISHMENT CELL)

**संनियंत्रण** : जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे संनियंत्रण उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) जिल्हा परिषद यांच्याकडे आहे.

**८.४ जिल्हा पाणीपुरवठा व स्वच्छता मिशन कक्षाची कार्यकक्षा :–**

१. ग्रामीण भागातील पेयजल स्त्रोतांची सुरक्षा व स्वच्छता भारत मिशन (ग्रामीण) विषयक प्रकल्पांची आखणी व संनियंत्रण.

२. पंचायत समिती/ग्रामपंचायतीकडून प्राप्त झालेल्या पाणी सुरक्षितता व शाश्वतता आराखड्यांमधील योजनांची तपासणी करून त्यास मान्यता देणे व सदर आराखडे आवश्यकतेनुसार राज्यस्तरीय योजना मंजुरी समितीस (SLLSC) पाठविणे.

३. राज्य शासनाने ठरवून दिलेले निकष व पद्धतीनुसार समूह चेतना निर्मिती (Community Mobilisation) क्षमता विकास, समूह-संवाद, प्रकल्प व्यवस्थापन आणि प्रचार, प्रसिद्धी याकरीता सेवाभावी संस्था, इतर सक्षम संस्था अथवा सल्लागार यांची पारदर्शक पद्धतीने निवड करणे, त्यांच्यासोबत सामंजस्य करार करणे.

४. जिल्ह्यातील सर्व संबंधीत विभाग उदा. आरोग्य, शिक्षण, वन, महिला व बाल विकास इत्यादी विभागांचे कार्यक्रम जसे राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता अभियान, सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, एकात्मिक बाल विकास कार्यक्रम इत्यादिंशी संवाद व समन्वय साधणे.

५. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) कार्यक्रमाच्या तत्वांच्या अंमलबजावणीबाबत लोकप्रतिनिधी, अधिकारी व सर्व सामान्य नागरिक यांच्यात जागृती निर्माण करणे.

६. जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन, राज्य शासन तसेच केंद्र शासनाशी समन्वय साधणे.

७. सर्व अधिकारी/कर्मचारी यांची क्षमता बांधणे व प्रचार/प्रसिद्धीच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यासाठी संस्थांची नेमणूक करणे.

८. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचे जिल्हा स्तरावरील व्यवस्थापन व संनियंत्रण करणे.

९. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व भारत निर्माण (ग्रामीण) अंतर्गत अनुदानाचे हिशेब ठेवणे व त्यासंदर्भात, उपयोगिता प्रमाणपत्र, लेखापरिक्षण अहवाल तयार करणे.

८.५ **गट संसाधन केंद्र (पाणी पुरवठा व स्वच्छता)** :—केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या ग्रामस्तरावरील अंमलबजावणीसाठी, ग्राम आरोग्य, पोषण, पर्यावरण, पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना मार्गदर्शन व मदत करण्यासाठी त्यांचा तालुकास्तरावरील पंचायत समित्यांशी योग्य समन्वय राखण्यासाठी, तालुकास्तरावर गट संसाधन केंद्र (Block Resource Centres) स्थापन करण्यात आली आहेत. तालुक्याच्या/गटाच्या लोकसंख्येच्या आधारे प्रत्येक गट संसाधन केंद्रामध्ये २ ते ४ कर्मचारी कार्यरत आहेत.

८.६ **गट संसाधन केंद्रांची कार्ये :—**

१. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करण्याकरिता ग्रामस्थांना मदत करणे.

२. ग्रामपंचायत/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे सदस्य आणि ग्रामस्थ यांच्यामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाविषयी जाणीव व जागृती निर्माण करणे व त्यांची संवाद क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे.

३. पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या विविध बाबींवर, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती/ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्राम पातळीवरील विविध कार्यकर्ते (उदा. ASHA/अंगणवाडी कामगार, शिक्षक, स्वयं सहायता गट महिला व युवक मंडळ इ. व ग्रामस्थ यांचेमध्ये माहिती, शिक्षण व संवाद (IEC) क्षमता वाढविण्यासाठी गट व ग्रामस्तरावर प्रशिक्षणाचे वार्षिक कार्यक्रम तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करणे.

४. गट संसाधन केंद्राच्या कार्यक्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत व उपाययोजनांचे व स्वच्छता विषयक उपाययोजनांचे प्राथमिक सर्वेक्षण (BASELINE SURVEY) करण्यासाठी ग्रामपंचायती व पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना मदत करणे.

५. ग्रामस्थ, ग्रामपंचायती व पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांनी वार्षिक गाव कृती आराखडा तयार करण्यासाठी व त्यास ग्राम सभेची मंजुरी मिळविण्यासाठी मदत करणे, आराखड्यामध्ये प्रस्तावित केल्यानुसार, पाणी पुरवठा योजना व स्वच्छतेच्या कामांची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याकरीता पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांना मार्गदर्शन करणे.

६. पाणी पुरवठा, पाणी गुणवत्ता तपासणी व सर्वेक्षण यामध्ये प्रशिक्षित झालेल्या गाव पातळीवरील कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधणे व ते पाणी गुणवत्ता चाचणी व सर्वेक्षण कार्यक्रम राबवित आहेत याची खात्री करण्यासाठी पाठपुरावा करणे.

७. पाणी पुरवठा, पाणी गुणवत्ता तपासणी व सर्वेक्षण तसेच स्वच्छता यांच्याशी संबंधित बाबींवर नियमितपणे लक्ष केंद्रीत केले जात आहे याची खात्री करण्यासाठी ग्रामपंचायती ASHA/अंगणवाडी कामगार, शिक्षक, स्वयं सहायता गट महिला व युवक मंडळे यांच्याशी नियमित संवाद साधणे.

८. शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये आरोग्य व स्वच्छता विषयक चांगल्या सवयीची जाणीव निर्माण व्हावी यासाठी शाळांना भेटी देऊन आरोग्य व स्वच्छता या विषयावर व्याख्याने देणे.

९. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना सामाजिक लेखापरिक्षण आयोजित करण्यासाठी मदत करणे.

१०. पाणी गुणवत्ता चाचणीच्या अहवालानुसार, पाणी पिण्यायोग्य ठेवण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करण्याकरिता ग्रामपंचायती ग्राम/पाणी पुरवठा व स्वच्छता समिती/सार्वजनिक आरोग्य विभाग यांना सावधान करणे व त्यांच्यात समन्वय साधून उपाययोजना करण्याबाबत त्यांना मार्गदर्शन करणे.

११. गट संसाधन केंद्रांची लेखाविषयक माहिती तसेच त्यांच्या भौतिक व आर्थिक प्रगतीची माहिती केंद्र शासनाच्या IMIS वर भरणे. त्याचप्रमाणे गावे/वाड्या/वस्त्या यांची अद्ययावत माहिती IMIS वर भरण्याकरीता माहिती गोळा करण्यासाठी यंत्रणेस मदत करणे.

## ९. पाणी गुणवत्ता कार्यक्रम :—

९.१ राज्यात केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पाणी गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे गुणवत्ता संनियंत्रण, देखरेख, दुरूस्ती व सर्वेक्षणामध्ये लोकांचा सहभाग वाढविणे, ग्रामपंचायतींना ह्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी मध्ये सहभागी करून घेणे व त्यांना सक्षम बनविणे, तसेच सोप्या पध्दतीने पाणी तपासणीच्या संचाचा वापर करणे, लोकांमध्ये स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठ्याबाबत तसेच अशुद्ध पाण्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत जनजागृती वाढविणे, पाणीपुरवठा यंत्रणेतील वेळोवेळी उद्‌भवणारे दोष वा दुरूस्त्या लोक सहभागातून करणे ही प्रमुख उद्दिष्टे आहेत.

९.२ राज्यातील सर्व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या योजनांचे व स्त्रोतांचे GIS च्या मदतीने निश्चितीकरण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

९.३ राज्यातील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या ६ विभागीय पाणी तपासणी प्रयोगशाळांना NABL अधिस्विकृती प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

९.४ राज्यातील १२ जिल्ह्यांतील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत, जड धातू, किटकनाशके, रसायने या बाबीची तपासणी नीरी, नागपूर यांच्या मदतीने पहिल्या टप्प्यात पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरित २२ जिल्ह्यांचे जड धातू, किटकनाशके, रसायने यांची तपासणी पुढील कालावधीत करण्यात येणार आहे.

९.५ राज्यातील पाणी सुरक्षितता आराखडी तयार करण्यासंबंधीचे ३४ जिल्ह्यातील अधिकारी/सल्लागार यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून, गावांचा पाणी सुरक्षितता आराखडा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

९.६ सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या वर्षात अनुक्रमे ४१८२३९ व २०३६८९ इतक्या सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या नमुन्यांची तपासणी होऊन केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर नोंदी घेण्यात आल्या आहेत.

९.७ या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये पाणी गुणवत्तेबाबतच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये असणाऱ्या पाणी पुरवठा कर्मचाऱ्यास जलसुरक्षक म्हणून संबोधण्याबाबत व त्यांच्या नियमित कामांबरोबरच विहित केलेल्या पाणी गुणवत्ता विषयक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी ग्रामपंचायतीकडून देण्यात येणाऱ्या मानधना व्यतिरिक्त प्रोत्साहनपर मानधन देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच पाणी गुणवत्ता हा कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी व पाणी गुणवत्ता विषयक कामाचे सुसुत्रिकरण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात या कार्यक्रमासाठी पूर्णवेळ पाणी गुणवत्ता निरीक्षक, पाणी गुणवत्ता सल्लागार यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच जलस्वराज्य प्रकल्प २ अंतर्गत प्रत्येक उपविभाग स्तरावर पाणी गुणवत्ता सल्लागार यांचीही कंत्राटी तत्वावर नेमणूक करण्यात आलेली आहे.

९.८ या कार्यक्रमांतर्गत ग्राम पातळीपर्यंत लोकांना पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, देखरेख व संनियंत्रण यशस्वीरित्या कशा प्रकारे करावे याबाबत माहिती देण्यासाठी राज्यस्तर/जिल्हास्तर/तालुकास्तर या तीनही स्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये अनुक्रमे राज्यस्तरावर १३५ व २०० अधिकारी/कर्मचारी, जिल्हास्तरावर २२,४११ व १६५२ अधिकारी/कर्मचारी तालुकास्तरावर ५९,४४९ व १३,३२९ अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यामध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, शिक्षण, विस्तार अधिकारी (आरोग्य)/(पंचायत), महिला व बालकल्याण पर्यवेक्षक व प्रयोगशाळा अधिकारी, तांत्रिक कर्मचारी, सरपंच, ग्रामसेवक, आरोग्य सेवक, पाणी पुरवठा कर्मचारी, जलसुरक्षक, बचतगट इत्यादींचा समावेश आहे.

९.९ या विभागाच्या दिनांक १८ डिसेंबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार, पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या उपविभागीय पाणी तपासणी प्रयोगशाळा पाणी पुरवठा विभागांतर्गत असलेल्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. सदर कार्यक्रमामध्ये राज्य/जिल्हा आरोग्य प्रयोगशाळांची मुख्य भुमिका असल्याने कार्यक्रमाची अंमलबजावणी व नियोजन करण्यासाठी या विभागात राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (Neeri) नागपूर व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांची स्टेट रेफरल इंस्टीट्यूट (State Referral Institute) म्हणून नियुक्ती केली आहे. राज्यात हा कार्यक्रम विस्तृत प्रमाणात राबवावयाचा असून या कार्यक्रमांचे राज्यस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व ग्रामपंचयात स्तरावर नियोजन व अंमलबजावणीसाठी यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने ग्रामविकास विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे बरोबर एक समन्वयक समिती बनवली असून, जनतेला शुध्द व सुरक्षित पाणी पुरवठा होण्यासाठी व पाण्याच्या गुणवत्तेचे सातत्य राखण्यासाठी मंत्रालयीन पातळीवर याचा आढावा घेतला जात आहे. जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी व तालुकास्तरावर गट विकास अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली पाणी गुणवत्ता विषयक बाबींचा आढावा घेण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे.

९.१० पाणी गुणवत्ता व संनियंत्रण कार्यक्रमामध्ये स्वच्छता सर्वेक्षणाचे महत्व अनन्य साधारण आहे. स्वच्छता सर्वेक्षणातून स्त्रोताभोवतालचा परिसर, पाणी पुरवठा संरचना व व्यवस्थापनातील जे काही दोष आढळून येतात त्यांचे निराकरण वेळेत करता येऊन संभाव्य साथीस प्रतिबंध करता येतो. केंद्र शासन व जागतिक आरोग्य संघटना यांच्या नवीन निकषाप्रमाणे प्रत्येक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. या विभागाच्या दिनांक २९-८-२०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिनांक २ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०१५ या कालावधीत, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण व त्या आधारे दिल्या जाणाऱ्या लाल कार्ड, हिरवे कार्ड प्रणालीचे बळकटीकरण व सुसुत्रता आणण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. आरोग्य विभागामार्फत ग्रामपंचायतींना वितरीत करण्यात आलेले लाल कार्ड म्हणजे संपूर्ण ग्रामपंचायत परिसरात अथवा सर्व स्त्रोतांचा पाण्याचा साठा दुषित झाला आहे, तो असुरक्षित झालेला आहे. असुरक्षिततेच्या कारणांकडे लक्ष देवून ते दूर करण्याची गरज आहे.

लाल कार्ड हे त्या ग्रामपंचायतीस संभाव्य साथरोगांबाबत पूर्व सूचना देत असते. लाल कार्ड देण्यात आलेल्या त्रुटी दूर केल्या असता पाण्याची गुणवत्ता चांगली राखता येते.

९.११ पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी राज्यात नवीन प्रयोगशाळा राज्यस्तरीय-१, जिल्हास्तरीय २४ व उपविभागीय १० प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच ६ विभागीय, ४ जिल्हास्तरीय व १३८ उपविभागीय प्रयोगशाळा कार्यरत आहेत. सदर प्रयोगशाळांच्या बांधकामाच्या खर्चास जलस्वराज्य कार्यक्रम-२ मधून मंजुरी देण्यात आली आहे.

९.१२ राष्ट्रीय पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमाची On-line data entry करण्याचे काम सर्व जिल्ह्यांमध्ये चालू आहे. ह्या माहिती आधारे पाणी गुणवत्ता कशी आहे याचा आढावा घेतला जातो.

## १०. ग्रामीण पिण्याच्या पाण्याचा टंचाई कार्यक्रम :—

१०.१ प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी पावसाळा संपल्यानंतर पाणी टंचाई (२० लिटर्स/दिन/व्यक्तीपेक्षा कमी) झालेल्या पर्जन्यमानाचा आढावा घेऊन १ कि.मी. क्षेत्रात ज्या गावांमध्ये/वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचे नियमित स्त्रोत आटले किंवा कमी झाल्याने दरडोई, प्रतिदिनी २० लिटर्सपेक्षा कमी पाणी पुरवठा होईल असा अंदाज आहे, अशा गावे/वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याशी विचार विनिमय करुन (१) ऑक्टोबर ते डिसेंबर, (२) जानेवारी ते मार्च, (३) एप्रिल ते जून अशा तीन स्वतंत्र तिमाहीसाठी टंचाई कृती आराखडे तयार करण्यात येतात. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ खालील अनुज्ञेय उपाययोजनांपैकी योग्य त्या उपाययोजनेची निवड करण्यात येते.

(१) बुडक्या घेणे.

(२) विहिरी खोल करणे/गाळ काढणे.

(३) खाजगी विहिरी अधिग्रहीत करणे,

(४) टँकर/बैलगाड्यांव्दारे पाणी पुरवठा करणे.

(५) प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजनेची कामे तातडीने पूर्ण करणे.

(६) नळ योजनांची विशेष दुरुस्ती,

(७) विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती,

(८) नवीन विंधन विहिरी घेणे,

(९) तात्पुरत्य पूरक नळ योजना घेणे,

(१०) धरणामधे अथवा तलावामध्ये चर खणणे.

१०.२ टँकरने पाणी पुरवठा करणे ही उपाययोजना अधिक खर्चिक व तात्पुरत्या स्वरूपाची आहे. जेथे अन्य उपाययोजना शक्य नाही, तेथेच ही उपाययोजना अनिवार्य ठरते. जिल्हाधिकाऱ्यांची खात्री पटल्यास टँकर लावण्यास मान्यता दिली जाते. दिनांक १ ऑक्टोबर २००६ पासून पाणी टंचाई कार्यक्रम तर्गत घेण्यात येणाऱ्या नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे, विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे. विहित आर्थिक व भौतिक निकषात न बसणाऱ्या टंचाई निवारक उपाययोजनांना शासन स्तरावर सचिव स्तरीय स्थायी समिती मार्फत मंजुरी देण्यात येते.

१०.३ राज्यात दरवर्षी निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी, गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यानंतर, पाणी टंचाई कार्यक्रमाअंतर्गत कोणतीही उपाययोजना घेतल्यास त्याबरोबरच, पुढील वर्षी त्या गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून, ग्रामस्तरावरुन जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांबरोबरच शिवकालीन पाणी साठवण योजना, जलपुनर्भरण कार्यक्रम इत्यादी प्रतिबंधात्मक उपाययोजना ग्रामस्तरावर राबविण्याबाबतचे आदेश दिनांक २७ फेब्रुवारी २००८ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहे.

१०.४ खाजगी टँकर्स व ट्रक्सचे दर दिनांक ३०-४-२०१२ पासून पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात आले आहेत.

| टँकर व ट्रकवरील टाकीची पाणी वहन करण्याची क्षमता | कमाल प्रतिदिन भाडे (रुपये) | कमाल प्रति किलोमीटर भाडे (रुपये) |
|---|---|---|
| १ मे. टन | १५८ | २.०० |
| टँकर/ट्रकवरील टाकीची पाणी वहन करण्याची क्षमता दुर्गम व अतिदुर्गम भागामध्ये अतितीव्र घाट असलेल्या ठिकाणी | कमाल प्रतिदिन भाडे (रुपये) | कमाल प्रति किलोमीटर भाडे (रुपये) |
| ३००० ते ५००० लिटर | १९८ | २.५० |

वरीलप्रमाणे टँकरचे दर निर्धारित केले असले तरी, जिल्हाधिकाऱ्यांनी निविदा मागवून कमीत कमी दरात टँकर उपलब्ध करुन घ्यावयाचे आहे.

१०.५ पाणी टंचाईविषयी उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांचे वित्तीय मंजूरीचे अधिकार शासन निर्णय, दिनांक ४ मे २०१६ अन्वये खालीलप्रमाणे सुधारित करण्यात आले आहेत—

| अ.क्र. | उपाययोजनेचे नाव | जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार | विभागीय आयुक्तांचे अधिकार |
|---|---|---|---|
| (अ) | तात्पुरती पूरक नळ पाणी पुरवठा योजना | रु. २०.०० लक्ष पर्यंत | रु. ५०.०० लक्ष पर्यंत |
| (ब) | नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती | रु. ३०.०० लक्ष पर्यंत | रु. ५०.०० लक्ष पर्यंत |
| (क) | जुन्या विहिरीची दुरुस्ती विहीरी खोल | रु. ०२.०० लक्ष पर्यंत | रु. ०३.०० लक्ष पर्यंत |
| (ड) | धरणामध्ये अथवा तलावामध्ये चर खणणे | रु. ०५.०० लक्ष पर्यंत | रु. १०.०० लक्ष पर्यंत |
| (इ) | पिण्याच्या पाण्याचे टँकर भरण्यासाठी आवश्यक ती तात्पुरती उपाययोजना. | रु. ००.५० लक्ष पर्यंत | रु. ०१.०० लक्ष पर्यंत |
| (ई) | बैलगाडीने पाणी पुरवठा करणे | प्रती दिन प्रती बैलगाडी रु. ५०० पर्यंत | |

१०.६ नागरी व ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास प्रदान करण्यात आलेल्या आर्थिक मर्यादेपेक्षा जास्त किंमतीच्या तसेच विहित निकषात न बसणाऱ्या तातडीच्या उपाययोजनांना तातडीने प्रशासकीय मंजुरी देता यावी म्हणून प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सचिवस्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

१०.७ टंचाई कार्यक्रमाखाली मागील तीन वर्षात ऑक्टोबर ते सप्टेंबर या कालावधीत घेतलेल्या विविध उपाययोजना व झालेला खर्च व हाताळलेली गावे/वाड्या यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

**(अ) विविध उपाययोजनांवर झालेला खर्च** (रुपये कोटीत)

| अ.क्र. | उपाय योजना | २०१३-२०१४ | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ |
|---|---|---|---|---|
| १. | टँकर/बैलगाडीने पाणी पुरवठा करणे | २३२.२९ | ७५.६७ | ३१५.१७ |
| २. | विहिर अधिग्रहीत करणे | ५४.९८ | १३.८१ | ३०.८३ |
| ३. | विहिरी खोल करणे/गाळ काढणे | १.३८ | ०.२७ | १.५९ |
| ४. | बुडकी घेणे | १०.२४ | ०.०२ | ०.२५ |
| ५. | विंधण विहिर/कुपनलिका घेणे | ३४.८२ | ७.५४ | ३५.०८ |
| ६. | नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे | ४९.४३ | १०.८५ | ६१.९४ |
| ७. | विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे | ५.१२ | ०.८७ | ०२.८६ |
| ८. | तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे | ३४.५८ | ३.६५ | २१.०४ |
| ९. | खाजगी विहिर अधिग्रहित करणे | ... | ... | ४१.३१ |
| | एकूण ... | ४२२.८४ | ११२.६८ | ५१०.०७ |

**(ब) विविध उपाययोजनेद्वारे टंचाई कार्यक्रमातंर्गत हाताळलेली गावे/वाड्या**

| अ.क्र. | उपाययोजना | २०१३-२०१४ | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ |
|---|---|---|---|---|
| १. | टँकर/बैलगाडीने पाणी पुरवठा करणे | ६१७२ | २२०४ | १२६१४ |
| २. | विहिर अधिग्रहीत करणे | ४०४१ | ४४२१ | ५१९९ |
| ३. | विहिरी खोल करणे/गाळ काढणे | ४५८ | १२१ | ४४९ |
| ४. | बुडकी घेणे | ... | ०२ | ०२ |
| ५. | विंधण विहिर/कुपनलिका घेणे | ४२९५ | २३९७ | ५७३० |
| ६. | नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे | ५१२ | ४४८ | २१२५ |
| ७. | विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे | २८२० | १४१९ | ३०३० |
| ८. | तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे | १८२ | १४४ | ५१३ |
| ९. | खाजगी विहिर अधिग्रहित करणे | ... | ... | ५३४६ |
| | एकूण ... | १८४८० | ११९५६ | ३५००८ |

**११. निधीची उपलब्धता :—**

११.१ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी जिल्हा वार्षिक योजनेत जिल्हा नियोजन समित्यांच्या मान्यतेने तरतूद केली जाते. तसेच राज्य सर्वसाधारण योजनेतही तरतूद केली जाते. जागतिक बँक व इतर देशांकडूनही अर्थसहाय्य प्राप्त होते. बाह्यसहाय्यित प्रकल्पांसाठी शासनाने केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती संबंधित बाह्य संस्था/देशांकडून केली जाते. भारतीय आयुर्विमा महामंडळ व हुडको या संस्थांकडून शासन हमीवर कर्ज उपलब्ध होते. तसेच, कर्जरोख्याद्वारे निधी उपलब्ध केला जातो. या कर्जाचे मुद्दल व व्याज फेडण्यासाठी तसेच हमी शुल्क भरण्यासाठी अर्थसंकल्पात योजनेतर तरतूद केली जाते.

११.२ केंद्र शासनाकडून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाखाली निधी प्राप्त होतो.

११.३ सन २०१५-२०१६ मध्ये १,६११ गावे/वाड्यांच्या योजना पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते. त्यापैकी, माहे मार्च २०१६ पर्यंत १,५६६ गावे/वाड्यांचे उद्दिष्ट साध्य करण्यात आले असून, यासाठी केंद्र व राज्य हिस्सा मिळून एकूण रुपये १०६७.७० कोटी (केंद्र रुपये ५८४.०० कोटी व राज्य रुपये ४८३.७० कोटी) इतका खर्च झालेला आहे. तसेच सन २०१६-१७ मध्ये १,८९१ गावे/वाड्यांचे उद्दिष्ट घेण्यात आले असून, त्यापैकी ऑक्टोबर २०१६ अखेर ३८० गावे/वाड्यांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे.

११.४ ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारणासाठी तात्पुरत्या उपाययोजना घेण्याकरिता केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती निवारण निधीमधून निधी उपलब्ध केला जात आहे. हा निधी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना सूपूर्द केला जातो.

११.५ जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येणाऱ्या साधी विहिर, विंधण विहिर व नळ योजनांसाठी जिल्हा परिषदांना निधी मंजूर केला जातो. हा निधी जिल्हा परिषदांमार्फत ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना वितरीत केला जातो. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला रोख निधी मंजूर केला जातो. स्वजलधारा कार्यक्रम आणि बाह्य सहाय्यित प्रकल्पाखालील निधी परस्पर गावांना प्राप्त होतो. देखभाल व दुरुस्ती आणि उपअभियानांतर्गत स्त्रोत बळकटीकरणासाठी राखून ठेवलेली तरतूद जिल्हा परिषदांना, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणांना स्वतंत्रपणे मुक्त करण्यात येते.

११.६ पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदांमध्ये निर्माण केलेला विभाग/उपविभाग आणि भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेसाठी वेतन व वेतनेतर बाबींसाठी योजनेतर तरतूद केली जाते.

**१२. कार्यक्रमाचा आढावा :—**

१२.१ दि. १ एप्रिल २०१६ रोजीच्या सर्वेक्षणानुसार राज्यात १,००,६३९ गाव/वाड्या असून, राज्यातील एकूण ११.२३ कोटी लोकसंख्येपैकी ग्रामीण लोकसंख्या ६.६१४ कोटी म्हणजेच ५५ टक्के आहे. या कार्यक्रमांतर्गत ३१ मार्च २०१६ पर्यंत ८७,८१४ गावे/वाड्यांच्या योजना हाताळण्यात आल्या असून. एकूण ११,८५४ गावे/वाड्या अंशतः हाताळण्यात आल्या आहेत.

१२.२ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून नागरी योजनांसाठी (क वर्ग) घेतलेल्या कर्जाच्या हप्त्याच्या ५० टक्के रकमेच्या परतफेडीसाठी तसेच, ग्रामीण पाणीपुरवठा योजनासाठी उभारण्यात आलेल्या कर्जरोख्यांवरील वार्षिक व्याज व मुद्दलाच्या परतफेडीसाठी योजनेत्तर तरतूद महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास मुक्त केली जाते.

**१३. बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन :—**

१३.१ राज्यात एकूण मंजूर १०१२ ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांपैकी ७५६ योजना पूर्ण झाल्या असून त्यापैकी ५५९ योजना कार्यान्वित आहेत. तर, १९७ योजना विविध कारणांमुळे बंद आहेत. योजनेची प्रभावी देखभाल व दुरुस्ती न होणे, स्त्रोत अपुरे ठरणे, त्यातील समाविष्ट गावांना पर्यायी स्त्रोतातून पाणी पुरवठा होत असल्याने योजना बंद होणे, योजना हस्तांतरीत न झाल्याने देखभाल न होणे, तसेच मोठ्या दुरुस्तीची आवश्यकता असल्याने या प्रादेशिक योजना बंद अवस्थेत आहेत. बंद असलेल्या या प्रादेशिक योजनांची देखभाल दुरुस्ती करणे संबंधित गावांच्या संयुक्त समितीला, जिल्हा परिषदांना किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास निधी अभावी शक्य होत नाही, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे, विविध कारणांमुळे बंद असलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्याची आवश्यकता विचारात घेता, राज्यातील बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांसाठी पुनरुज्जीवन योजना सुरू करण्यास शासन निर्णय क्र. ग्रापाधो ११००/प्रक्र. ००७ (ब)/पापु-०७, अन्वये शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

१३.२ सदर पुनरुज्जीवन योजना ही दोन टप्प्यात राबविण्यात येणार आहे. टप्पा-१ अंतर्गत अस्तित्वातील ग्रामीण प्रादेशिक पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये ग्राहक सर्वेक्षण, जी. आय. एस. मॅपिंग, पाणी व ऊर्जा लेखापरिक्षण, वित्तीय व्यवस्थापन यासारख्या प्राथमिक व वित्तीय सुधारणा करणे आणि त्याआधारे टप्पा-२ मध्ये योजनेचे पुनरुज्जीवन करून पाणी पुरवठा व्यवस्था स्थापित करणे आवश्यक आहे.

१३.३ टप्पा-१ अंतर्गत प्राथमिक सुधारणा अहवालाच्या आधारे बंद ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे टप्पा-२ अंतर्गत पुनरुज्जीवन करण्यासाठी खालील कामांना अनुदान अनुज्ञेय ठरविण्यात आले आहे—

१. स्त्रोत कमी पडत असल्याने स्त्रोताचे बळकटीकरण करणे किंवा नवीन स्त्रोत घेणे,

२. योजनेची मुख्य जलवाहिनी निकामी ठरल्याने किंवा मोडकळीस आल्याने, त्याची दुरुस्ती किंवा ती बदलणे,

३. योजनेची पंपींग मशिनरी नादुरुस्त असल्यास, तीची दुरुस्ती व अपवादात्मक परिस्थितीत ती बदलणे,

४. योजनेचे जलशुद्धीकरण केंद्र नादुरुस्त असल्याने, ते दुरुस्त करणे किंवा त्यातील उपांगे बदलणे,

५. योजनेची वितरण व्यवस्था कुचकामी ठरलेली असल्याने, ती दुरूस्त करणे किंवा आवश्यक तेवढा भाग बदलणे,

६. योजनांची साठवण टाकी/ब्रेक प्रेशर टँक यांची दुरूस्ती,

७. योजनांमधील अनेक गावे बाहेर पडल्याने, उर्वरित गावांवर येणारा योजनेच्या कार्यान्वयनाचा ताण कमी करण्यासाठी योजनेमध्ये तांत्रिक बदल करणे.

१३.४ बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचे टप्पा-२ अंतर्गत पुनरुज्जीवन करण्यासाठी ग्रामपंचायतीची संयुक्त समिती/जिल्हा परिषदेचे प्रस्ताव हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत, तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून चालविण्यात येत असलेल्या योजनांचे प्रस्ताव, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत शासनास सादर करण्यात येतील. सदर प्रस्तावांना मंजुरी देण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | ... | अध्यक्ष |
| २. | सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई | ... | सदस्य |
| ३. | सह सचिव/उप सचिव (पापु-०७) | ... | सदस्य |
| ४. | संचालक, पाणी, स्वच्छता व सहाय्य संस्था | ... | सदस्य |
| ५. | मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पापुवस्ववि | ... | सदस्य |
| ६. | अवर सचिव (पापु-०७) | ... | सदस्य सचिव |

१३.५ या समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे—

१. जिल्हा परिषद/महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकीय व्यवहार्यता तपासून मान्यता देणे.

२. बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन सार्वजनिक खाजगी सहभागातून (PPP) करण्यासाठी, तसेच अशा योजनांचे मुल्यमापन करण्यासाठी सल्लागारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. अशा प्रस्तावांची तांत्रिक, आर्थिक, व्यवस्थापकीय दृष्ट्या तपासणी करून सदर योजनेसाठी वर्धनक्षमता अनुदानाच्या प्रमाणाबाबत (Viability Funding) निर्णय घेणे.

३. बंद पडलेल्या योजनांचे पुनरुज्जीवन विविध विकल्पांच्या आधारे करण्यासाठी शक्यता पडताळणे व त्यानुसार निर्णय घेणे.

४. बंद पडलेल्या योजना तसेच पुनरुज्जीवनासाठी मंजूर केलेल्या प्रकल्पांचा वेळोवेळी आढावा घेऊन, पुढील रुपरेषेबाबत शिफारस करणे.

१३.६ समितीने प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर, रु. ३.०० कोटीपर्यंतच्या प्रस्तावांना जिल्हा परिषदेकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. तर रु. ३.०० कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या प्रस्तावांना शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

१३.७ पुनरुज्जीवन योजनेच्या अंतर्गत टप्पा-१ अंतर्गत करावयाच्या प्राथमिक सुधारणांचा खर्च हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या (NRDWP) शाश्वती (Sustainability) अंतर्गत व टप्पा-२ अंतर्गत पुनरुज्जीवनाचा खर्च राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या (NRDWP) व्याप्ती (Coverage) अंतर्गत करण्यात येईल.

**१४. महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजना :—**

१४.१ राज्यातील ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमधील कुटुंबांना खाजगी नळजोडण्या व वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजना राबविण्यास, दिनांक १८ नोव्हेंबर २०११ च्या शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

१४.२ या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांना प्रतिकुटुंब खाजगी नळ जोडणीसाठी रु. ४,००० तर, वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी प्रति कुटुंब रु. ११,००० अनुदान अनुज्ञेय आहे.

१४.३ या योजनेंतर्गत प्रकल्प प्रस्ताव तयार करतांना गावातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमधील कुटुंबांचे सर्वेक्षण करून या कुटुंबाकडील सद्यःस्थितीतील खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालय यांच्या उपलब्धतेची तपासणी करण्यात येईल. ज्या कुटुंबांकडे खाजगी नळ जोडणी आहे, परंतु, वैयक्तिक शौचालय नाही किंवा वैयक्तिक शौचालय आहे, परंतु खाजगी नळ जोडणी नाही तसेच, ज्या कुटुंबांकडे खाजगी नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय या दोन्ही सुविधा उपलब्ध नाहीत अशा कुटुंबांना खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालय उपलब्ध करून देण्यासाठी विहित केलेल्या अनुदानाच्या आधारे, प्रकल्प प्रस्ताव तयार करण्यात येतील.

**१४.४ ग्रामीण दलित वस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजनेंतर्गत घ्यावयाच्या गावांच्या निवडीसाठीचा प्राधान्यक्रम :—**

१. जिल्ह्यातील निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेली गावे, त्यापैकी ज्या गावांची अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांची संख्या जास्त आहे.

२. निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेल्या गावांव्यतिरिक्त अन्य गावे, त्यापैकी ज्या गावांची अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांची संख्या जास्त आहे.

३. जिल्ह्यातील निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेली गावे किंवा त्याव्यतिरिक्त अन्य गावांमध्ये संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत वा अन्य कार्यक्रमांतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांसाठी बांधलेली शौचालये जी मोडकळीस आल्याने वापरण्यास अयोग्य आहेत, अशा शौचालयांची कामे या योजनेतून अनूज्ञेय राहतील.

तक्ता क्रमांक-३

# पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग २०१७-१८

(दोन) वित्तीय आवश्यकता :

(रुपये हजारात)

| अ.क्र. | तपशील | झालेला खर्च, २०१५-२०१६ | | | अर्थसंकल्पीय अंदाज, २०१६-२०१७ | | | सुधारित अंदाज, २०१६-२०१७ (प्रस्तावित) | | | अर्थसंकल्पीय अंदाज, २०१७-२०१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | योजनेतर | योजनांतर्गत | एकूण | योजनेतर | योजनांतर्गत | एकूण | योजनेतर | योजनांतर्गत | एकूण | प्रस्तावित तरतुद |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| (अ) | कार्याचे वर्गीकरण– | | | | | | | | | | |
| | ग्रामीण पाणी पुरवठा योजना ... | १९२८६८३ | ६९७२१११ | ८९००७८४ | २२६३५८४ | १२५१२२२१ | १४७७५८०५ | २२५२३३९ | १७२७६९४२ | १९५२९२८१ | १४२५०००२ |
| | एकूण (अ) स्थूल बेरीज | १९२८६८३ | ६९७२१११ | ८९००७८४ | २२६३५८४ | १२५१२२२१ | १४७७५८०५ | २२५२३३९ | १७२७६९४२ | १९५२९२८१ | १४२५०००२ |
| | वजा–वसुली | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| | एकूण (अ) निव्वळ | १९२८६८३ | ६९७२१११ | ८९००७८४ | २२६३५८४ | १२५१२२२१ | १४७७५८०५ | २२५२३३९ | १७२७६९४२ | १९५२९२८१ | १४२५०००२ |
| (ब) | उदिष्टवार वर्गीकरण– | | | | | | | | | | |
| (१) | नळ पाणी पुरवठा योजना (स्थानिक स्तर) | ... | ५७६०६ | ५७६०६ | ... | ११०२०४ | ११०२०४ | ... | ११०२०४ | ११०२०४ | सामाजिक न्याय वि. मार्फत तरतुद |
| (२) | नळ पा[illegible]रवठा योजना (राज्य स्तर) | ... | १५९०८०० | १५९०८०० | ... | ९७१५०० | ९७१५०० | ... | १४०१३७२ | १४०१३७२ | ५००००० |
| (३) | विंधण [illegible] ... | ... | १८२०० | १८२०० | ... | २२८२७ | २२८२७ | ... | २३३७७ | २३३७७ | |
| (४) | साध्या विहिरी ... | ... | ३९४४७ | ३९४४७ | ... | ४१४८४ | ४१४८४ | ... | ४१४८४ | ४१४८४ | सामाजिक न्याय वि. मार्फत तरतुद |
| (५) | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (केंद्र हिस्सा) | ... | ४५८५५६३ | ४५८५५६३ | ... | १०३००००० | १०३००००० | ... | १०३००००० | १०३००००० | सामाजिक न्याय वि. मार्फत तरतुद ८६००००० |
| (६) | इतर कार्यक्रम ... | १९२८६८३ | ४६५४९५ | २३९४१७८ | २२६३५८४ | ५६६२०६ | २८२९७९० | २२५२३३९ | ४४१२५०५ | ६६६४८४४ | ३१५०००२ |
| (७) | बाह्य सहाय्यित योजना ... | ... | २१५००० | २१५००० | ... | ५००००० | ५००००० | ... | ९८८००० | ९८८००० | २०००००० |
| | एकूण (ब) स्थूल बेरीज | १९२८६८३ | ६९७२१११ | ८९००७९४ | २२६३५८४ | १२५१२२२१ | १४७७५८०५ | २२५२३३९ | १७२७६९४२ | १९५२९२८१ | १४२५०००२ |
| | वजा–वसुली | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| | एकूण (ब) निव्वळ बेरीज | १९२८६८३ | ६९७२१११ | ८९००७९४ | २२६३५८४ | १२५१२२२१ | १४७७५८०५ | २२५२३३९ | १७२७६९४२ | १९५२९२८१ | १४२५०००२ |
| (क) | वित्त व्यवस्थेची साधने– | | | | | | | | | | |
| | प्रधान शीर्ष–२२१५ | | | | | | | | | | |
| | पाणी पुरवठा व स्वच्छता– | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| | एकूण (क) स्थूल बेरीज | १९२८६८३ | ६९७२१११ | ८९००७९४ | २२६३५८४ | १२५१२२२१ | १४७७५८०५ | २२५२३३९ | १७२७६९४२ | १९५२९२८१ | १४२५०००२ |
| | वजा–वसुली | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| | एकूण (क) निव्वळ बेरीज | १९२८६८३ | ६९७२१११ | ८९००७९४ | २२६३५८४ | १२५१२२२१ | १४७७५८०५ | २२५२३३९ | १७२७६९४२ | १९५२९२८१ | १४२५०००२ |

### तक्ता क्रमांक ४

**राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत (NRDWP) पाणी गुणवत्ता बाधीत व पार्शिअली कव्हर्ड/दुबार हाताळणी नुसार हाताळावयाच्या गावे/वाड्यांची माहिती**

| अ.क्र. | जिल्हा | पाणी गुणवत्ता बाधीत व पार्शिअली कव्हर्ड/ दुबार हाताळणी शिल्लक गावे/वाडया हाताळावयाची दि. १-४-२०१५ रोजीची स्थिती | सन २०१५-१६ मध्ये साध्य केलेल्या गावे/वाडयांची स्थिती | दि. ३१-३-२०१६ रोजी शिल्लक गावे/वाडयांची स्थिती | दि. १-४-२०१६ रोजी नव्याने समस्याग्रस्त आढळलेल्या गावे/वाड्यांची स्थिती | दि. १-४-२०१६ रोजी हाताळावयाच्या शिल्लक एकूण गावे/वाडया | सन २०१६-२०१७ चे भौतिक उद्दिष्ट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | पालघर | ३२० | ४९ | २७१ | ७५४ | १०२५ | १०० |
| २. | ठाणे | १७९ | २० | १५९ | २६४ | ४२३ | ४८ |
| ३. | रायगड | ३२५ | ३५ | २९० | ४५९ | ७४९ | ६० |
| ४. | रत्नागिरी | ६८८ | ६० | ६२८ | २६० | ८८८ | ४६ |
| ५. | सिंधुदूर्ग | ४४८ | ५१ | ३९७ | ... | ३४३ | ९४ |
| | **कोकण विभाग** | **१९६०** | **२१५** | **१७४५** | **१७३७** | **३४२८** | **३४८** |
| ६. | पुणे | ५३० | ६७ | ४६३ | ८५५ | १३१८ | ८० |
| ७. | सातारा | ४१९ | २१ | ३९८ | ६९ | ४६७ | ४६ |
| ८. | सांगली | ७२७ | १११ | ६१६ | ... | ५१४ | १५३ |
| ९. | सोलापूर | ६१५ | १०४ | ५११ | १०७६ | १५८७ | ११३ |
| १०. | कोल्हापूर | ५०० | १०१ | ३९९ | ... | ३९९ | १८३ |
| | **पुणे विभाग** | **२७९१** | **४०४** | **२३८७** | **२०००** | **४२८५** | **५७५** |
| ११. | नाशिक | ५७१ | ६३ | ५०८ | ८६ | ५९४ | ६४ |
| १२. | धुळे | १५७ | २५ | १३२ | ... | १३२ | १७ |
| १३. | नंदूरबार | ८९ | ७ | ८२ | ... | ७८ | ६ |
| १४. | जळगाव | ३८९ | २३ | ३६६ | १३५ | ५०१ | १९ |
| १५. | अहमदनगर | ७०७ | १२९ | ५७८ | ३३६ | ९१४ | ९१ |
| | **नाशिक विभाग** | **१९१३** | **२४७** | **१६६६** | **५५७** | **२२१९** | **१९७** |
| १६. | औरंगाबाद | ३२९ | ३२ | २९७ | ९ | ३०६ | ६२ |
| १७. | जालना | ४२२ | ३१ | ३९१ | ... | २१५ | २५ |
| १८. | परभणी | २१५ | ६६ | १४९ | ... | ८५ | ५३ |
| १९. | हिंगोली | ९० | २७ | ६३ | ... | ३८ | १७ |
| २०. | नांदेड | ४६६ | १२८ | ३३८ | ... | २१६ | १०७ |
| २१. | उस्मानाबाद | १७८ | ४४ | १३४ | ... | ५७ | ३० |
| २२. | बीड | ५१४ | ४८ | ४६६ | ... | १९६ | ६५ |
| २३. | लातूर | १८८ | ४२ | १४६ | ... | ६५ | ४३ |
| | **औरंगाबाद विभाग** | **२४०२** | **४१८** | **१९८४** | **९** | **११७८** | **४०२** |
| २४. | अमरावती | १७५ | १३ | १६२ | ... | १३६ | २२ |
| २५. | अकोला | ३०२ | १० | २९२ | ... | २५ | २ |
| २६. | वाशीम | ८३ | ७ | ७६ | ... | ८ | ५ |
| २७. | बुलढाणा | ४०२ | ३९ | ३६३ | ... | २७९ | ११२ |
| २८. | यवतमाळ | १०३ | २५ | ७८ | ... | ५० | ५० |
| | **अमरावती विभाग** | **१०६५** | **९४** | **९७१** | **...** | **४९८** | **१९१** |
| २९. | नागपूर | २३३ | ३७ | १९६ | ... | १३१ | ५७ |
| ३०. | वर्धा | १२२ | ३४ | ८८ | ... | ७७ | ३६ |
| ३१. | भंडारा | ८५ | २७ | ५८ | ... | ५५ | १० |
| ३२. | गोंदिया | १५८ | २६ | १३२ | ... | ११२ | २१ |
| ३३. | चंद्रपूर | २०९ | ३० | १७९ | ... | १०८ | १८ |
| ३४. | गडचिरोली | २४६ | ३४ | २१२ | ... | १६१ | ३६ |
| | **नागपूर विभाग** | **१०५३** | **१८८** | **८६५** | **...** | **६४४** | **१७८** |
| | **एकूण** | **१११८४** | **१५६६** | **९६१८** | **४३०३** | **१२२५२** | **१८९१** |

## तक्ता क्रमांक ५

## ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम (सर्वसाधारण)

| अनु- क्रमांक | जिल्हा | सन १९९७-९८ ते २०१६-१७ या कालावधीतील एकूण योजना | पूर्ण झालेल्या योजना | समाविष्ट गावे/वाड्या (संख्या) | योजनेसाठी झालेला एकूण खर्च (रु. लाखांत) | अपूर्ण योजना | अपूर्ण योजनेसाठी झालेला खर्च (रु. लाखांत) | अपूर्ण योजनेसाठी लागणारा आवश्यक निधी (रु. लाखांत) | सन २०१७-१८ मधील अपेक्षित खर्च (रु. लाखांत) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | ठाणे | १०६ | ७८ | १०६ | २१९८.३९ | २८ | ६६४.८६ | ५५९.६६ | ५०५.४२ |
| २. | पालघर | २९ | २० | ५७४ | २०४५७.११ | ९ | १६३११.८७ | १९०९.०० | ७११६.३६ |
| ३. | रायगड | १७६ | १६५ | ११५० | २२३५७.७३ | ११ | १.१४ | ११५.०२ | ४९६.२८ |
| ४. | रत्नागिरी | २४३५ | १८२८ | ३९८१ | १७४२४.२७ | ७०७ | ९०३०.७२ | ७७७२.९८ | ७६८२.६७ |
| ५. | सिंधुदूर्ग | ६८१ | ६४५ | २६२ | १७७७.२४ | ३५ | ५१८.१५ | १२१६.१७ | १२१६.१७ |
| ६. | पुणे | १३२६ | ९९० | १३८० | २३७८०.९८ | ३३६ | २१११.१० | २३२७.१७ | ३१५१.५३ |
| ७. | सोलापूर | ४८२ | ४७६ | १२५६ | ११६०३.२२ | ६ | ७८०७.६२ | ३८२०.०० | २६७०.०० |
| ८. | सांगली | १०३७ | १००७ | ३०१ | ७०२१.६३ | ६४ | ७०२१.६३ | ३४३७.४७ | ४७०० ०० |
| ९. | कोल्हापूर | १३६ | १३५ | २७५ | १०४४९.१७ | १ | ६१०.२४ | ९२८.५८ | ९२८.५८ |
| १०. | सातारा | ७०३ | ४३२ | ७०३ | ७४४२.८३ | २७१ | ५१७५.३९ | ३६६५.७२ | ३६६५.७२ |
| ११. | नाशिक | ११४२ | १००६ | ११४२ | ६०४१.१७ | १३६ | ६०४१.१७ | १००५.३१ | १००५.३१ |
| १२. | जळगाव | १३९ | १३७ | ३०५ | १७११.८७ | ६ | २०४६.४४ | २४२५.४७ | ७६०.०० |
| १३. | धुळे | ५८ | ५८ | २४९ | ... | ... | ... | ... | ... |
| १४. | नंदूरबार | ४२ | ५ | ४२ | ३७६.१३ | ३७ | ३२५.४४ | ९८.८८ | ९८.८८ |
| १५. | अहमदनगर | ७६६ | ५८३ | १०४८ | १५९७४.३५ | १८३ | ... | ४०२१.०० | ३४५६.८२ |
| १६. | औरंगाबाद | ११० | १०६ | १८० | २१८९२.०० | ४ | २२१८.७० | २६४४.१० | १५९८.७० |
| १७. | जालना | ९०४ | ८४९ | ९०८ | ५२१९.९४ | ३५ | ११९३.७७ | ८१७१.०० | ३२००.०० |
| १८. | बीड | १११ | ११० | ११५ | ९४६१.९७ | १ | ६८५.६७ | ४७८.०५ | ४७८.०५ |
| १९. | नांदेड | ६१ | ४९ | ७७ | ४४२५.७७ | १२ | ६२६१.१३ | ३०९०.०२ | १६९०.१९ |
| २०. | परभणी | ६७ | ६७ | ७० | ७७०४.७१ | ... | १२३८.८४ | ६२.६७ | ६२.६७ |
| २१. | हिंगोली | ३३ | ३२ | २६३ | १०३९१.२४ | १ | ३८०.०० | ९९.८३ | १०.०० |
| २२. | लातूर | ७४ | ६७ | ८०५ | १६९२७.४९ | ७ | २६४२.०० | ७२७.९९ | १४०.९५ |
| २३. | उस्मानाबाद | ५५५ | ५२७ | ६१० | १४४८६.६८ | २८ | ४३५.७५ | १२२६.४१ | १२२६.४१ |
| २४. | नागपूर | १६३ | १६० | २२६ | १५९५५.२४ | ३ | ७६३८.०७ | १२६३३.०० | ४०१८.०० |
| २५. | भंडारा | ८० | ७९ | १७० | ११३८२.२८ | १ | २०५६.३३ | १००.०० | ३५०.०० |
| २६. | गोंदिया | ४९ | ४८ | ३३८ | १५१२३.८२ | १ | १४०३.६९ | ३५०.०० | ८६५.०० |
| २७ | चंद्रपूर | ९१ | ७१ | ७१ | ४००९.४२ | २० | ११८९.०० | १३७७.०० | ४००.०० |
| २८ | गडचिरोली | १०५ | १५१ | ११६ | २६३२.५० | ८ | ३७०.८७ | १०९३.८८ | ५८३.५२ |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | ३६ | [illegible] | [illegible] | [illegible] | १३९३.[illegible] | [illegible] |
| ३० | अमरावती | [illegible] | [illegible] | १३६ | [illegible] | [illegible] | २११.६३ | ४७२.[illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | |
| | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | | [illegible] | [illegible] | |
| | | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | | [illegible] | [illegible] | |

**तक्ता क्रमांक ६**

## ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम (विशेष घटक योजना)

| अनु-क्रमांक | जिल्हा | सन १९९७-९८ ते २०१६-१७ या कालावधीतील एकूण योजना | पूर्ण झालेल्या योजना | समाविष्ट गावे/वाड्या (संख्या) | योजनेसाठी मार्च २०१६ अखेर झालेला एकूण खर्च (रु. लाखात) | अपूर्ण योजना | अपूर्ण योजनेसाठी झालेला खर्च (रु. लाखात) | अपूर्ण योजनेसाठी लागणारा आवश्यक निधी (रु. लाखात) | सन २०१७-१८ मधील अपेक्षित खर्च (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | ठाणे | १६ | १६ | १६ | ३०.५३ | ... | ... | ... | ... |
| २. | पालघर | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३. | रायगड | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४. | रत्नागिरी | १६२ | १३० | १२५ | १५७.०० | ३२ | १७३.५७ | १३१.१७ | १३१.१७ |
| ५. | सिंधुदूर्ग | १५२ | ११५ | ९४ | २५६.१३ | ३७ | १३९.६५ | ३००.०० | ३१६.०८ |
| ६. | पुणे | १२५ | १२५ | १२५ | ५६७.६८ | ... | ... | ... | ... |
| ७. | सोलापूर | १० | ९ | १० | ४५५.४२ | ... | ३६.१० | १५.०० | ... |
| ८. | सांगली | ५४ | ४८ | १६ | ७७.१० | १३ | ७७.१० | ४०.८९ | २५.८५ |
| ९. | कोल्हापूर | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १०. | सातारा | ६४० | ६६७ | ६४० | १६७१.५७ | १३ | १३.५६ | ५८.९६ | ५८.९६ |
| ११. | नाशिक | ४ | ४ | ४ | ३७.३० | ... | ३७.३० | ... | ... |
| १२. | जळगाव | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १३. | धुळे | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १४. | नंदूरबार | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १५. | अहमदनगर | १४७ | १३१ | १५२ | ७४१.१६ | १६ | १२८.८३ | १२१.९० | १२१.९० |
| १६. | औरंगाबाद | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १७. | जालना | २१३ | १८७ | २१३ | ५००.६४ | २६ | २२.०० | ५५.०० | ५५.०० |
| १८. | बीड | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १९. | नांदेड | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २०. | परभणी | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २१. | हिंगोली | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २२. | लातूर | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २३. | उस्मानाबाद | १२३ | १२३ | १२३ | १५५.०४ | ... | ... | ... | ... |
| २४. | नागपूर | १ | १ | १ | २७.०३ | ... | ... | ... | ... |
| २५. | भंडारा | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २६. | गोंदिया | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २७. | चंद्रपूर | ३३ | २९ | २९ | २३०.०० | ४ | १३.८६ | १६.१४ | ... |
| २८. | गडचिरोली | ८ | ... | ९ | ५९.१३ | ... | ... | ... | ... |
| २९. | वर्धा | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३०. | अमरावती | ७ | ७ | ७ | ९३.५२ | ... | ... | ... | ... |
| ३१. | यवतमाळ | १ | १ | २ | १५.०८ | ... | ... | ... | ... |
| ३२. | अकोला | ६७ | ६७ | ६७ | १५३.३७ | ... | ... | ... | ... |
| ३३. | बुलढाणा | ६२३ | ६२३ | ६२३ | ३६३.३५ | ... | ... | ... | ... |
| ३४. | वाशिम | ८ | ४ | ८ | २०९.६४ | १० | २०९.६४ | ३८.८५ | २६८.०४ |
| | एकूण ... | २३९४ | २२८७ | २२६४ | ५८००.६९ | १५१ | ८५१.६१ | ७०७.९१ | १०६७.०० |

**तक्ता क्रमांक ७**

**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम (आदिवासी उपयोजना)**

| अनु-क्रमांक | जिल्हा | सन १९९७-९८ ते २०१६-१७ या कालावधीतील एकूण योजना | पूर्ण झालेल्या योजना | समाविष्ट गावे/वाड्या (संख्या) | योजनेसाठी मार्च २०१६ अखेर झालेला एकूण खर्च (रु. लाखात) | अपूर्ण योजना | अपूर्ण योजनेसाठी झालेला खर्च (रु. लाखात) | अपूर्ण योजनेसाठी लागणारा आवश्यक निधी (रु. लाखात) | सन २०१७-१८ मधील अपेक्षित खर्च (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | ठाणे | १२५ | ८५ | १२५ | १५०२.९१ | ४० | ८३६.८१ | १९७.३१ | ६६.४५ |
| २. | रायगड | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३. | रत्नागिरी | १ | १ | २ | ४.०९ | ... | ... | ... | ... |
| ४. | सिंधुदूर्ग | ४ | १ | ४ | ३.२३ | ३ | ... | १४.६९ | १४.६९ |
| ५. | नाशिक | ११३५ | ९१७ | ११३५ | ६७७२.१२ | २१८ | ६७७२.१२ | ९०७.७२ | ९०७.७२ |
| ६. | धुळे | ४३८ | ३७६ | १८२ | १७२८.३९ | ६२ | २४५.४९ | ४३९.१२ | ४३९.१२ |
| ७. | नंदूरबार | ४६६ | ५२ | ४६६ | २८८४.१७ | ४१४ | २४८४.६६ | ८४४.१५ | ८४४.१५ |
| ८. | जळगाव | १३९ | १३४ | ३०५ | १३८७२.८३ | ५ | ८६१.१३ | ४७१८.९८ | ९८६.०० |
| ९. | अहमदनगर | ४५ | ४३ | ८३ | ९००.०९ | ४ | ... | १३०.८३ | ६०.४२ |
| १०. | पुणे | ९८ | ७१ | ९२ | ५९७२.३५ | २७ | ५४.२९ | ३५.९३ | ३१४.५३ |
| ११. | सातारा | २ | १ | ... | ४.५७ | १ | ४.५७ | ५.५९ | ५.५९ |
| १२. | सांगली | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १३. | सोलापूर | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १४. | कोल्हापूर | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १५. | औरंगाबाद | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १६. | जालना | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १७. | परभणी | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १८. | हिंगोली | २२ | ४ | २२ | ३०६.४८ | १८ | ६.०० | १७०.२२ | ८०.०० |
| १९. | बीड | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २०. | नांदेड | ७ | ७ | १२ | ४३७.११ | ... | ... | ... | ... |
| २१. | उस्मानाबाद | २ | २ | २ | ३.०० | ... | ... | ... | ... |
| २२. | लातूर | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २३. | बुलढाणा | ३१ | २९ | २८ | ९६.५५ | २ | ४८.०२ | ... | २०८.०० |
| २४. | अकोला | २४ | १८ | २४ | ११८.१४ | ५ | ४६.२९ | २५.१२ | २०.७५ |
| २५. | वाशिम | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २६. | अमरावती | २६९ | २५८ | २६९ | ५७१६.३५ | ११ | २५८.९० | १०२२.१६ | ६०७.८६ |
| २७. | यवतमाळ | १० | ९ | ९ | ३६६.९० | १ | १९.१९ | २१.१९ | २१.१९ |
| २८. | वर्धा | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २९. | नागपूर | ४ | ४ | ५ | ३०१.२९ | ... | ... | ... | ... |
| ३०. | भंडारा | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३१. | गोंदिया | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३२. | चंद्रपूर | ५५ | ४८ | ४८ | २१६१.६८ | ७ | ३८.५१ | २५.५४ | ... |
| ३३. | गडचिरोली | ७९ | ७४ | ८० | २०७४.२० | २५ | ११५.३६ | ५१८.३४ | ३१९.२१ |
| ३४. | पालधर | ४ | ३ | १५ | ४८६.८१ | १ | ४५.०० | १.०० | ... |
| | एकूण | २९६० | २१३७ | २९०८ | ४५७१३.२६ | ८४४ | ११८३६.३४ | ९०७७.८९ | ४८९५.६८ |

तक्ता क्रमांक ८

## भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडील जलभंजन पथकांचे कार्यक्रम अंदाजपत्रक २०१७-१८

| अ.क्र. | जलभंजन पथक | | २०१५-२०१६ | | | २०१६-२०१७ | | | २०१७-२०१८ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उद्दिष्ट विं. वि. | साध्य विं. वि. | झालेला खर्च (रु. लाखांत) | उद्दिष्ट विं. वि. | सप्टेंबर २०१६ अखेर साध्य करावयाचे उद्दिष्ट विं. वि. | झालेला खर्च (रु. लाखांत) | उद्दिष्ट विं. वि. | अपेक्षित विं. वि. | अपेक्षित खर्च (रु. लाखांत) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १. | नाशिक ... | १०० | ९८ | ५.२९ | १०० | ... | ... | १०० | १०० | ६.०० |
| २. | [redacted]मदनगर ... | १०० | ११० | ५.९४ | १०० | २५ | १.५० | १०० | १०० | ६.०० |
| ३. | [redacted] ... | १०० | १०० | ५.४० | १०० | २५ | १.५० | १०० | १०० | ६.०० |
| ४. | [redacted]ली ... | १०० | १२४ | ६.७० | १०० | २५ | ०.५० | १०० | १०० | ६.०० |
| ५. | [redacted]ापूर ... | १०० | ८२ | ४.४३ | १०० | २२ | १.३२ | १०० | १०० | ६.०० |
| ६. | [redacted]रंगाबाद ... | १०० | ५५ | २.९७ | १०० | ५७ | ३.४२ | १०० | १०० | ६.०० |
| ७. | [redacted]ना ... | १०० | ५४ | २.९२ | १०० | २८ | १.६८ | १०० | १०० | ६.०० |
| ८. | [redacted] ... | १०० | १५७ | ८.४८ | १०० | २४ | १.४४ | १०० | १०० | ६.०० |
| ९. | परभणी ... | १०० | ४० | २.१६ | १०० | ३६ | २.१६ | १०० | १०० | ६.०० |
| १०. | [redacted]रावती ... | १०० | ९२ | ४.९७ | १०० | ... | ... | १०० | १०० | ६.०० |
| ११. | बुलढाणा ... | १०० | ८२ | ४.४३ | १०० | ५ | ०.३० | १०० | १०० | ६.०० |
| १२. | [redacted]पूर ... | १०० | १०३ | ५.५६ | १०० | ... | ... | १०० | १०० | ६.०० |
| | एकूण | १२०० | १०९७ | ५९.२४ | १२०० | २४७ | १४.८२ | १२०० | १२०० | ७२.०० |

तक्ता क्रमांक ९

## भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडील विंधन यंत्रांचे कार्यक्रम अंदाजपत्रक वर्ष २०१७-२०१८

| अ.क्र. | विभाग | विंधन यंत्र क्र. | २०१५-२०१६ अपेक्षित काम मीटर्स | २०१५-२०१६ केलेले काम मीटर्स | २०१५-२०१६ आलेला खर्च रुपये लाखात | २०१६-२०१७ अपेक्षित काम मीटर्स | २०१६-२०१७ सप्टेंबर २०१६ अखेर केलेले काम मीटर्स | २०१६-२०१७ झालेला खर्च रु. लाखात | २०१७-२०१८ अपेक्षित काम मीटर्स | २०१७-२०१८ अपेक्षित खर्च (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १. | पुणे | (जेसीआर-१) | ४२०० | ६६१६ | ५.७८ | ४२०० | ३६० | ०.९९ | ४२०० | ११.५५ |
| २. | औरंगाबाद | (जेसीआर-एमपी-१) | ४२०० | ३१५ | ०.८७ | ४२०० | १३८० | ३.८० | ४२०० | ११.५५ |
| ३. | अमरावती | (जेसीआर-एमपी-२) | ४२०० | ४८० | १.३२ | ४२०० | ... | ... | ४२०० | ११.५५ |
| ४. | नागपूर | (जेसीआर-एमपी-३) | ४२०० | ... | ... | ४२०० | ६४८ | १.७८ | ४२०० | ११.५५ |
| ५. | पुणे | (टीएमआर) | १८०० | ... | ... | १८०० | ... | ... | १८०० | ४.९५ |
| | | एकूण ... | १८६०० | २८९५ | ७.९६ | १८६०० | २३८८ | ६.५७ | १८६०० | ५१.१५ |

**टिप :** रकाना क्रमांक ८ आणि ११ मध्ये दर्शविलेला खर्च वर्ष २०१५-१६ साठी निश्चित केलेल्या दरानुसार रु. २७५.००प्रती मीटर प्रमाणे आहे. सन २०१६-१७ वर्षासाठी नव्याने दर निश्चित करावयाची कार्यवाही चालू आहे. दर निश्चित केल्यांनतर त्यानुसार दर बदलू शकतो.

### तक्ता क्रमांक १०

### जिल्हा परिषदांकडील पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी वर्गाचा तपशील

| अनुक्रमांक | पदनाम | पदांची वेतन श्रेणी | ग्रेड वेतन | पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | रुपये | रुपये | |
| १. | कार्यकारी अभियंता | १५,६००–३९,१०० | ६,६०० | ३४ |
| २. | उपअभियंता (स्थापत्य) | १५,६००–३९,१०० | ५,४०० | २०७ |
| ३. | उपअभियंता (यांत्रिकी) | १५,६००–३९,१०० | ५,४०० | ६७ |
| ४. | सहायक भू-वैज्ञानिक | ९,३००–३४,८०० | ५,००० | ३३ |
| ५. | कनिष्ठ भू-वैज्ञानिक | ९,३००–३४,८०० | ४,९०० | ६८ |
| ६. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ९,३००–३४,८०० | ४,३०० | ११७२ |
| ७. | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | ९,३००–३४,८०० | ४,३०० | १०१ |
| ८. | सहायक लेखाधिकारी | ९,३००–३४,८०० | ४,३०० | ३४ |
| ९. | कक्ष अधिकारी | ९,३००–३४,८०० | ४,३०० | ३४ |
| १०. | आरेखक | ५,२००–२०,२०० | २,८०० | ३४ |
| ११. | सहायक आवेदक | ५,२००–२०,२०० | २,४०० | ६७ |
| १२. | वरिष्ठ सहायक | ५,२००–२०,२०० | २,४०० | ३७१ |
| १३. | वरिष्ठ सहायक लेखा | ५,२००–२०,२०० | २,४०० | ३४ |
| १४. | यांत्रिकी | ५,२००–२०,२०० | २,४०० | ३४ |
| १५. | वायुसंपिडक चालक | ५,२००–२०,२०० | २,००० | ६६ |
| १६. | रिंगमन | ५,२००–२०,२०० | २,००० | ३४ |
| १७. | कनिष्ठ सहायक | ५,२००–२०,२०० | १,९०० | ५७७ |
| १८. | जॅक हॅमर ड्रिलर | ५,२००–२०,२०० | २,००० | ६६ |
| १९. | संगणक | ५,२००–२०,२०० | १,९०० | ३३ |
| २०. | वाहन चालक | ५,२००–२०,२०० | १,९०० | २३९ |
| २१. | नाईक | ४,४४०–७,४४० | १,६०० | ३३ |
| २२. | परिचर/शिपाई | ४,४४०–७,४४० | १,३०० | ६१८ |
| २३. | चौकीदार | ४,४४०–७,४४० | १,३०० | ३३ |
| २४. | मदतनीस | ४,४४०–७,४४० | १,३०० | ३३ |
| | | | एकूण | ४०२२ |

## ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम

**१. कार्यक्रमाचे स्वरुप :-**

१.१ ग्रामीण भागात शौचालयाच्या अभावामुळे जी दैन्यावस्था दिसून येते, विशेषतः महिलांची जी कुचंबणा होते, तसेच, उघड्यावर शौचास बसण्यामुळे परिसर घाण होतो, त्याकरिता कुटुंबासाठी वैयक्तिक शौचालय बांधण्याचा एक व्यापक कार्यक्रम शासनाने हाती घेतला.

१.२ राज्यात सन २०००-२००१ पासून राबविण्यात येत असलेल्या संपूर्ण स्वच्छता अभियानाचे केंद्र शासनाच्या सुचनांनुसार दिनांक १ एप्रिल २०१२ पासून निर्मल भारत अभियान असे पुनर्नामांकन करण्यात आले होते. आता पुन्हा केंद्र शासनाच्या सुचनांनुसार दिनांक २ ऑक्टोबर २०१४ पासून स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) असे पुनर्नामकरन करण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रम मागणी आधारित तत्वानुसार राबविण्यात येत आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत राज्यातील सर्व कुटुंबांना (महिला कुटुंब प्रमुख असेल तरी सुद्धा) वैयक्तिक शौचालयासाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते. केंद्र शासनाने, दिनांक २ ऑक्टोबर २०१४ पासून एका वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहनपर रक्कम रु. १२,०००/– इतकी केली आहे. यामध्ये केंद्र हिस्सा ६० टक्के असून, राज्य हिस्सा ४० टक्के इतका आहे.

वैयक्तिक स्वच्छते ऐवजी संपूर्ण स्वच्छतेव्दारे गावाचा विकास करण्यावर भर देण्यात आला आहे. यासाठी शासनाने लोक सहभाग व लोक जागृतीवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यासाठी **"संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान"** राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत स्वच्छतेबाबत उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना, पंचायत समिती, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर आणि राज्यातील निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त जिल्हा परिषदांना व पंचायत समित्यांनाही राज्यस्तरावरुन बक्षिसे देण्यात येतात. तसेच, या अभियानांतर्गत कुटुंब कल्याण, पिण्याचे पाणी व सांडपाणी व्यवस्थापन/सामाजिक एकता या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना व या अभियानाची उत्कृष्ट प्रचार व प्रसिद्धी करणाऱ्या पत्रकारास बक्षिसे देण्यात येत आहेत.

**२. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) :-**

२.१ स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत घटकनिहाय निधीची विगतवारी खालील तक्त्यात दर्शविली आहे—

| अ. क्र. | घटक | निधीची विगतवारी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | विवरण | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | लाभार्थी हिस्सा |
| १. | माहिती, शिक्षण, संवाद, सुरुवातीची कामे, क्षमता बांधणी (IEC) | एकूण प्रकल्प किंमतीच्या ८ टक्के पर्यंत | ६० टक्के | ४० टक्के | ०० टक्के |
| २. | फिरता निधी | एकूण प्रकल्प किंमतीच्या ५ टक्के (प्रती जिल्हा रु. ५० लाख पर्यंत) | ६० टक्के | ४० टक्के | ०० टक्के |
| ३. | वैयक्तिक शौचालय | तरतुदीनुसार सर्वांना सहभागी करून घेण्यासाठी प्रत्यक्ष येणारा एकूण खर्च रु. १२,०००/– | रु. ७,२००/– ६० टक्के | रु. ४,८००/– ४० टक्के | ... ०० टक्के |
| ४. | सार्वजनिक शौचालय | तरतुदीनुसार सर्वांना सहभागी करून घेण्यासाठी प्रत्यक्ष येणारा एकूण खर्च (प्रती रुपये दोन लाखाच्या मर्यादेत) | ६० टक्के | ३० टक्के | १० टक्के |
| ५. | प्रशासकीय खर्च | एकूण प्रकल्प किंमतीच्या २ टक्के पर्यंत | ६० टक्के | ४० टक्के | ०० टक्के |
| ६. | घनकचरा/सांडपाणी व्यवस्थापन (भांडवली किंमत) | निर्मल भारत अभियानाप्रमाणे | ६० टक्के | ४० टक्के | ०० टक्के |

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत माहे फेब्रुवारी २०१७ अखेर पर्यंत एकूण १३,६६,१३७ वैयक्तिक शौचालये तसेच ५ सामुदायिक स्वच्छतागृह बांधण्यात आलेली आहे. अनुदानासाठी माहे फेब्रुवारी २०१७ अखेरपर्यंत रुपये ७४,७६८.६१ लक्ष खर्च झालेला आहे. माहे फेब्रुवारी २०१७ अखेरपर्यंत ९,७९६ ग्रामपंचायती (१२,६८८ गावे) हगणदारीमुक्त म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत.

वैयक्तिक शौचालयाच्या (IHLL) बांधकामासाठी प्रोत्साहनपर रक्कम ही प्रती शौचालय रु. १२,०००/– ठरविण्यात आली असून, त्यामध्ये पाणी उपलब्धता, पाणी साठवण, हात धुणे व शौचालय स्वच्छता या बाबींचा समावेश करण्यात आला आहे. या अंतर्गत केंद्राचा हिस्सा ६० टक्के (रु. ७,२००/–) व राज्याचा हिस्सा ४० टक्के (रु. ४,८००/–) इतका आहे.

ग्रामविकास मंत्रालय, केंद्र शासन यांच्या दिनांक २५ नोव्हेंबर २०१४ च्या पत्रानुसार निर्मल भारत व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना यांची असलेली सांगड खंडीत करण्यात आली. तसेच स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) व्यतिरिक्त महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत स्वतंत्रपणे वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम ग्रामीण भागात करण्याचा निर्णय केंद्र शासनाद्वारे घेण्यात आला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक शौचालयाचे बांधकामासाठी रुपये १२,०००/– अनुदान अनुज्ञेय आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA) अंतर्गत पुरविण्यात येत असलेल्या वैयक्तिक शौचालय बांधकामाकरिता देण्यात येणारे प्रोत्साहनपर अनुदान या मिशन अंतर्गत केंद्र शासनाकडून मंजूर निधीतून देण्यात येणार आहे.

इंदिरा आवास योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या शौचालयांसाठी स्वतंत्रपणे निधी अर्थसंकल्पित करण्यात येणार आहे. सदर तरतूद होईपर्यंत या मिशन अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

शाळा व अंगणवाड्यांमध्ये शौचालये बांधण्याची जबाबदारी ही अनुक्रमे शालेय शिक्षण व साक्षरता विभागाकडे आणि महिला व बालविकास विभागाकडे सोपविण्यात आली आहे.

सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षामध्ये या कार्यक्रमासाठी राज्य हिस्सा रुपये ५७,६२५.८७ लक्ष एवढा निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. तर सन २०१७-१८ साठी राज्यस्तरावरून सर्वसाधारण घटकासाठी रु. १०,०८७.७९ लक्ष निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

**३. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान :-**

१. ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचावण्यासाठी सन २०००-२००१ पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत जन जागृतीचा व्यापक कार्यक्रम अंमलात आणण्यात आला. त्यामधून लोकांच्या पुढाकारामध्ये शासनाचा सहभाग असा नवीन विचार विकास योजनांना देण्यात आला. लाकांना प्रोत्साहन देण्यासाठी या अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा सुरु केली आहे. या अभियानास लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने, हा कार्यक्रम आता कायमस्वरुपी राबविण्यात येत आहे.

२. सन २००८-२००९ पासून राबविण्यात येणाऱ्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत जिल्हा परिषद मतदार संघ स्तरावरील मिळालेल्या गुणावरून ग्रामपंचायतींची खालील प्रमाणे प्रतवारी ठरविण्यात येईल.

१. अ– ६० टक्के व त्याहून अधिक गुण

२. ब– ५० टक्के ते ५९ टक्के

३. क– ४९ टक्के व त्यापेक्षा कमी गुण.

३. उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना द्यावयाच्या बक्षिसांचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

| बक्षिस क्रमांक | पंचायत समिती स्तर | जिल्हा स्तर | विभागीय स्तर | राज्य स्तर |
|---|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | रु. २५ हजार | रु. ५ लाख | रु. १० लाख | रु. २५ लाख |
| द्वितीय क्रमांक | रु. १५ हजार | रु. ३ लाख | रु. ८ लाख | रु. २० लाख |
| तृतीय क्रमांक | रु. १० हजार | रु. २ लाख | रु. ६ लाख | रु. १५ लाख |

४. निर्मल पुरस्कार योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून पुरस्कार मिळाल्यानंतर जिल्हा परिषदेला राज्य शासनातर्फे रुपये २० लाख आणि ज्या जिल्ह्यातील सर्वात जास्त अथवा किमान ५० ग्रामपंचायतींना केंद्र शासनाचा निर्मल ग्राम पुरस्कार मिळेल त्या जिल्हा परिषदेस रु. १० लाख, तसेच केंद्र शासनाकडून निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेल्या पंचायत समितीला राज्य शासनातर्फे रुपये ४ लाख अशी बक्षीसे **"राष्ट्रपिता महात्मा गांधी"** यांच्या नावाने देण्यात येतात.

५. ग्राम अभियानांतर्गत सन २००२-२००३ पासून खाली नमूद केल्याप्रमाणे बक्षिसे देण्यात येत आहेत.

१. कुटुंब कल्याण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतीस, स्व. श्री आबासाहेब खेडेकर यांच्या नावाने,

२. पिण्याचे पाणी व सांडपाणी व्यवस्थापन क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतीस, स्व. श्री वसंतराव नाईक यांच्या नावाने,

३. सामाजिक एकता क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतीस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने,

४. या अभियानाची उत्कृष्ट प्रचार व प्रसिध्दी करणाऱ्या पत्रकारास, स्व. श्री यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने, सदर बक्षीस हे केवळ जिल्हा स्तरावर देण्यात येते.

विशेष पारितोषिकांची रक्कम ग्राम विकास व जलसंधारण विभागाद्वारे पुरस्कृत केली जातात.

६. सन २००५-२००६ पासून तालुका, जिल्हा, विभाग व राज्य पातळीवर प्रत्येक स्तरावर पात्र असलेल्या ग्रामपंचायतीमधून स्वच्छ अंगणवाडी व स्वच्छ प्राथमिक शाळांची निवड करून त्यांच्यातून प्रत्येक स्तरावर सावित्रीबाई फुले स्वच्छ अंगणवाडी व साने गुरुजी स्वच्छ प्राथमिक शाळा यांच्या नावाने खालीलप्रमाणे रोख स्वरुपात बक्षीसे देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येत आहे.

| | पंचायत समिती | जिल्हा | विभाग | राज्य |
|---|---|---|---|---|
| प्राथमिक शाळा | रु. १० हजार | रु. ५० हजार | रु. १ लाख | रु. ३ लाख |
| अंगणवाडी | रु. ५ हजार | रु. २५ हजार | रु. ५० हजार | रु. १ लाख |

सन २०१६-१७ मध्ये या अभियानासाठी रुपये १० कोटी इतका निधी राखून ठेवण्यात आला असून, सन २०१७-१८ साठी रुपये ११ कोटी इतक्या निधीची मागणी करण्यात आली आहे.

**४. ग्रामीण भागातील सांडपाणी व्यवस्थापनासाठी नाबार्ड सहाय्यीत ग्रामीण पायाभूत विकास निधी (NABARD) :-**

ग्रामीण पायाभूत विकास निधी मालिका-१९ अंतर्गत २८ गावांमध्ये नाबार्ड अर्थसहाय्यीत **"सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प"** राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्प "सांडपाणी संकलन व्यवस्था" "सांडपाणी संवहन व्यवस्था" आणि "सांडपाणी प्रक्रीया केंद्र" या तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येत आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार ज्या गावांची लोकसंख्या १५,००० वा त्यापेक्षा जास्त आहे. अशा गावांच्या सांडपाणी व्यवस्थापनासाठी नाबार्ड बँकेचे ९५ टक्के अर्थसहाय्य कर्ज स्वरुपात व उर्वरित निधी अनुदान स्वरुपात राज्य शासनाकडून उपलब्ध करण्यात येतो. सदर २८ गावांपैकी २६ गावांच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले असून प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली आहे व त्यावर डिसेंबर २०१६ पर्यंत रुपये ७.३२ कोटी इतका खर्च झालेला आहे.

## तक्ता क्रमांक-११

## ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम

(रुपये हजारात)

| अ.क्र. | तपशील | प्रत्यक्ष खर्च, २०१५-२०१६ | | | अर्थसंकल्प, २०१६-२०१७ | | | सुधारित अर्थसंकल्प २०१६-२०१७ प्रस्तावित | | | अर्थसंकल्पीय अंदाज, २०१७-२०१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | योजनेतर | योजनांतर्गत | एकूण | योजनेतर | योजनांतर्गत | एकूण | योजनेतर | योजनांतर्गत | एकूण | प्रस्तावित तरतुद |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| (अं) | कार्याचे वर्गीकरण– | | | | | | | | | | |
| | ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम... | ... | ५९८८१२० | ५९८८१२० | ... | २०७६८४१६ | २०७६८४१६ | ... | २०७६८४१६ | २०७६८४१६ | २५४४९०७४ |
| | एकूण (अ) स्थूल बेरीज | ... | ५९८८१२० | ५९८८१२० | ... | २०७६८४१६ | २०७६८४१६ | ... | २०७६८४१६ | २०७६८४१६ | २५४४९०७४ |
| | वजा–वसुली | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | एकूण (अ) निव्वळ बेरीज | ... | ५९८८१२० | ५९८८१२० | ... | २०७६८४१६ | २०७६८४१६ | ... | २०७६८४१६ | २०७६८४१६ | २५४४९०७४ |
| (ब) | उद्दिष्टवार वर्गीकरण– | | | | | | | | | | |
| १. | सांडपाणी व्यवस्थापन नाबार्ड (मालीका १९) ... | ... | ११९८२० | ११९८२० | ... | ३५०००० | ३५०००० | ... | ३५०००० | ३५०००० | ५४५८३८ |
| २. | ग्रामीण दलित वस्ती योजना ... | ... | ... | ... | ... | १५०००० | १५०००० | ... | १५०००० | १५०००० | १ |
| ३. | स्वच्छ भारत मिशन ... | ... | ५८६८३०० | ५८६८३०० | ... | २०१६८४१६ | २०१६८४१६ | ... | २०१६८४१६ | २०१६८४१६ | २४७९३२३५ |
| ४. | संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान ... | ... | ... | ... | ... | १००००० | १००००० | ... | १००००० | १००००० | ११०००० |
| | एकूण–(ब) स्थूल बेरीज | ... | ५९८८१२० | ५९८८१२० | ... | २०७६८४१६ | २०७६८४१६ | ... | २०७६८४१६ | २०७६८४१६ | २५४४९०७४ |
| | वजा–वसुली +B | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | एकूण–(ब) निव्वळ बेरीज | ... | ५९८८१२० | ५९८८१२० | ... | २०७६८४१६ | २०७६८४१६ | ... | २०७६८४१६ | २०७६८४१६ | २५४४९०७४ |
| (क) | वित्तीय व्यवस्थेची साधने– | | | | | | | | | | |
| | प्रधान शीर्ष–२२१५ | | | | | | | | | | |
| | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | एकूण–(क) स्थूल बेरीज | ... | ५९८८१२० | ५९८८१२० | ... | २०७६८४१६ | २०७६८४१६ | ... | २०७६८४१६ | २०७६८४१६ | २५४४९०७४ |
| | वजा–वसुली | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | एकूण–(क) निव्वळ बेरीज | ... | ५९८८१२० | ५९८८१२० | ... | २०७६८४१६ | २०७६८४१६ | ... | २०७६८४१६ | २०७६८४१६ | २५४४९०७४ |

# नागरी पाणी पुरवठा व मलनिःसारण कार्यक्रम

## १. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान :—

राज्यातील शहरांमध्ये पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याबाबतचे महत्व विचारात घेऊन महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण जयंती वर्षानिमित्त ''**महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान**'' राबविण्याचा निर्णय दिनांक २२ ऑक्टोबर २००८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. नागरी पाणी पुरवठा, मलनिःसारण, शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापना संदर्भात पर्याप्त, गुणवत्तापूर्ण सेवा किफायतशीर सेवाशुल्कामध्ये उपलब्ध करून देणे व विविध तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याचे उद्दिष्ट निर्धारित करून राज्यातील सर्व नागरिकांना पाणी पुरवठा व मलनिःसारणाच्या सर्वव्यापक सुविधा निश्चितपणे उपलब्ध करून देणे हा महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

राज्य शासनाने आमूलाग्र बदल करून घेतलेल्या या निर्णयाद्वारे पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि यामध्ये तांत्रिक, आर्थिक व पर्यावरणात्मक शाश्वतता आणण्यासाठी राज्यातील नागरी संस्थांना तांत्रिक, व्यवस्थापकीय व वित्तीय सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. **"महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान"** हे नागरी पाणी पुरवठा व स्वच्छता सेवा संदर्भात राज्याने तयार केलेल्या कार्य आराखड्याचाच अविभाज्य भाग आहे. नागरी संस्थांची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे पाणी पुरवठा व मलनिःसारण योजनांसाठी शासकीय अनुदानाव्यतिरिक्त कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही. तसेच वित्तीय संस्था व खुल्या बाजारातून सुद्धा कर्ज उभारण्या इतपत त्यांची स्थिती नसल्यामुळे त्यांना प्राप्त होणाऱ्या अनुदानाच्या वित्तीय आकृतीबंधामध्ये सुधारणा करून अनुदानाच्या प्रमाणात भरीव वाढ केल्यास नागरी संस्थांना कमी कर्ज उभारावे लागेल. तसेच, कर्ज परतफेडीचे उत्तरदायित्व सुद्धा काही अंशी कमी होऊन प्रगतीपथावरील योजना पूर्ण होतील; या उद्देशाने शासकीय अनुदानामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. तथापि, सुधारित वित्तीय आकृतीबंधानुसार वाढीव अनुदान प्राप्त करण्यासाठी नागरी संस्थांना विविध सुधारणा करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सुजल व निर्मल अभियानांतर्गत नागरी पाणी पुरवठा व मलनिःसारण योजनांसाठी सुधारित वित्तीय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नागरी स्थानिक संस्था | अनुदान (टक्के) | कर्ज (टक्के) | नागरी संस्थांचा सहभाग (टक्के) |
|---|---|---|---|---|
| १. | २० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्येच्या महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून) | ५० | ४० | १० |
| २. | उर्वरित महानगरपालिका | ७० | २० | १० |
| ३. | "अ" वर्ग नगरपालिका | ८० | १० | १० |
| ४. | "ब" आणि "क" वर्ग नगरपालिका | ९० | ... | १० |

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियाना अंतर्गत दिनांक ३१-३-२०१५ पर्यंत **रु. १,२३२.२३ कोटी** किंमतीच्या **२५८** पाणी पुरवठा व मलनिःसारणाच्या योजनांना मंजुरी देण्यात आलेली असून, शासनाकडून अनुज्ञेय असलेल्या **एकूण रुपये १,०६८.५९ कोटी** अनुदानापैकी मागणीनुसार दिनांक ३१-७-२०१६ पर्यंत **रुपये ८२२.२३ कोटी** इतके अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियाना अंतर्गत दिनांक ३१-३-२०१५ नंतर कोणत्याही कामास मंजुरी देण्यात येऊ नये; परंतु, दिनांक ३१-३-२०१५ पूर्वी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या कामांकरिता मंजूर किंमतीपैकी देय शासकीय अनुदान नागरी संस्थांना उपलब्ध करून देण्यात यावे असा निर्णय, शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक : सुनिअ-२०१४/प्र. क्र. ८/पापु-२२, दिनांक २३-१-२०१४ अन्वये घेण्यात आला आहे. तसेच, **दिनांक ३१-३-२०१५** नंतर पुढील कामे नगर विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या **JNNURM, UIDSSMT** व नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत घेण्यात यावीत असाही निर्णय सदर आदेशान्वये घेण्यात आला आहे.

## २. नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजना :—

राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील दलित वस्त्यांमध्ये अथवा दलित लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर असणाऱ्या नागरी भागात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी दिनांक २५ ऑगस्ट २००६ च्या शासन निर्णयान्वये नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना नियमितपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही योजना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जातीसाठी आरक्षित प्रभागात राबविण्यात येते. जर या आरक्षित प्रभागात पाणी पुरवठ्याची पर्याप्त सुविधा अस्तित्वात असेल तर, शहरातील अन्य प्रभागांपैकी ज्या प्रभागात अनुसूचित जाती व नवबौद्ध यांची लोकसंख्या किमान १५० आहे तेथे ही योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वर्गवारीनुसार खालीलप्रमाणे अनुदान अनुज्ञेय आहे. सदर अनुदान शासनाकडून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत वाटप करण्यात येते.

| अ. क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | कमाल अनुज्ञेय अनुदान |
|---|---|---|
| १. | महानगरपालिका | रु. ३२.०० लक्ष |
| २. | 'अ' वर्ग नगरपालिका | रु. १५.०० लक्ष |
| ३. | 'ब' वर्ग नगरपालिका | रु. १२.०० लक्ष |
| ४. | 'क' वर्ग नगरपालिका | रु. १०.०० लक्ष |

३.  नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना :—

राज्यातील नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमधील कुटुंबियांना खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालय उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र **सुवर्ण महोत्सवी नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना** राबविण्याचा निर्णय, दि. २५ जून २०१० च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. या योजनेअंतर्गत नागरी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमधील लाभार्थींचा प्राधान्यक्रम निश्चित करतांना शहरातील दलित वस्ती मधील दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमधील कुटुंब, इतर अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमधील कुटुंब व इतर भागात निवास करणारे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमधील कुटुंब याप्रमाणे करण्यात आलेला आहे. या योजनेअंतर्गत नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमधील कुटुंबियांना खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालय उपलब्ध करुन देण्याकरिता, खाजगी नळ जोडण्यासाठी प्रतिकुटुंब रु. ४,०००/– व वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी प्रतिकुटुंब रु. १२,०००/– याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय देण्यात येत होते. नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमधील कुटुंबियांना खाजगी नळजोडण्या व वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी नागरी स्थानिक संस्थांना प्रकल्प किंमतीच्या ९० टक्के अनुदान शासनाकडून अनुज्ञेय होते. तर १० टक्के हिस्सा हा संबंधीत लाभार्थी किंवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी भरावयाचा होता.

मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक १९-३-२०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये, "पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राज्यात महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरी दलितवस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांना शौचालयाचे बांधकाम करण्यासाठी राज्याच्या निधीमधून प्रतिकुटुंब रु. १२,०००/– प्रमाणे अनुदान देण्याची सुरु असलेली योजना बंद करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तथापि, या योजनेमध्ये सुरु असलेली कामे पूर्ण करण्यात यावीत" असा निर्णय घेण्यात आला आहे.

४.  **वर्धित वेग नागरी पाणी पुरवठा योजना :—**

४.१  केंद्र शासनाने आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ज्या शहरांची लोकसंख्या २०,००० व त्यापेक्षा कमी (१९९१ च्या जनगणनेप्रमाणे) आहे. अशा सर्व शहरांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याकरिता वर्धित वेग नागरी पाणी पुरवठा कार्यक्रम सन १९९३-१९९४ पासून सुरु केला आहे. हा कार्यक्रम राबविण्याकरिता केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे येणाऱ्या किमतीच्या ५० टक्के निधी केंद्र शासन देते व उर्वरित निधी लोकवर्गणी वगळता राज्य शासन देते.

४.२  केंद्र शासनाने मंजूर केलेल्या ३७ योजनांपैकी ३५ योजना आजपर्यंत पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित २ योजना प्रगतीपथावर असून, त्यामधून पाणी पुरवठा कार्यान्वित करण्यात आला आहे. पूर्ण झालेल्या ३५ योजनांपैकी ३० योजना संबंधित संस्थेस (नगरपालिकेस/मजीप्रास) हस्तांतरीत झाल्या आहेत. प्रगतीपथावर असलेल्या योजना मार्च २०१७ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

५.  **नागरी भागाकरिता कमी खर्चाची स्वच्छता योजना :—**

५.१  या कार्यक्रमांतर्गत राज्याच्या नागरी भागामध्ये स्वतःच्या मालकीचे घर असूनही शौचालयाची व्यवस्था नसलेल्या आर्थिक दुर्बल घटकांमधील नागरिकांना (एका कुटुंबामध्ये कमाल ५ व्यक्ती गृहीत धरून प्रति कुटुंब शौचालय याप्रमाणे) वैयक्तिक शौचालयांची उपलब्धता व्हावी यासाठी केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक तत्वांनुसार, राज्यातील सर्व शहरांमध्ये वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेअंतर्गत राज्याच्या नागरी भागातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी वैयक्तिक शौचालये बांधण्याकरिता प्रति कुटुंब उत्पन्नाची मर्यादा रु. ३,३००/– प्रतिगृह इतकी विहीत करण्यात आलेली आहे. या कार्यक्रमांतर्गत दोन खड्ड्यांची (Two Pit Pour Flush) अथवा स्थानिक परिस्थितीस अनुरुप अशा पद्धतीची शौचालये बांधण्यात येणार आहेत.

५.२  केंद्र शासनाच्या निर्देशानुसार प्रती शौचालय बांधकामाचा खर्च रु. १०,०००/- याप्रमाणे प्रती कुटुंब वित्तीय सहाय्याचा आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| केंद्र शासनाचे अनुदान | ७५ टक्के | रु.७,५००/- |
| राज्य शासनाचा हिस्सा | १५ टक्के | रु.१,५००/- |
| लाभार्थी हिस्सा | १० टक्के | रु.१,०००/- |

शौचालय बांधकामास स्थानिक परिस्थितीनुसार रु. १०,०००/– पेक्षा होणारा अतिरिक्त खर्च संबंधित नागरी संस्थांच्या स्वःनिधीतून करण्यात येणार आहे.

५.३  प्रत्येक शहरातील आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तींचा सर्व्हे करून लाभार्थ्यांची संख्या निश्चित करणे, लाभार्थ्यांना Biometric पद्धतीची ओळखपत्रे देणे, जनजागृती करण्यासाठी चर्चासत्रे/प्रशिक्षण आयोजीत करणे, लाभार्थ्यांनी करावयाच्या खर्चाची रक्कम गोळा करून ती नागरी संस्थांकडे जमा करणे याकरिता नागरी संस्थांमार्फत नागरी स्वच्छतेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अशासकीय संस्थांची (NGO) निवड करण्यात येणार असून अशा अशासकीय संस्थांना त्यांच्या कामाचा मोबदला एकूण प्रकल्प खर्चाच्या व्यतिरिक्त १५ टक्के मर्यादेपर्यंत उपलब्ध करण्यात येणाऱ्या निधी मधून देण्यात येणार आहे. हा खर्च केंद्र व राज्य शासनामार्फत अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांवर ५:१ या प्रमाणात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

५.४  या योजनेची अंमलबजावणी ही केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व नागरी दारिद्र्य निर्मूलन मंत्रालयाकडून करण्यात येते. प्रकल्प प्रस्तावाच्या मंजूर रकमेपैकी केंद्र शासनाच्या अनुदानाची रक्कम नागरी संस्थांना केंद्र शासनाकडून २ टप्प्यांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्यापैकी २५ टक्के अनुदान संबंधित नागरी संस्थाच्या प्रकल्प प्रस्तावांना केंद्र शासनाकडून मंजुरी देण्यात आल्यानंतर उपलब्ध करून देण्यात येईल. केंद्र शासनाकडून सदर पहिला हप्ता मुक्त करण्यात आल्यानंतर संबंधित नागरी संस्थांना राज्य हिश्श्याचे ५० टक्के अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल. संबंधित नागरी संस्थांची अनुदान उपयोगितेची क्षमता आणि मागणी या बाबी विचारात घेऊन केंद्र शासनाच्या अनुदानाचा उर्वरित हिस्सा मुक्त करण्यात येणार आहे. त्याच धर्तीवर राज्य हिश्श्याच्या अनुदानाचेही वितरण करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने १६ नागरी संस्थांच्या २१ प्रस्तावांना अंतिम मान्यता दिली असून त्यात ३९,६६३ वैयक्तिक शौचालय बांधण्यात येणार असून, त्यापैकी ऑक्टोबर २०१६ पर्यंत २७,१८४ वैयक्तिक शौचालये बांधण्यात आली असून २,१८९ वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

६. नागरी पाणी टंचाई निवारण कार्यक्रम :-

६.१ उन्हाळ्यामध्ये नियमित मिळणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा कमी किंवा दरडोई दरदिवशी ५० लिटर पेक्षा कमी (यापैकी जे कमी असेल ते) पाणी पुरवठा होत असेल, तसेच "क" वर्ग नगरपालिकांसाठी दरडोई प्रतिदिन किमान २० लिटर पेक्षा कमी पाणी पुरवठा होत असेल अशा शहरांच्या पाणी पुरवठ्यात वाढ करण्यासाठी खालील तातडीच्या उपाययोजना घेण्यात येतात.

(१) विंधण विहिरी/नलिकाकूप घेणे.

(२) उच्च क्षमतेच्या विंधण विहिरींवर/नलिकाकूपवर वीजपंप बसविणे, लहान पाईपलाईन टाकणे, पाण्याची टाकी बसविणे.

(३) नदीचे पात्रात, तलावाचे खालील बाजूस किंवा तलावात खुली विहिर घेणे.

६.२ नागरी क्षेत्रातील तातडीच्या पाणी पुरवठा योजनांसाठी दिनांक १ ऑक्टोबर, २००९ पासून खालीलप्रमाणे आर्थिक मर्यादा ठरवून देण्यात आल्या आहेत :-

| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | आर्थिक मर्यादा |
|---|---|---|
| (१) | "क" वर्ग नगरपालिका | रु. १०.०० लक्ष |
| (२) | "ब" वर्ग नगरपालिका | रु. १५.०० लक्ष |
| (३) | "अ" वर्ग नगरपालिका | रु. २५.०० लक्ष |
| (४) | महानगरपालिका | रु. ३०.०० लक्ष |

६.३ वरील आर्थिक मर्यादेच्या अधिन राहून दि. १ ऑक्टोबर २००९ पासून रु. १५.०० लक्ष व रु. ३०.०० लक्ष किंमतीच्या तातडीच्या पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार अनुक्रमे जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त यांना आहेत. रु. ३०.०० लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या तातडीच्या पाणी पुरवठा योजनांना मंजुरी देण्याचे अधिकार शासनास आहेत. सन २००२-२००३ पासून या योजनांसाठी निधी केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती निवारण निधीतून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

६.४ शासन निर्णय दिनांक २१ ऑगस्ट २००९ नुसार नागरी भागातील पाणी टंचाई निवारणार्थ तातडीच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत महानगरपालिका "अ" व "ब" वर्ग नगरपालिकांना १० टक्के लोकवर्गणी तसेच "क" वर्ग नगरपालिकांना ५ टक्के लोकवर्गणी भरणे आवश्यक आहे. शासन निर्णय दिनांक ४ मे २०१६ नुसार सदर लोकवर्गणी ५ टप्प्यात भरण्याची सवलत नगरपालिकांना देण्यात आली आहे. तसेच नगर पंचायतींना ५ टक्के लोकवर्गणीची अट शिथिल करण्यात आली आहे.

७. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान :-

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक : नास्वअ-२००७/प्र.क्र. ६४/पापु-२१, दिनांक २६ ऑक्टोबर, २००७.

७.१ राज्याच्या नागरी भागामध्ये सन २००२-२००३ पासून संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. दिनांक १४ नोव्हेंबर, २००२ पासून सदर अभियान राबविण्यास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. भारताचे प्रथम पंतप्रधान भारतरत्न जवाहरलाल नेहरू यांच्या नावाने या अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायती यांना पारितोषिके देण्यात येतात.

७.२ संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियाना अंतर्गत विविध स्तरावर ४ गटामध्ये स्पर्धा आयोजित करण्यात येतात. गट क्रमांक १ मध्ये १० लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या महानगरपालिका व गट क्रमांक २ मध्ये १० लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकांचा समावेश असून गट क्रमांक ३ मध्ये "अ" व "ब" वर्ग नगरपालिकांचा समावेश आहे. तसेच गट क्रमांक ४ मध्ये क वर्ग नगरपरिषदा व नगरपंचायती यांचा समावेश आहे.

७.३ संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियाना अंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्वच्छ शहर स्पर्धेकरिता विहित करण्यात आलेल्या यापूर्वीच्या निकषामध्ये काही प्रमाणात बदल करून त्याचे 'अ' व 'ब' या दोन गटात विभाजन करण्यात आले आहे. यापैकी गट 'अ' हा अभियानामध्ये भाग घेणाऱ्या सर्व नागरी संस्थांसाठी सक्तीचा ठरविण्यात येत असून राज्य स्तरावरील सर्वात स्वच्छ शहर स्पर्धेचे उद्दिष्ट गाठण्याकरिता 'ब' गटातील निकषामध्येही उत्कृष्ट कामगिरी बजावणे आवश्यक राहील.

**'अ' गटातील घटक (निकष) व त्यांना द्यावयाचे गुण (सक्तीचे घटक)**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | पाणीपुरवठा व व्यवस्थापन | ... | १०० गुण |
| (२) | सांडपाणी व व्यवस्थापन | ... | १०० गुण |
| (३) | शौचालय व्यवस्थापन (वैयक्तिक, सार्वजनिक व संस्थीय शौचालये) | ... | १०० गुण |
| (४) | हागणदारी मुक्त शहर, सार्वजनिक आरोग्य, IEC | ... | १०० गुण |
| (५) | घनकचरा व्यवस्थापन | ... | १०० गुण |
| | **'अ' गटातील घटकांसाठी एकूण** | ... | ५०० गुण |

**'ब' गटातील घटक (निकष) व त्यांना द्यावयाचे गुण (वैकल्पिक घटक)**

| | | |
|---|---|---|
| (१) | नागरी सुविधा, पर्यावरण, रस्ते विकास, सुशोभिकरण व विकास आराखड्याची अंमलबजावणी. | १५० गुण |
| (२) | अतिक्रमण निर्मूलन व अनाधिकृत बांधकामांना प्रतिबंध... | १०० गुण |
| (३) | शिक्षण, सामाजिक सुविधा, माता/बाल संगोपन ... | १०० गुण |
| (४) | मनुष्यबळ व आर्थिक व्यवस्थापन आणि सुशासन ... | १०० गुण |
| (५) | आर्थिक विकास, रोजगार निर्मिती, दारिद्र्य निर्मूलन ... | ५० गुण |
| | **'ब' गटातील घटकांसाठी एकूण ...** | **५०० गुण** |
| | **'अ' आणि 'ब' घटक मिळून एकूण बेरीज ...** | **१,००० गुण** |

७.४ नागरी स्वच्छता अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेच्या विविध फेऱ्यांमध्ये राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या बक्षिसांसाठी नागरी संस्थांची प्रत्येक स्तरावर त्यांना प्राप्त होणाऱ्या गुणांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे प्रतवारी (Gradation) करण्यात येणार आहे—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | अ+ | ... | ... | ९०% व त्याहून अधिक |
| (२) | अ | ... | ... | ८०% ते ८९% |
| (३) | ब | ... | ... | ७०% ते ७९% |
| (४) | क | ... | ... | ५०% ते ६९% |
| (५) | ड | ... | ... | ५०% पेक्षा कमी |

७.५ प्रत्येक नागरी संस्थेने अभियानाच्या सुरुवातीस दिनांक २ ऑक्टोबर रोजी विहित नमुन्यात स्पर्धेच्या प्रत्येक निकषांतर्गत नमूद केलेल्या आधारभूत माहितीस अनुसरून संबंधित वर्षाच्या अभियान कालावधीमध्ये त्यामध्ये प्रगती (upgrading) होणे अपेक्षित आहे. (उदा. सन २००७-२००८ मध्ये राबविण्यात येणाऱ्या अभियानाच्या सुरुवातीस दिनांक २ ऑक्टोबर रोजी ब कॅटेगरीमध्ये असलेल्या नागरी संस्था/प्रशासकीय वार्ड/पार्षद वार्ड यांनी सन २००७-२००८ च्या अभियान कालावधीत स्पर्धेच्या प्रत्येक फेरीमध्ये पुढील फेरीतील तपासणीसाठी पात्र ठरतांना किमान अ कॅटेगरीमध्ये येणे आवश्यक आहे). तसेच, अभियानाच्या सुरुवातीस (As per Baseline Data) दिनांक २ ऑक्टोबर रोजी अ+ कॅटेगरीमध्ये असलेल्या नागरी संस्था/प्रशासकीय वार्ड/पार्षद वार्ड यांनी संबंधित वर्षाच्या अभियान कालावधीत स्वच्छ शहराचा आपला दर्जा कायम राखणे आणि अभियानाच्या मुख्य निकषांतर्गत काही प्रमाणात विशेष प्रगती करणे अपेक्षित आहे.

**संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानांतर्गत विभिन्न स्तरावरच्या स्पर्धेसाठी बक्षीसे खालीलप्रमाणे राहतील—**

**(अ)** स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या चारही गटांमधील नागरी संस्थांनी पहिल्या फेरीमध्ये निवड होणाऱ्या पार्षद वार्डाची बक्षिसे त्यांचे स्तरावर स्वःनिधीतून अथवा प्रायोजित करून द्यावीत.

**(ब)** स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीमध्ये गट क्रमांक १ व २ मधील महानगरपालिका, गट क्रमांक ३ मधील 'अ' व 'ब' वर्ग नगरपरिषदा आणि गट क्रमांक ४ मधील क वर्ग नगरपरिषदा/पंचायती यांना राज्य शासनाकडून खालीलप्रमाणे बक्षिसे देण्यात येतील.

**(i) गट क्रमांक १ व २ मधील २२ महानगरपालिकांमधील सर्वोत्कृष्ट प्रशासकीय वार्ड—**

(Baseline Data व अभियान कालावधीतील कामगिरी यांच्या आधारे वरील वर्गवारीत जाणाऱ्या प्रशासकीय वार्डकरिता)—

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | अ+ | ... | रु. ४.०० लक्ष | + | प्रमाणपत्र | ... ... ... | १ बक्षिस |
| (२) | अ | ... | रु. ३.०० लक्ष | + | प्रमाणपत्र | ... ... ... | १ बक्षिस |
| (३) | ब | ... | रु. १.०० लक्ष | + | प्रमाणपत्र | ... ... ... | १ बक्षिस |
| (४) | क | ... | ... | ... | प्रमाणपत्र | ... ... ... | १ बक्षिस |

(बक्षिसांची **एकूण** रक्कम रु. ८.०० लक्ष × २५ महानगरपालिका = रु. २००.०० लक्ष)

**(ii) गट क्रमांक ३ व ४ मधील विभागस्तरावरील सर्वोत्कृष्ट नगरपरिषदा—**

(Baseline Data व अभियान कालावधीतील कामगिरी यांच्या आधारे वरील वर्गवारीत जाणाऱ्या नगरपरिषदा)—

(प्रति विभाग/प्रती गट)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | अ+ | ... | रु. १०.०० लक्ष | + | प्रमाणपत्र | ... ... ... | १ बक्षिस |
| (२) | अ | ... | रु. ८.०० लक्ष | + | प्रमाणपत्र | ... ... ... | १ बक्षिस |
| (३) | ब | ... | रु. ५.०० लक्ष | + | प्रमाणपत्र | ... ... ... | १ बक्षिस |
| (४) | क | ... | ... | ... | प्रमाणपत्र | ... ... ... | १ बक्षिस |

(बक्षिसांची एकूण रक्कम रु. २३.०० लक्ष × ६ विभाग × २ गट = रु. २७६.०० लक्ष)

(क) **स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीमध्ये** गट क्रमांक १ व २ मधील महानगरपालिका, गट क्रमांक ३ मधील 'अ' व 'ब' वर्ग नगरपरिषदा आणि गट क्रमांक ४ मधील क वर्ग नगरपरिषदा/पंचायती यांना खालीलप्रमाणे बक्षिसे देण्यात येतील.

**(i) गट क्रमांक १ मधील सर्वात स्वच्छ महानगरपालिका—**

(Baseline Data व अभियान कालावधीतील कामगिरी यांच्या आधारे वरील वर्गवारीत जाणाऱ्या महानगरपालिकेकरिता)—

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | अ+ | ... | रु. ५०.०० लक्ष | + | स्मृतीचिन्ह | + | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |
| (२) | अ | ... | रु. ३५.०० लक्ष | + | स्मृतीचिन्ह | + | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |
| (३) | ब | ... | रु. २०.०० लक्ष | + | स्मृतीचिन्ह | + | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |
| (४) | क | ... | ... | ... | ... | ... | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |

या व्यतिरिक्त या फेरीमध्ये सक्तीच्या रु. ५.०० लक्ष -- १ (विशेष) बक्षिस निकषांतर्गत सर्वाधिक गुण प्राप्त करणारी गट क्र. १ मधील महानगरपालिका (बक्षिसांची एकूण रक्कम रु. ११०.०० लक्ष).

**(ii) गट क्रमांक २ मधील सर्वात स्वच्छ महानगरपालिका—**

(Baseline Data व अभियान कालावधीतील कामगिरी यांच्या आधारे वरील वर्गवारीत जाणाऱ्या महानगरपालिकेकरिता)—

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | अ+ | ... | रु. ४०.०० लक्ष | + | स्मृतीचिन्ह | + | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |
| (२) | अ | ... | रु. २५.०० लक्ष | + | स्मृतीचिन्ह | + | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |
| (३) | ब | ... | रु. १५.०० लक्ष | + | स्मृतीचिन्ह | + | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |
| (४) | क | ... | ... | ... | ... | ... | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |

या व्यतिरिक्त या फेरीमध्ये सक्तीच्या रु. ५.०० लक्ष -- १ (विशेष) बक्षिस निकषांतर्गत सर्वाधिक गुण प्राप्त करणारी गट क्र. २ मधील महानगरपालिका (बक्षिसांची एकूण रक्कम रु. ८५.०० लक्ष).

**(iii) गट क्रमांक ३ मधील सर्वात स्वच्छ 'अ' व 'ब' वर्ग नगरपरिषदा—**

(Baseline Data व अभियान कालावधीतील कामगिरी यांच्या आधारे वरील वर्गवारीत जाणाऱ्या नगरपरिषदेकरिता)—

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | अ+ | ... | रु. ३०.०० लक्ष | + | स्मृतीचिन्ह | + | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |
| (२) | अ | ... | रु. २०.०० लक्ष | + | स्मृतीचिन्ह | + | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |
| (३) | ब | ... | रु. १०.०० लक्ष | + | स्मृतीचिन्ह | + | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |
| (४) | क | ... | ... | ... | ... | ... | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |

या व्यतिरिक्त या फेरीमध्ये सक्तीच्या रु. ५.०० लक्ष -- १ (विशेष) बक्षिस निकषांतर्गत सर्वाधिक गुण प्राप्त करणारी गट क्र. ३ मधील नगरपरिषद (बक्षिसांची एकूण रक्कम रु. ६५.०० लक्ष).

**(iv) गट क्रमांक ४ मधील सर्वात स्वच्छ क वर्ग नगरपरिषदा/पंचायती—**

(Baseline Data व अभियान कालावधीतील कामगिरी यांच्या आधारे वरील वर्गवारीत जाणाऱ्या नगरपरिषदेकरिता)—

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | अ+ | ... | रु. ३०.०० लक्ष | + | स्मृतीचिन्ह | + | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |
| (२) | अ | ... | रु. २०.०० लक्ष | + | स्मृतीचिन्ह | + | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |
| (३) | ब | ... | रु. १०.०० लक्ष | + | स्मृतीचिन्ह | + | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |
| (४) | क | ... | ... | ... | ... | ... | प्रमाणपत्र | ... | १ बक्षिस |

या व्यतिरिक्त या फेरीमध्ये सक्तीच्या रु. ५.०० लक्ष -- १ (विशेष) बक्षिस निकषांतर्गत सर्वाधिक गुण प्राप्त करणारी गट क्र. ४ मधील नगरपरिषद/पंचायत, बक्षिसांची एकूण रक्कम (रु. ६५.०० लक्ष).

संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानासाठी प्रतिवर्षी रु. १०.२५ कोटी निधीची आवश्यकता आहे. कारण, या अभियानांतर्गत स्पर्धेच्या दुसऱ्या व तिसऱ्या (राज्यस्तरीय) फेऱ्यांमध्ये राज्य शासनाकडून प्रतिवर्षी देण्यात येणाऱ्या बक्षिसांची रक्कम रु. ८०१.०० लक्ष असून अभियानाची अंमलबजावणी, स्पर्धेच्या दुसऱ्या व तिसऱ्या राज्यस्तरीय फेऱ्यांमध्ये तपासणी समित्यांना विविध नागरी संस्थांची प्रत्यक्ष तपासणी करण्यासाठी उपलब्ध करून द्यावयाचा निधी, या अभियानाचा लक्ष्यांक गाठण्याकरिता विविध दृकश्राव्य (Audio Visual) माध्यमांद्वारे करण्यात येणारी प्रचार/प्रसिद्धी, स्पर्धेच्या विविध फेऱ्यांमध्ये बक्षिसपात्र नागरी संस्थांना देण्यात येणारी प्रमाणपत्रे, राज्यस्तरीय फेरीमध्ये सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या नागरी संस्थांना द्यावयाची स्मृतीचिन्हे आणि स्पर्धेच्या विविध स्तरांवरील बक्षिस समारंभांचे आयोजन याकरिता प्रतिवर्षी रु. २.२५ कोटी निधीची आवश्यकता आहे.

सदर अभियानांतर्गत स्पर्धेच्या राज्यस्तरीय फेरीतील पारितोषिके दरवर्षी राज्य शासनामार्फत आयोजित करावयाच्या बक्षिस वितरण संमारंभाच्या वेळी मा. मुख्यमंत्री महोदयांचे हस्ते बक्षिस देण्यात येवून बक्षिसपात्र नागरी संस्थांचा गौरव करण्यात येतो.

तक्ता क्रमांक-१२

## नागरी पाणी पुरवठा व स्वच्छता

**वित्तीय आवश्यकता :** (रुपये हजारात)

| अ.क्र. | तपशील | प्रत्यक्ष खर्च, २०१५-२०१६ | | | अर्थसंकल्प, २०१६-२०१७ | | | सुधारित अर्थसंकल्प, २०१६-२०१७ प्रस्तावित | | | अर्थसंकल्पीय अंदाज, २०१७-२०१८ प्रस्तावित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण | तरतुद |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | उद्दिष्टवार वर्गीकरण– | | | | | | | | | | |
| १. | नागरी पाणी पुरवठा योजना (बिगर अनुशेष). ... | ... | ५६०००० | ५६०००० | ... | ८००००० | ८००००० | ... | ४६०१२७ | ४६०१२७ | २२००२०६ |
| २. | नागरी वर्धित वेग (राज्य हिस्सा) ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३. | नागरी वर्धित वेग (केंद्र हिस्सा) ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४. | नागरी पाणी पुरवठा (अनुशेष) ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ५. | नागरी दलित वस्ती कार्यक्रम ... | ... | ५८४२ | ५८४२ | ... | ७०००० | ७०००० | ... | १०००० | १०००० | ६०००० |
| ६. | भातसई प्रकल्प ... | ... | १ | १ | ... | १ | १ | ... | १ | १ | १ |
| ७. | नागरी क्षेत्रातील अ.जा. व नवबौध्द घटकातील कुटुंबियाना १२०००खाजगी नळजोडणी व शौचालयाची तरतूद. | ... | ४८२५६ | ४८२५६ | ... | १३७०० | १३७०० | ... | १३७०० | १३७०० | १२००० |

तक्ता क्र. १३

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

### नागरी पाणी पुरवठा कार्यक्रम

| अनु-क्रमांक | जिल्हा | सन १९९७-९८ ते २०१५-१६ या कालावधीतील पूर्ण योजना | समाविष्ट शहरे लोकसंख्या | एकूण खर्च (रु. लाखात) | दि. १-४-२०१६ रोजी प्रगतीपथा-वरील योजना | समाविष्ट शहरे | झालेला एकूण खर्च मार्च २०१६ पर्यंत (रु. लाखात) | आवश्यक निधी सन २०१६-१७ (रु. लाखात) | सन २०१७-१८ मधील अपेक्षित खर्च (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | ठाणे ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २. | पालघर ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३. | रायगड ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४. | रत्नागिरी ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ५. | सिंधुदूर्ग ... | ५ | ३ | १३६४.८१ | १ | १ | ३३३.१४ | १४२२.१६ | ५००.०० |
| ६. | नाशिक ... | ७ | ६,२६,९६० | १४४११.४४ | १ | १ | ४४५.९६ | ४५९.८२ | ... |
| ७. | धुळे ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ८. | नंदुरबार ... | ... | ८३,४९० | ४४०.५९ | २ | २ | २३२.११ | १०२.०० | १०६.४८ |
| ९. | जळगाव ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १०. | अहमदनगर ... | ३ | ४,०८,४९५ | ४१०५.३४ | ३ | ४ | ८७९२.५४ | २१२.८० | २४७.९७ |
| ११. | पुणे ... | १६ | ९,४७,११७ | ९०३६.०२ | ... | ... | ... | १०.०० | ... |
| १२. | सोलापूर ... | ८ | ११,९९,००० | १२८०४.६७ | १ | १ | १३.७७ | ३२.०० | ३२.०० |
| १३. | कोल्हापूर ... | ५ | ८,०६,५७५ | ८२०४.१३ | ... | ... | ... | ... | ... |
| १४. | सांगली ... | ७ | ३,०३,६०३ | ३३६१.२८ | ... | ... | ... | ... | ... |
| १५. | सातारा ... | ६ | ४,५९,०८० | १०५२०.८७ | ३ | ३ | ७०४९.४६ | ३०.०० | १४८५.१२ |
| १६. | औरंगाबाद ... | ७ | २,१७,००० | ६७५४.२० | १ | १ | ४३१.९२ | २६.५० | २६.५० |
| १७. | जालना ... | ४ | ३,७७,००० | १०३८५.९१ | २ | २ | ... | ९०.०० | ९०.०० |
| १८. | बीड ... | १ | ५५,९८१ | ५३१.९० | १ | १ | २६९३.१७ | ... | २१०.२६ |
| १९. | परभणी ... | ५ | ४,४०,४८९ | ३३३५.२१ | ... | ... | १०७७.०१ | ५.२० | ५.२० |
| २०. | हिंगोली ... | ... | ४८,००० | ... | ... | ... | १४३.०९ | ... | ... |
| २१. | नांदेड ... | १२ | ३,१६,०८० | ६८२८.४५ | ३ | ३ | १३६१.४९ | ५२.७५ | ५२.७५ |
| २२. | उस्मानाबाद ... | ९ | २,८६,६९३ | ७१२८.७१ | १ | १ | ७५६.८७ | ... | ६१८.०० |
| २३. | लातूर ... | ४ | १,८६,०९५ | २३४१.९० | २ | २ | ११९११.३१ | १०७.८० | ... |
| २४. | अमरावती ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २५. | यवतमाळ ... | २ | १,७३,४८० | १००१.५६ | १ | १ | ३६९.५६ | १०.०० | १०.०० |
| २६. | बुलढाणा ... | ८ | ५,६२,३०० | ११०१३.९० | १ | ८ | ९७४३.१२ | ४९१.८७ | ७९.९७ |
| २७. | अकोला ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २८. | वाशिम ... | ६ | १,५६,९४८ | ३२२२.४१ | ... | ३ | ४९१७.१३ | ... | ... |
| २९. | नागपूर ... | १२ | २३,६१,९०० | ११९०७.१६ | २ | २ | ७६९.६७ | १३६.७९ | ... |
| ३०. | गोंदिया ... | २ | २३,८८० | १०३.६६ | ... | ... | ... | ... | ... |
| ३१. | भंडारा ... | ४ | १,३१,३३० | १२३५.७४ | ... | ... | ... | ... | ... |
| ३२. | वर्धा ... | ५ | २,०१,२८४ | २७९५.४२ | १ | १ | १२६०.१० | १२५०.०० | ... |
| ३३. | चंद्रपूर ... | ७ | ५,५४,३४३ | ४४३८.४४ | १ | १ | २४२०.३९ | ... | ... |
| ३४. | गडचिरोली ... | ३ | ९५,१८९ | १९५६.५१ | ... | ... | ... | ... | ... |
| | एकूण ... | १४८ | १,१०,२२,३१५ | १३९२३०.२३ | २७ | ३८ | ५४७२१.९० | ४४३९.६९ | ३४६४.२५ |

## तक्ता क्र. १४

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## नागरी मलनिःसारण योजना

(रु. लाखात)

| अनु-क्रमांक | योजनेचे नाव | जिल्हा | योजनेची किंमत (रु. लाखात) | मार्च २०१६ अखेर पर्यंत झालेला खर्च (रु. लाखात) | सन २०१६-१७ मधील अपेक्षीत खर्च (रु. लाखात) | योजना पूर्ण होण्यासाठी आवश्यक निधी (रु. लाखात) | योजनेची सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | मालेगाव भुयारी गटार योजना | नाशिक | ९०१.०५ | १६३१.८० | ... | ... | UIDSSMT अंतर्गत मालेगाव महानगरपालिकेमार्फत उर्वरित कामे प्रस्तावित केले आहेत. |
| २. | पैठण सलेज योजना | औरंगाबाद | १५१.६१ | ५५.९३ | ५.०० | ५.०० | सदर योजनेतील उर्वरीत कामे आहे त्या स्थितीत अंतिम करावयाचे असून, उर्वरीत काम पैठण आपेगाव विकास प्राधिकरणाकडून प्राप्त निधीतून करण्यात येणार आहे. त्यामुळे अंतिम देयक अदायगीसाठी तरतूद ठेवण्यात आली आहे. |
| ३. | सांगली भुयारी गटार योजना टप्पा-२, भाग-१ | सांगली | ८८०.५२ | ५७६.०० | ... | ... | सदर योजना म. न. पा. स हस्तांतरित केली आहे. उर्वरित कामे म. न. पा. स्वनिधीतून करणार आहे. |
| ४. | मुरगुड मलनिःसारण योजना | कोल्हापूर | ९४.६० | ८८.५७ | ... | ... | योजना पूर्ण |
| ५. | कोल्हापूर मलनिःसारण योजना | कोल्हापूर | ४८८.५९ | ३१७.१७ | ... | ... | योजना पूर्ण |
| ६. | इचलकरंजी भुयारी गटार योजना | कोल्हापूर | १३१२.०० | १२२४.४० | ... | ... | योजना पूर्ण |
| ७. | अमरावती भुयारी गटार योजना (मूळ योजना) | अमरावती | १२३०४.०० | ३६६२.०० | ... | ... | सदर योजनेसाठी महानगरपालिका अमरावतीकडून कर्ज रुपाने निधी उभारु न शकल्यामुळे निधी अभावी योजनेची कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने विशेष सहाय्य निधीतून रुपये ११५०.०० लक्ष मंजूर केलेले असून सदर खर्च सन २०१२-१३ पासून आर्थिक या वर्षात करण्यात येत आहे. |
| ८. | अमरावती भुयारी गटार योजना UIDSSMT | अमरावती | ८६१२.००<br>१०४०० | ९३६५.५४ | ... | ... | सदर योजनेचे रु.८६.१२ कोटीची कामे पूर्ण झालेली असून त्यामध्ये झोन क्र. ४ व टप्पा क्रमांक १ (मुल्यांकीत इतर मधील मलवाहीन्या टाकण्याचे कामे किंमत) लांबी १३०.८० कि. मी. (८० टक्के पूर्ण) मलशुध्दीकरण केंद्र बांधकाम, ४४.०० एम. एल. डी. चे सिव्हील वर्क ८५ टक्के व मॅकेनिकल वर्क २५ टक्के पूर्ण, उर्ध्ववाहिनीची पाईप लाईन टाकण्यात आली असून सदरची कामे ८५ टक्के पूर्ण झालेली आहे. |
| ९. | अमरावती भुयारी गटार योजना टप्पा क्रमांक २ | अमरावती | ४४०००.०० | ४४०००.०० | ... | ... | केंद्र शासन शहर विकास मंत्रालयाचे पत्र क्र.-१४०११/१५/२०१३-युआयडी-१, दिनांक ४-३-२०१४ अन्वये मंजुरी देण्यात आली होती परंतु सदर योजना ही अमृत योजनेमध्ये समाविष्ट झाल्यामुळे योजनेची किंमत वाढलेली आहे. |

तक्ता क्र. १४ *(चालू)*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०. | अमरावती भुयारी गटार योजना (विशेष सहाय्य निधीतून मंजूर) | अमरावती | १०३५.०० | ७९५.६४ | १०३५.०० | २३९.३६ | अ. क्र. १ येथील मूळ योजनेतील उर्वरित अत्यावश्यक कामे पूर्ण करून मलशुध्दीकरण केंद्र दि. ३१-३-२०१३ रोजी कार्यान्वित करण्यात आलेली आहे व इतर उर्वरित काम योजना पूर्णत्वास आणण्याचे काम प्रगतीपथावर आहे. |
| ११. | अमरावती भुयारी गटार योजना १३ वा वित्त आयोग (२४७५.००) | अमरावती | २४७५.०० | ... | १२३८.०० | १२३७.०० | |
| १२. | नाबार्ड अर्थसहाय्यीत ग्रामीण सांडपाणी प्रकल्प, मालेगाव (जहा), ता. मालेगाव, जि. वाशिम, रा.पे.यो. कार्यक्रम | वाशिम | ३१४.९४ | २२३.८५ | ९१.०९ | ... | कामे पूर्णत्वाचे प्रगतीपथावर. |
| १३. | लोणी बु. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प योजना, ता. रिसोड, जि. वाशिम (तिर्थक्षेत्र पर्यटन विकास अंतर्गत) | वाशिम | २४९.०० | ... | ... | २४९.०० | मा. मुख्य सचिवांकडे प्रस्ताव सादर. |
| १४. | शेगाव विकास आराखडा पूर्ण ठेव तत्वावरील योजना | बुलढाणा | ३१४३.०० | ३१४३.०० | ७५६१.०० | ७९०.०० | निधी अभावी योजनेची कामे सद्यःस्थितीत बंद आहे. निधी प्राप्त होताच योजनेची कामे पूर्ण करण्यात येतील. जून २०१५ पासून मलशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. |
| १५. | लोणार विकास आराखडा पूर्ण ठेव तत्वावरील योजना | बुलढाणा | १५९.०० | १५९.०० | ... | ... | योजनेची कामे पूर्ण झालेली आहेत व योजना नगरपरिषद, लोणार यांच्याकडे हस्तांतरणाची कार्यवाही सुरू आहे. |
| १६. | आळंदी सांडपाणी निचरा योजना | पुणे | १०६.०० | ११५.५५ | ... | ... | योजनेची कामे पूर्ण झालेली आहेत व योजना नगरपरिषद, लोणार यांच्याकडे हस्तांतरणाची कार्यवाही सुरू आहे. |
| १७. | कराड भुयारी गटार योजना | सातारा | १४८.३५ | १४०.३० | ... | ... | योजना पूर्ण व हस्तांतरण. |
| १८. | राष्ट्रीय नदी कृती आराखडा कराड शहर | सातारा | ३३५.८८ | ३३१.६४ | ... | ... | योजना पूर्ण व हस्तांतरण. |

तक्ता क्र. १५

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील पूर्ण ठेव नागरी पाणी पुरवठा योजना

| अनु-क्रमांक | जिल्हा | एकूण योजना | समाविष्ट शहरे | योजनेची किंमत (रु. लाखात) | मार्च २०१६ अखेरपर्यंत झालेला खर्च (रु. लाखात) | सन २०१६-१७ मधील अपेक्षीत खर्च (रु. लाखात) | योजनेची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | ठाणे | ३ | ३ | ३९०.९२ | २३८.२५ | १२७.६६ | योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. |
| २. | रायगड | २ | २ | ६८००.०० | १८६०.१५ | ४९३९.८५ | योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. |
| ३. | पालघर | ४ | ४ | १७६०.५९ | ८०७.२२ | ३३१.७९ | योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. |
| ४. | नाशिक | ९ | ९ | ३३८८.३३ | २७३१.४६ | ६८५.३३ | ८ योजनांची कामे पूर्ण, १ योजनेचे काम प्रगतीपथावर. |
| ५. | जळगाव | १ | १ | ४०३.३२ | ५४६.९७ | ४०.०० | योजनेचे काम पूर्ण, हस्तांतरण प्रक्रिया सुरु आहे. |
| ६. | धुळे | ३ | १ | १३८४५.०१ | २३५९.८७ | २८९६.९१ | २ योजनांची कामे पूर्ण, १ योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. |
| ७. | पुणे | २ | २ | ३२४८.०० | ३५८९.८३ | ८००.०० | योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. |
| ८. | सांगली | ३ | २ | २६२५.५१ | २२१४.१४ | ४११.३७ | योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. |
| ९. | सोलापुर | १ | १ | २३९३.०२ | २३९२.६७ | २३७.४१ | योजनेची कामे पूर्ण. |
| १०. | औरंगाबाद | ६ | ३ | ६२३३.८८ | १७२७.१३ | ७१८.१३ | योजनेची कामे पूर्ण. |
| ११. | जालना | २ | २ | २७३.५० | १०३.८० | १६९.७० | भोकरदन पापु योजनेचे काम पूर्ण झालेले असून अंतिम देणे बाकी आहे. जालना नगरपालिका सुधारणा कामे प्रगतीपथावर असून नापाने २० टक्के लोकवर्गणी जमा न केल्यामुळे शासनाने उर्वरित निधी मुक्त केलेला नाही त्यामुळे पुढील कामे झालेले नाहीत. |
| १२. | परभणी | ३ | ४ | ११४.५६ | ९५.१८ | १९.३८ | योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. |
| १३. | हिंगोली | ८ | ८ | ३५५.९७ | २३८.९३ | २४.२९ | योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. |
| १४. | नांदेड | ८ | ६ | १२३२.४५ | १११३.६३ | ११८.८२ | ६ योजनांची कामे पूर्ण, २ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. |
| १५. | उस्मानाबाद | ३ | १ | ९७५०.१९ | ८९४७.६४ | ८०२.५५ | १ योजनेचे काम १०० टक्के पूर्ण, २ योजनांची कामे ९० टक्के प्रगतीपथावर आहेत. |
| १६. | लातूर | १ | १ | १३१.८२ | ५८.७५ | ७२.०७ | अहमपूर नगरपरिषदेकडे वारंवार पत्र-व्यवहार करुन सुध्दा वेळेत निधी प्राप्त न झाल्यामुळे उर्वरित काम झाले नाही. |
| १७. | बुलढाणा | ४ | १ | ९४९६.४५ | ३३१०.०० | ६१८५.६५ | नगरपरिषद, बुलढाणा यांचा नागरी सहभाग हिस्सा रु. १२.४१ कोटीपैकी रु. १५१.०० लक्ष भरणा केला आहे. नगरपरिषद, बुलढाणाकडून आवश्यक व विलंबाने नागरी सहभाग हिस्सा भरणा न केल्यामुळे शासनस्तरावरुन पुढील शासन सहभाग दुसरा हप्ता निधी वितरण होऊ शकलेला नाही. योजनेवर माहे एप्रिल २०१५ पासून शासनाकडून निधी उपलब्ध झालेला नाही. माहे ऑगस्ट २०१५ पासून संबंधीत कंत्राट-दाराने निधी अभावी कामे बंद केलेली आहेत. |

तक्ता क्र. १५ *(चालू)*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १८. | अकोला | ८ | १ | २२०८.८१ | १३१०.३० | ७३७.९२ | १ योजनेचे काम प्रगतीपथावर, ४ योजनांची कामे पूर्ण, १ योजनेचे काम ४० टक्के पूर्ण, १ योजनेचे काम ९० टक्के पूर्ण, १ योजनेचे पाणी पुरवठा सुरु आहे. |
| १९. | वाशिम | ४९ | ४९ | ४९५९.४२ | ३१९६.७४ | २४९.३९ | सदर योजनेपैकी २७ योजनेची कामे पूर्ण करण्यात आलेली असून, अंतिम देयक प्रदान केले आहे, तसेच २२ पाणी पुरवठा योजनांपैकी ५ योजना अंतिम टप्प्यावर असून ६ योजनांचे निविदा प्रपत्रे तयार करणे सुरु आहे. उर्वरित ११ योजनेचा जिल्हा वार्षिक आराखड्यात समावेश करण्यात आलेला आहे. नियतव्यय मंजूर झाल्यानंतर योजनेची अंमलबजावणी करण्यात येईल. |
| २०. | नागपूर | ९ | १ | २३२०.९६ | ८५७.६४ | १४६३.२४ | २ योजनेचे काम ९० टक्के पूर्ण, १ योजनेचे काम ७० टक्के पूर्ण, २ योजनांची कामे पूर्ण व हस्तांतरित, ३ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. |
| २१. | गोंदिया | २ | १ | ९४६७.७९ | ७०६९.०८ | २३९८.८१ | १ योजनेचे ९९ टक्के काम पूर्ण, वितरण व्यवस्था ९९ टक्के कामे पूर्ण, १ योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. |
| २२. | भंडारा | २ | १ | १४५८.९५ | ... | १४५८.९५ | १ योजनेचे काम प्रगतीपथावर, टाकीचे काम बॉटम स्लॅबपर्यंत पूर्ण व नुकतेच योजनेचे पाईप प्राप्त झाले आहेत, १ निविदा प्रक्रिया पूर्ण, १ योजनेचे ९९ टक्के काम पूर्ण, वितरण व्यवस्था ९९ टक्के कामे पूर्ण, १ योजना निविदा प्रक्रिया पूर्ण, कार्यादेश देणे प्रगतीपथावर आहेत. |
| २३. | वर्धा | २ | २ | ४६०२.३३ | २१०८.५८ | १९६३.४१ | कामे प्रगतीपथावर आहेत. |
| २४. | चंद्रपूर | १ | १ | ६४४१.३३ | २२७९.५५ | १५००.०० | कामे प्रगतीपथावर आहेत, योजनेचे कामे ४५ टक्के पूर्ण. |
| | एकूण ... | १३६ | १०७ | ९३९०३.११ | ४९१५६.७१ | २८३५२.६३ | |

### तक्ता क्रमांक १६

### महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील मंजूर पदे दर्शविणारे परिशिष्ट (२०१७-२०१८)

| अ. क्र. | संवर्ग | विद्यमान वेतनश्रेणी व विशेष वेतन असल्यास | सुधारित वेतन संरचना वेतन बँड | सुधारित वेतन संरचना ग्रेड वेतन | मंजूर पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | सदस्य सचिव ... | १८,४००–२२,४०० | ३७,४००–६७,००० | १०,००० | १ |
| २. | विशेष कार्य अधिकारी-नि-सदस्य (तां.)... | १६,४००–२०,९०० | ३७,४००–६७,००० | ८,९०० | १ |
| ३. | मुख्य अभियंता ... | १६,४००–२०,९०० | ३७,४००–६७,००० | ८,९०० | ६ |
| ४. | संचालक (वित्त) ... | १६,४००–२०,००० | ३७,४००–६७,००० | ८,९०० | १ |
| ५. | मुख्य प्रशासकीय अधिकारी ... | १२,०००–१६,५००/१४,३००–१८,३०० | ३९,१००–७४,००० | ८,७०० | १ |
| ६. | उप मुख्य लेखाधिकारी ... | १२,०००–१६,५०० | १५,६००–३९,१०० | ७,६०० | २ |
| ७. | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) ... | १२,०००–१६,५००/ १४,३००–१८,३०० (२० टक्के निवडश्रेणी) | १५,६००–३९,१०० ३७,४००–६७,००० | ७,६०० | २१ |
| ८. | अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) ... | १२,०००–१६,५०० | १५,६००–३९,१०० | ७,६०० | २ |
| ९. | आस्थापना अधिकारी (द.) | १०,६५०–१५,८५० | १५,६००–३९,१०० | ६,६०० | १ |
| १०. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) ... | १०,६५०–१५,८५० | १५,६००–३९,१०० | ६,६०० | ५७ |
| ११. | कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) ... | १०,६५०–१५,८५० | १५,६००–३९,१०० | ६,६०० | १४ |
| १२. | प्रशासकीय-नि-आस्थापना अधिकारी ... | ८,०००–१३,५०० | ९,३००–३४,८०० | ५,४०० | १ |
| १३. | वरिष्ठ लेखा अधिकारी ... | ८,०००–१३,५०० | १५,६००–३९,१०० | ५,४०० | ३ |
| १४. | अंतर्गत लेखापरीक्षा अधिकारी ... | ८,०००–१३,५०० | १५,६००–३९,१०० | ५,४०० | ६ |
| १५. | उप अभियंता (स्थापत्य) ... | ८,०००–१३,५०० | १५,६००–३९,१०० | ५,४०० | २४१ |
| १६. | उप अभियंता (यांत्रिकी) | ८,०००–१३,५०० | १५,६००–३९,१०० | ५,४०० | ३४ |
| १७. | लेखा अधिकारी/परिव्यय ले. अ. ... | ६,५००–१०,५०० | ९,३००–३४,८०० | ४,४०० | १९ |
| १८. | कायदा व कामगार अधिकारी ... | ७,४५०–११,५०० | ९,३००–३४,८०० | ४,६०० | १ |
| १९. | कक्ष अधिकारी/विशेष अधीक्षक ... | ६,५००–१०,५०० | ९,३००–३४,८०० | ४,४०० | ८ |
| २०. | स्वीय सहायक/उच्च श्रेणी लघुलेखक... | ६,५००–१०,५०० | ९,३००–३४,८०० | ४,४०० | १८ |
| २१. | सहायक अभियंता (श्रेणी-२) (स्था.) ... | ६,५००–१०,५०० | ९,३००–३४,८०० | ४,४०० | २३५ |
| २२. | सहायक अभियंता (श्रेणी-२) (यां.) ... | ६,५००–१०,५०० | ९,३००–३४,८०० | ४,४०० | ३१ |
| २३. | कार्यासन अधिकारी/अधीक्षक ... | ५,५००–९,००० | ९,३००–३४,८०० | ४,३०० | २० |
| २४. | भांडार अधीक्षक ... | ५,५००–९,००० | ९,३००–३४,८०० | ४,३०० | ४ |
| २५. | सहा. लेखाधिकारी/मुख्य लेखापाल ... | ५,५००–९,००० | ९,३००–३४,८०० | ४,३०० | २९ |
| २६. | कनिष्ठ अभियंता (स्था.) ... | ५,५००–९,००० | ९,३००–३४,८०० | ४,३०० | ७०७ |
| २७. | कनिष्ठ अभियंता (यां.) ... | ५,५००–९,००० | ९,३००–३४,८०० | ४,३०० | ८७ |
| २८. | विज पर्यवेक्षक ... | ५,०००–८,००० | ९,३००–३४,८०० | ४,२०० | १ |
| २९. | प्रथम लिपिक/सहायक ... | ५,०००–८,००० | ९,३००–३४,८०० | ४,२०० | ५६ |
| ३०. | निम्न श्रेणी लघुलेखक ... | ५,०००–८,००० | ९,३००–३४,८०० | ४,३०० | २९ |
| ३१. | उप लेखापाल ... | ५,०००–८,००० | ९,३००–३४,८०० | ४,२०० | ३७ |
| ३२. | गाळणी परीक्षक/निरीक्षक ... | ४,५००–७,००० | ५,२००–२०,२०० | २,८०० | १ |
| ३३. | आरेखक ... | (१) ४,५००–७,००० (२) ५,०००–८,००० | ९,३००–३४,८०० | ४,२०० | २० |
| ३४. | भांडारपाल ... | ४,५००–७,००० | ५,२००–२०,२०० | २,८०० | ३७ |
| ३५. | वरिष्ठ लिपिक ... | ४,०००–६,००० | ५,२००–२०,२०० | २,४०० | ३४६ |
| ३६. | पाणीपट्टी अधीक्षक ... | ४,०००–६,००० | ५,२००–२०,२०० | २,४०० | १ |
| ३७. | सहायक आरेखक ... | (१) ४,०००–६,००० (२) ४,५००–५,००० | ५,२००–२०,२०० | २,८०० | १०२ |

तक्ता क्र. १६ *(चालू)*

| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| ३८. | विजतंत्री | ... | ४,०००–६,००० | ५,२००–२०,२०० | २,४०० | १७ |
| ३९. | पाळी अभियंता | ... | ४,०००–६,००० | ५,२००–२०,२०० | २,४०० | १ |
| ४०. | मुख्य मीटर दुरुस्तीकार | ... | ४,०००–६,००० | ५,२००–२०,२०० | २,४०० | १ |
| ४१. | अनुरेखक | ... | (१) ३,२००–४,९०० | ५,२००–२०,२०० | २,४०० | १७२ |
| | | | (२) ४,०००–६,००० | | २,४०० | |
| ४२. | गाळणी परिचर | ... | ३,२००–४,९०० | ५,२००–२०,२०० | २,००० | ६ |
| ४३. | कनिष्ठ लिपिक/टंकलेखक | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | ७४२ |
| ४४. | सहायक भांडारपाल | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | ५५ |
| ४५. | प्रयोगशाळा सहायक | ... | ३,२००–४,९०० | ५,२००–२०,२०० | २,००० | १ |
| ४६. | कारकून | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | ८ |
| ४७. | यांत्रिकी/तांत्रिकी | ... | ३,२००–४,९०० | ५,२००–२०,२०० | २,००० | १ |
| ४८. | पाणीपट्टी वसुलीकार | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | ४ |
| ४९. | मीटर वाचक | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | १६ |
| ५०. | मिस्त्री | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | १० |
| ५१. | वाहन चालक | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | १२४ |
| ५२. | पंपचालक | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | ३७ |
| ५३. | जोडारी | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | ३८ |
| ५४. | मीटर दुरुस्तीकार | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | १ |
| ५५. | गवंडी | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | १ |
| ५६. | तारतंत्री | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | ५ |
| ५७. | खलाशी/लाईनमन | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | २ |
| ५८. | बाईंडर | ... | २,७५०–४,४०० | ५,२००–२०,२०० | १,८०० | २ |
| ५९. | मदतनीस | ... | २,७५०–४,४०० | ५,२००–२०,२०० | १,८०० | ८ |
| ६०. | माळी | ... | २,७५०–४,४०० | ५,२००–२०,२०० | १,८०० | ६ |
| ६१. | तेलवाला | ... | २,६१०–४,००० | ४,४४०–७,४४० | १,६०० | १ |
| ६२. | दप्तरी | ... | २,६१०–४,००० | ४,४४०–७,४४० | १,६०० | १६ |
| ६३. | नाईक | ... | २,६१०–४,००० | ४,४४०–७,४४० | १,६०० | ३ |
| ६४. | फेरो प्रिंटर/लोहमुद्रक/चक्रमुद्रक | ... | २,६१०–४,००० | ४,४४०–७,४४० | १,६०० | २ |
| ६५. | शिपाई | ... | २,५५०–३,२०० | ४,४४०–७,४४० | १,३०० | ५७४ |
| ६६. | चौकीदार | ... | २,५५०–३,२०० | ४,४४०–७,४४० | १,३०० | ९९ |
| ६७. | वॉचमन | ... | २,५५०–३,२०० | ४,४४०–७,४४० | १,३०० | ८ |
| ६८. | हमाल | ... | २,५५०–३,२०० | ४,४४०–७,४४० | १,३०० | ६ |
| ६९. | मजदूर | ... | २,५५०–३,२०० | ४,४४०–७,४४० | १,३०० | ११० |
| ७०. | चावीवाला (व्हालमन) | ... | २,५५०–३,२०० | ४,४४०–७,४४० | १,३०० | ९ |
| ७१. | सफाईगार | ... | २,५५०–३,२०० | ४,४४०–७,४४० | १,३०० | २ |
| ७२. | स्वच्छक | ... | २,५५०–३,२०० | ४,४४०–७,४४० | १,३०० | २ |
| ७३. | इरेक्टर | ... | २,५५०–३,२०० | ४,४४०–७,४४० | १,३०० | २ |
| ७४. | विभागीय लेखापाल | ... | ५,०००–८,००० | ९,३००–३४,८०० | ४,२०० | ५१ |
| ७५. | स्थापत्य अभियांत्रिकी सहायक | ... | ४,०००–६,००० | ५,२००–२०,२०० | २,४०० | १३३ |
| ७६. | खानसामा | ... | २,५५०–३,२०० | ४,४४०–७,४४० | १,३०० | १ |
| | | | | | एकूण ... | ४,४४८ |

**तक्ता क्रमांक १७**

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

## कार्यव्ययी/रूपांतरीत आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची संख्या दर्शविणारे प्रपत्र (२०१७-२०१८)

| अ. क्र. | संवर्ग व पदनाम | | विद्यमान वेतनश्रेणी व विशेष वेतन असल्यास | सुधारित वेतन संरचना वेतन बँड | ग्रेड वेतन | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | वीजतंत्री | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | २,४०० | २३ |
| २. | जोडारी | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | ३४ |
| ३. | कारकून | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | १६५ |
| ४. | टंकलेखक | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | १ |
| ५. | पंपचालक | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | १७३ |
| ६. | मिस्त्री | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | २१ |
| ७. | मीटर वाचक | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | ४१ |
| ८. | गाळणी चालक/गाळणी परिचर | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | २,००० | ४४ |
| ९. | वाहन चालक | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | ३३ |
| १०. | अनुरेखक | | ३,२००-४,९००/४,०००-६,००० | ५,२००–२०,२०० | २,०००/२,४०० | ५ |
| ११. | गाळणी निरीक्षक | ... | ४,५००–७,००० | ५,२००–२०,२०० | २,८०० | १ |
| १२. | पाणीपट्टी वसुलीकार | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | ५ |
| १३. | वायरमन (तारतंत्री) | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | २ |
| १४. | यांत्रिकी/यांत्रिकी | ... | ३,२००–४,९०० | ५,२००–२०,२०० | २,००० | ... |
| १५. | तांत्रिक सहायक | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | २,००० | ३ |
| १६. | पाळी अभियंता | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | २,४०० | ... |
| १७. | विज पर्यवेक्षक | ... | ५,०००–८,००० | ९,३००–३४,८०० | ४,२०० | १ |
| १८. | मुख्य मिटर दुरुस्तीकार | ... | ४,०००–६,००० | ५,२००–२०,२०० | २,४०० | ... |
| १९. | पाणीपट्टी अधीक्षक | ... | ४,०००–६,००० | ५,२००–२०,२०० | २,४०० | ... |
| २०. | समयपाल | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | ६ |
| २१. | मिटर दुरुस्तीकार | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | ६ |
| २२. | प्रयोगशाळा सहाय्यक | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | २,००० | २ |
| २३. | लाईनमन (वर्ग ३) | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | १२ |
| २४. | लेजर किपर | ... | ३,०५०–४,५९० | ५,२००–२०,२०० | १,९०० | १ |
| २५. | मुकादम | ... | २,६१०–४,००० | ४,४४०–७,४४० | १,६०० | २५ |
| २६. | जलसेवक | ... | २,५५०–३,२०० | ४,४४०–७,४४० | १,३०० | १३४१ |
| | | | | | एकूण वर्ग ३ + ४ ... | १,९४५ |

# भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा

**१. यंत्रणेची रचना :–**

१.१ महाराष्ट्र शासनाने आंतरराष्ट्रीय विकास संस्थेशी (जागतिक बँक प्रकल्प) केलेल्या कृषी पत प्रकल्प कराराची परिणिती म्हणून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा १६ जुलै १९७१ पासून अस्तित्वात आली. कृषी विभाग, भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालय तसेच पाटबंधारे विभाग यांचेमार्फत करण्यात येणाऱ्या भूजल सर्वेक्षण व विकास याबाबतची कामे सदर यंत्रणेकडे सोपविण्यात आली. सुरुवातीला ही यंत्रणा भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयाचा एक घटक होता. परंतु, दिनांक १५ नोव्हेंबर १९७२ पासून ह्या यंत्रणेला शास्त्रीय तत्वावर खालील योजना कार्यान्वित करण्यासाठी संचालनालयाचा स्वतंत्र दर्जा देण्यात आला :–

(अ) भूजल विषयक सर्वेक्षण करणे.

(ब) भूजलाचे मूल्यांकन, भूजल संवर्धन, भूजल व्यवस्थापन.

१.२ भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे मुख्यालय, पुणे येथे संचालकांच्या नियंत्रणाखाली आहे. तसेच, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती व कोकण (नवी मुंबई) येथे उपसंचालकांची विभागीय कार्यालये असून, त्यांच्या नियंत्रणाखाली त्या-त्या विभागातील जिल्हे आहेत. या यंत्रणेची कार्यालये सर्व जिल्ह्यात आहेत.

१.३ भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या मुख्यालयात खालील शाखांचा समावेश आहे—

(अ) सर्वेक्षण शाखा

(ब) संशोधन व विकास कक्ष

(क) जलविज्ञान प्रकल्प विज्ञान

(ड) आवेधन शाखा

## (अ) सर्वेक्षण शाखा

**सर्वेक्षणाच्या प्रमुख योजना—**

१. सिंचन विहिरींसाठी अर्थसहाय्य बँकांची प्रकरणे
२. स्थानिक भूजल सर्वेक्षण
३. अयशस्वी सिंचन विहिरींना अनुदान
४. वाळू उत्खनन सर्वेक्षण प्रकरणे
५. आदिवासी शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर वीज पुरवठा
६. जवाहर विहीर योजना
७. शिवकालीन पाणी साठवण योजना
८. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना
९. राज्यातील टंचाई सदृष्य स्थितीचा अभ्यास

**१. सिंचन विहिरींसाठी अर्थसहाय्यक बँकांची प्रकरणे :–**

सिंचन विहिरी खोदण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि व ग्रामीण विकास बँकेमार्फत तसेच राष्ट्रीय बँकांमार्फत अर्थसहाय्य दिले जाते. विहीर खोदण्यासाठी जागा निवडीकरिता मार्गदर्शक तत्वे सर्व बँकांना कळविण्यात आली आहेत. तथापि, काही विशिष्ट क्षेत्रात पाणी उपलब्धतेबाबत खात्री नसल्यास, अशी प्रकरणे जिल्हा वरिष्ठ भू-वैज्ञानिक कार्यालयाकडे कळविली जातात. त्यानुसार प्रत्यक्ष सर्वेक्षण करून योग्यतेबाबत दाखला दिला जातो. सर्वसाधारणपणे रब्बी हंगामाअखेर विहिरींना पाणी उपलब्ध राहण्याच्या शक्यतेचा अभ्यास करून दाखले देण्यात येतात. मार्च २०१६ अखेरपर्यंत एकूण ३२,२५५ प्रकरणांचे दाखले देण्यात आले आहेत.

**२. स्थानिक भूजल सर्वेक्षण :–**

जिल्ह्यातील शासकीय, अशासकीय तसेच इतर संस्था अगर वैयक्तिकरित्या मागणी केल्याप्रमाणे प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन भूजल उपलब्धतेचा अहवाल दिला जातो. भूजल सर्वेक्षणासाठी रुपये १,०००/- व भूभौतिक सर्वेक्षणासाठी रुपये १,५००/- शुल्क आकारणी केली जाते. त्यानुसार, सन १९९२-१९९३ पासून ते मार्च २०१६ अखेरपर्यंत एकूण रुपये ४५९.२० लाख इतकी रक्कम यंत्रणेला प्राप्त झाली आहे.

३. **अयशस्वी सिंचन विहिरींना अनुदान :-**

शास्त्रीय माहितीच्या आधारे व मार्गदर्शक तत्वानुसार राज्यात सिंचन विहिरी खोदण्याचा कार्यक्रम जरी राबविण्यात येत असला तरी, राज्याची विशिष्ट भौगोलिक रचना लक्षात घेता काही सिंचन विहिरी अयशस्वी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब गृहीत धरुन अयशस्वी सिंचन विहिरींना अनुदान ही योजना कार्यान्वित आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि व ग्रामीण विकास बँक तसेच राष्ट्रीयकृत बँकांमार्फत अर्थसहाय्य झालेल्या ज्या विहिरींना निकषानुसार पाणी लागले नाही किंवा पाण्याची प्रत योग्य नाही, अशा विहिरींना प्रचलित शासन निर्णयाचे अधिन राहून विहीर खोदाईचे खर्चात सूट दिली जाते. त्यामध्ये संबंधित शेतकऱ्याने अर्ज केल्याच्या दिनांकापर्यंतचे संपूर्ण व्याज व कर्जाच्या रकमेतील खुदाईचा खर्च पूर्णपणे माफ केला जातो. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात या योजने अंतर्गत कोणतेही प्रकरण प्राप्त झाले नाही व कोणतीही आर्थिक तरतूद करण्यात आली नव्हती.

४. **वाळू उत्खनन सर्वेक्षण प्रकरणे :-**

नदीतील वाळूचे उत्खनन करतांना अस्तित्वातील भूजल स्त्रोतावर त्याचा परिणाम होतो की नाही, याबाबत जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयाकडून सर्वेक्षण करुन संबंधित जिल्हाधिकारी यांना दाखले देण्यात येतात. मार्च २०१६ अखेरपर्यत ७०,५०० प्रकरणे प्राप्त झाली त्यापैकी ६४,४९२ प्रकरणांचे सर्वेक्षण करुन ५२,६६१ प्रकरणांचे दाखले जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/२०८/प्र. क्र.-३२/ख, दिनांक २५ आक्टोबर २०१० अन्वये लिलाव झालेल्या वाळू स्थळांचे (प्रकरण) प्रत्येकी रुपये ५,०००/- याप्रमाणे सर्वेक्षण शुल्क लिलाव धारकाकडून यंत्रणेकडे जमा होते. त्यानुसार, मार्च २०१६ अखेरपर्यंत २१,३७३ प्रकरणांमध्ये एकूण रुपये ७३०.६३ लाख इतकी रक्कम जमा होणार आहे.

५. **आदिवासी शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर वीजपंप पुरवठा :-**

राज्यातील आदिवासी शेतकऱ्यांनी खोदलेल्या सिंचन विहिरींवर शासन १०० टक्के अनुदानावर वीजपंप पुरवठा करते. यासाठी भूजल उपलब्धतेसंबंधी या यंत्रणेच्या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. राज्यात एकूण १३ जिल्ह्यांमध्ये आदिवासी क्षेत्र आहे. तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील ज्या क्षेत्रात आदिवासी लोकांची वस्ती जास्त आहे, अशा क्षेत्रासाठी ओटीएसपी योजनासुद्धा कार्यान्वित आहे. माहे मार्च २०१६ अखेरपर्यंत या योजनेंतर्गत ४४,६६१ प्रकरणांचे सर्वेक्षण करुन ३९,८२७ प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत.

६. **जवाहर विहिर योजना :-**

अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी शासनामार्फत सिंचन विहिरींसाठी अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. अशा प्रकरणांमध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत भूजल सर्वेक्षण करुन प्रमाणपत्र देण्यात येते. या योजनेअंतर्गत माहे मार्च २०१६ अखेरपर्यत एकूण ३९९ प्रकरणांमध्ये प्रमाणपत्र देण्यात आली आहेत.

७. **शिवकालीन पाणी साठवण योजना/राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) :-**

पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतातून शाश्वतरित्या पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने जाहीर केलेल्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत स्त्रोत बळकटीकरण कार्यक्रमावर अधिक भर देण्यात आला आहे. राज्य शासनाने याबाबतचे आदेश व मार्गदर्शक सूचना शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००९/प्र. क्र. २०४/पापु-१५, दि. ९-२-२००९ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. राज्यात सन २०१०-११ पासून स्त्रोत बळकटीकरण कार्य जलसंधारणाच्या व भूजल पुनर्भरणाच्या पारंपारिक आणि अपारंपारिक उपाययोजना राबवून बळकटीकरण कार्यक्रमांतर्गत मार्च २०१६ अखेरपर्यंत ९,११७ गांवे/वाड्यात २३,९८४ उपाययोजना पूर्ण करण्यात आल्या असून, सदर कामांवर रुपये ३८,३८५.२२ लक्ष एवढा खर्च झाला आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत स्त्रोत बळकटीकरण उपाययोजनांकरिता रु. १२.०० लक्ष खर्चाचे मर्यादेपर्यंत लोकवर्गणीची अट लागू नाही.

८. **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अनुसूचित जाती/जमाती/अल्पभूधारक आणि सिमांत शेतकऱ्यांसाठी सिंचन विहिरींचा कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडे माहे मार्च २०१६ अखेर १,५३,१९४ प्रकरणे प्राप्त झाली. त्यापैकी १,३८,१६५ प्रकरणांमध्ये प्रमाणपत्र देण्यात आली आहेत.

९. **राज्यातील टंचाई सदृष्य स्थितीचा अभ्यास :-**

दरवर्षी राज्यात माहे ऑक्टोबर अखेर झालेले पर्जन्यमान आणि निरीक्षण विहिरीतील भूजल स्थिर पातळी याचा अभ्यास करुन संभाव्य टंचाई अहवाल जिल्हा वरिष्ट भूवैज्ञानिक यांचेमार्फत तयार करुन सदर अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर केला जातो. या अहवालानुसार माहे ऑक्टोबर ते जून या कालावधीतील टप्पानिहाय (ऑक्टोबरपासून, जानेवारीपासून, एप्रिल ते जून) संभाव्य टंचाई भासणारी गांवे/वाड्यांची यादी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात येते.

राज्यात पाणी टंचाई काळात भूजलावरच अवलंबून राहावे लागते. अशावेळी पिण्याच्या पाण्यासाठी किमान भूजल उपलब्ध करुन देता यावे, यासाठी विशिष्ट कालावधीकरिता जिल्हा प्राधिकरणामार्फत पाणी टंचाई क्षेत्र घोषित करण्याची महाराष्ट्र भूजल (विकास व्यवस्थापन) अधिनियम २००९ मधील कलम २५ नुसार तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच त्या काळात सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत संरक्षित करणे व स्त्रोताच्या प्रभाव क्षेत्रात अथवा १ कि. मी. परिसरात.(जे जास्त असेल) अस्तित्वात असलेल्या विहिरींचा उपसा नियंत्रीत करणे अथवा तात्पुरत्या स्वरुपात बंदीची कलम २६ नुसार तरतूद करण्यात आली आहे.

## (ब) संशोधन व विकास कक्ष

**१) भूजल उपलब्धता :—**

भौगोलिक परिस्थिती व भूपृष्ठीयस्थितीच्या आधारे राज्यातील संपूर्ण भूभागाची प्राथमिक स्वरुपाची विभागणी १५३१ पाणलोट क्षेत्रात करण्यात आलेली आहे. ही पाणलोट क्षेत्रे १५ नद्यांच्या उपखोऱ्यांत विभागण्यात आलेली असून, भूजल मूल्यांकन पाणलोट क्षेत्र संकल्पनेवरच करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार प्रत्येक पाणलोट क्षेत्रातील भूजलाचे वार्षिक पुनर्भरण व उपसा, या बाबींचा अभ्यास करून भूजलाचा अंदाज बांधण्यात येतो. भारत सरकारच्या भूजल अंदाज समिती १९९७ च्या मार्गदर्शक तत्वांनुसार वर्ष २०११-२०१२ मध्ये बांधण्यात आलेल्या भूजल अंदाजानुसार १५३१ पाणलोट क्षेत्रांपैकी ७६ पाणलोट क्षेत्रे अतिविकसित (Over Exploited), ०४ विकसित (Critical ) व १०० अंशतः विकसित (Semi Critical) या वर्गवारीत मोडतात. भूजल अंदाजाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे—

| | | |
|---|---|---|
| १. | राज्यात भूजल मूल्यांकनासाठी विचारात घेण्यात आलेले जिल्हे ... ... ... | ३३ |
| २. | राज्यातील एकूण पाणलोट क्षेत्रांची संख्या ... ... ... | १५३१ |
| ३. | राज्यातील एकूण तालुके ... ... ... | ३५३ |
| ४. | निव्वळ वार्षिक उपलब्धी (दशलक्ष घन मीटर) ... ... ... | ३२१५० |
| ५. | एकूण वार्षिक उपसा (दशलक्ष घन मीटर) ... ... ... | १७१८० |
| ६. | सिंचनासाठी वार्षिक भूजल उपसा (दशलक्ष घन मीटर) ... ... ... | १६१५० |
| ७. | अस्तित्वातील सिंचन विहिरींची संख्या ... ... ... | १९०१४७१ |
| ८. | अस्तित्वातील सिंचनासाठी वापरात असलेल्या विहिरींची संख्या... ... ... (१०० टक्के उपसा होत आलेले मान्सूनपूर्व/मान्सूनोत्तर पाणी पातळीपैकी एकाचा घटता कल) | २०५६८५ |
| ९. | शोषित पाणलोट क्षेत्र ... ... ... (९० ते १०० टक्के उपसा व पाणी पातळीचा घटता कल) | ०४ |
| १०. | अंशतः शोषित पाणलोट क्षेत्रे ... ... ... (७० ते १०० टक्के उपसा होत असलेले मान्सूनपूर्व/मान्सूनोत्तर पाणी पातळीपैकी एकाचा घटता कल) | १०० |
| ११. | सुरक्षित पाणलोट क्षेत्रे (७० टक्के पेक्षा कमी उपसा असलेले) ... ... | १३४७ |
| १२. | निकृष्ट गुणवत्ता असलेले पाणलोट क्षेत्रे ... ... ... | ०४ |
| १३. | भूजल उपसाची टक्केवारी ... ... ... | ५०.४३ टक्के |

**२) जलधर मानचित्रण (Aquifer Mapping) :—**

भूजल नियोजन व व्यवस्थापनासाठी जलधर (Aquifer) हेच एकमेव शास्त्रीय एकक आहे. जलधारक खडक म्हणजे, पाणी धारण करणारा व विहिरी/झऱ्यांच्या माध्यमातून भूजल स्वरुपात ते उपलब्ध करून देणारा. भूजल व्यवस्थापनात भूजल पुनर्भरण व भूजल उपसा यांच्यात समतोल साधणे गरजेचे असल्याने जलधर मानचित्रण (Aquifer Mapping) हा त्याचा अविभाज्य घटक आहे. जलधराची व्याप्ती वेगवेगळ्या भागात वेगवेगळी असून त्यातील भूजलाची उपलब्धतादेखील वेगळी असते. महाराष्ट्रात जलधर निर्धारण व लोकसहभागातून व्यवस्थापन प्रकल्प शास्त्रीय आधारावर करण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाअंतर्गत सातारा, जालना व बीड जिल्ह्यात पथदर्शी प्रकल्प २००५ ते २०१३ या कालावधीत पूर्ण केले असून, त्याच तत्वावर जागतिक बँक पुरस्कृत जलस्वराज्य कार्यक्रमांतर्गत व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे.

**३) जलस्वराज्य-२ :-**

राज्यातील जागतिक बँक अर्थसहाय्याने जलस्वराज्य-२ कार्यक्रमाची अंमलबजावणी दिनांक १-४-२०१४ पासून करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाचा कालावधी ६ वर्षाचा असून कार्यक्रम २०१४ ते २०२० या कालावधीत राबविण्यात येणार आहे. कार्यक्रमांतर्गत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत राज्यात ६ प्रकल्प राबविणेत येत आहे.

१) जलधर निर्धारण व लोकसहभागातून भूजल व्यवस्थापन–अहमदनगर, जळगाव, पुणे, सातारा, बुलढाणा, अमरावती व औरंगाबाद या सात जिल्ह्यातील २७० गावांचा समावेश.

२) गुणवत्ता बाधीत गावे हाताळणे–अहमदनगर, जळगाव, पुणे, सातारा, बुलढाणा, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, रायगड, रत्नागिरी, नांदेड व औरंगाबाद या १२ जिल्ह्यातील ३३० गावांचा समावेश.

३) निरीक्षण विहिरींचे जाळे वाढविणे–राज्यातील ३४ जिल्ह्यातील तांत्रिकदृष्ट्या योग्य सर्व गावांत निरीक्षण विहिर निश्चित करणे.

४) वेळ सापेक्ष आधार सामुग्री संनियंत्रण–औरंगाबाद व चंद्रपूर या दोन जिल्ह्यात लोकसहभागातून भूजल पातळी मोजमाप करून संभाव्य पाणी टंचाईचे अनुमान वर्तविणे.

५) जलवेधशाळा बळकटीकरण–अस्तित्वातील जलवेधशाळांचे बळकटीकरण व नवीन जलवेधशाळा स्थापित करणे.

६) प्रयोगशाळा बळकटीकरण–सहा विभागीय प्रयोगशाळांचे बळकटीकरण.

(रु. लाखात)

| वर्ष | २०१४-२०१५ (प्रत्यक्ष) | २०१५-२०१६ (अपेक्षित) | २०१६-२०१७ (अंदाजित) |
|---|---|---|---|
| खर्च | ६३.४३ | ७५०.०० | २०००.०० |

**४) रासायनिक पृथ:करण :—**

भूजलाचे रासायनिक व जैविक गुणवत्ता यांचे पृथ:करण करण्यासाठी प्रत्येक विभागात एक प्रयोगशाळा कार्यान्वित आहे. तसेच, दिनांक १८-१२-२०१४ च्या शासन निर्णयाद्वारे आरोग्य विभागाच्या १३८ उपविभागाच्या प्रयोगशाळा भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडे हस्तांतरीत झाल्या आहेत. सर्व प्रयोगशाळात मार्च २०१६ अखेर एकूण ४,३४,८५७ नमुन्यांचे रासायनिक व जैविक पृथ:करण करण्यात आलेले आहे.

जलविज्ञान प्रकल्प टप्पा-१ अंतर्गत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेव्दारे सल्ला तत्वावर आधारित योजना सुरु केल्यानंतर खाजगी संस्था/व्यक्ती यांना देखील शासनाव्दारे निश्चित केलेल्या दराने पाण्याचे रासायनिक पृथ:करण करून घेणे शक्य होणार आहे. त्यामुळे विभागाला महसूल प्राप्त होत असून, सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात जमा झालेला महसूल व २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात अपेक्षित महसूल खालीलप्रमाणे आहे.

(रु. लाखात)

| वर्ष | | |
|---|---|---|
| २०१५-२०१६ (प्रत्यक्ष) | २०१६-२०१७ (अपेक्षित) | २०१६-२०१७ (अंदाजित) |
| १.२६ | ३.०० | ३.०० |

**५) जलवेधशाळा :—**

राज्यात वेगवेगळ्या कृषी हवामान क्षेत्रात व प्रातिनिधिक भूगर्भीयस्थिती असणाऱ्या क्षेत्रातील जलशास्त्रीय व भूजलशास्त्रीय परिमाणांची प्रत्यक्ष मोजणी करून, विविध निष्कर्ष काढण्यासाठी व त्यानुसार भूजल अंदाजासाठीचे निकष निश्चित करण्यासाठी १९७४ साली ८ व तद्नंतर २ अशा एकूण १० जलवेधशाळांची स्थापना करण्यात आली असून, तेथे जलशास्त्रीय व भूजल शास्त्रीय परिमाणांची मोजणी दरवर्षी करण्यात येते.

**६) महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन)-अधिनियम २००९ :–**

पुरवठा व मागणी व्यवस्थापन उपाययोजनामार्फत वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गाकरिता विहित दर्जाच्या भूजलाचा कायम, समन्यायी आणि पुरेसा पुरवठा सुकर करणे आणि त्याची खातरजमा करणे, सार्वजनिक पिण्याच्या स्त्रोतांचे जतन करणे आणि महाराष्ट्र राज्यात भूजलाच्या समुपयोजनांचे सामुहिक सहभागाने व्यवस्थापन व विनियमन करण्यासाठी राज्य भूजल प्राधिकरण आणि जिल्हास्तरीय प्राधिकरणे स्थापन करणे, त्यांच्याशी संबंधीत व अनुषंगाने बाबींची तरतूद करणे या सर्वंकष प्रयोजनास्तव महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-४ दिनांक ३ डिसेंबर २०१३ (२०१३ चा अधिनियम क्र. २६) अन्वये अधिसूचना जारी होऊन महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ हा कायदा, दिनांक १ जून २०१४ पासून राज्यात लागू झालेला आहे.

सदर अधिनियमाअंतर्गत भूजलाचा विकास, व्यवस्थापन व विनियमन करण्याकरिता **त्रिस्तरीय व्यवस्था** निर्माण करण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्यस्तरावर मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली राज्य पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती याप्रमाणे समित्यांची व्यवस्था असणार आहे. अंमलबजावणी योग्यरितीने व्हावी यासाठी राज्यस्तरावर राज्य भूजल, जिल्हास्तरावर महसूल विभागाच्या सर्व प्रांत अधिकाऱ्यांना जिल्हा प्राधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र भूजल विकास व व्यवस्थापन अधिनियम २००९ च्या प्रभावी अंमलबजावणीकरिता तांत्रिक समन्वयाची जबाबदारी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेवर सोपविण्यात आली असून, यंत्रणेस खालील महत्वाच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

१) मूळ पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर शोधून काढणे व त्यांचा आराखडा करणे.

२) सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे प्रभाव क्षेत्र शोधणे व त्याचा आराखडा तयार करणे.

३) भूजल वापर योजना तयार करणे.

४) एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना तयार करणे.

५) सर्व स्तरीय समित्यांना तांत्रिक सहाय्य करणे.

उपरोक्त सर्व स्तरीय समित्या व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे अधिनियमाअंतर्गत सोपविण्यात आलेली कार्य पार पाडण्यासाठी राज्य शासन आवश्यकतेनुसार भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेला अनुदान व आगाऊ रकमा उपलब्ध करून देतील अशी तरतूद आहे. या अधिनियमाच्या अंमलबजावणीकरिता विविधस्तरावर झालेला व होणारा खर्च खालीलप्रमाणे आहे :–

(रु. लाखात)

| वर्ष | २०१४-२०१५ (प्रत्यक्ष) | २०१५-२०१६ (अपेक्षित) | २०१६-२०१७ (अंदाजित) |
|---|---|---|---|
| खर्च | ... | १६.६० | ५८०.०० |

## (क) आवेधन शाखा

### राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (National Rural Drinking Water Programme)

**१. पारंपारिक विद्युत ऊर्जेवर आधारित दुहेरी पंप योजना**

राज्याचा ८५ टक्के ग्रामीण पाणी पुरवठा हा भूजलावर अवलंबून आहे. त्यामुळे विंधण विहिरीवर हातपंप हा ग्रामीण पाणी पुरवठ्याचा फार महत्वाचा घटक आहे. या पंपाने पाणी उपसण्यामध्ये लागणारे कष्ट, उन्हाळ्यात पाणी पातळी खोल गेल्यावर जड चालणारे हातपंप, पाणी आणण्यासाठी हातपंपापर्यंत जावे लागणे, भरलेले पाण्याचे हांडे डोक्यावरून आणणे, हातपंपाभोवती उन्हातान्हात थांबून राहणे, ग्रामीण जनतेच्या ह्या सर्व प्रश्नांचा विचार करून भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने दुहेरी पंपावर आधारित नळ पाणी पुरवठा योजना विकसित केली आहे. यामध्ये किमान २००० लि./तास क्षमता असलेल्या व हातपंप असलेल्या विंधन विहिरीमध्ये अत्यंत कमी अश्वशक्तीचा सिंगल फेजचा सबमर्सिबल पंप बसवून ५००० लिटर क्षमतेच्या टाकीत पाणी साठवून नजिकच्या सर्व घरामध्ये नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. एकाच विंधन विहिरीत हातपंप व विद्युत पंपाची उभारणी केली असल्याने हातपंप नादुरुस्त झाल्यास विद्युत पंपाद्वारे किंवा विद्युत पंप नादुरुस्त झाल्यास हातपंपाद्वारे अव्याहतपणे पाणी पुरवठा उपलब्ध राहतो.

या योजनेकरिता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व्याप्ती अंतर्गत अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. सदर योजना राबविण्याकरिता रु. २.५० लक्ष एवढी खर्च मर्यादा आहे.

या योजना शासन निर्णय क्रमांक ग्रापापु ५३१०/प्र.क्र. ०४/पापु १५, दिनांक २९-१२-२०११ व शासन शुध्दीपत्रक दिनांक १७-१०-२०१२ व २४-७-२०१५ अन्वये राबविण्यात येत आहेत.

या योजना वर्ष २००८-०९ पासून राबविण्यात येत असून, वर्ष २०१५-१६ पर्यंत (मार्च २०१६) अशा २९१५ योजना राज्यात राबविण्यात आल्या आहेत. वर्ष २०१६-१७ मध्ये निरंक योजना प्रस्तावित आहेत.

**२. सौर उर्जेवर आधारित दुहेरी पंप योजना**

ज्या वाड्या/वस्त्यांजवळ विद्यूत पुरवठा उपलब्ध नाही, विद्यूत पुरवठा घेणे किफायतशीर नाही, तसेच ज्या ठिकाणचा विद्युत पुरवठा शाश्वत नाही, ज्या वाड्या/वस्त्या पिण्याच्या पाण्याकरिता केवळ हातपंपावरच अवलंबून आहेत अशा वाड्या/वस्त्यांकरिता ही अत्यंत उपयुक्त योजना आहे. या योजनेमध्ये विंधन विहिरीवर हातपंपासमवेत सौर पंपाची उभारणी करण्यात येते. सौर उर्जा पंपाचा उत्सर्ग साठवण टाकीत साठवून पाईप लाईन द्वारे घरोघरी पाणी पुरवठा करण्यात येतो. एकाच विंधन विहिरीत हातपंप व सौर पंपाची उभारणी केली असल्याने, हातपंप नादुरुस्त झाल्यास, सौर पंपाद्वारे किंवा सौर पंप नादुरुस्त झाल्यास, हात पंपाद्वारे अव्याहतपणे पाणी पुरवठा सुरु राहतो. सदर योजना सौर उर्जेवर आधारित असल्याने विद्युतभाराचा खर्च "निरंक" आहे. या योजनेची देखभाल दुरुस्ती अत्यंत सुलभ आहे.

*या योजनांकरिता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. सदर योजना राबविण्याकरिता रु. ५.१० लक्ष एवढी खर्च मर्यादा आहे.

*या योजना शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु-५३१०/प्रक्र. २१७/पापु-१५, दि. २९-१२-२०११ व शुध्दीपत्रक क्र. ग्रापापु-५३१०/प्रक्र. २१७/पापु-१५, दि. १७-१०-२०१२ अन्वये राबविण्यात येत आहे.

*या योजना वर्ष २००९-१० पासून राबविण्यात येत असून, वर्ष २०१५-१६ (मार्च २०१६) पर्यंत अशा ३,३८९ योजना राज्यात राबविण्यात आल्या आहेत. वर्ष २०१६-१७ मध्ये एकूण २,५०४ योजना मंजूर असून, १००० योजना पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

**३. झऱ्यावर आधारित लघु नळ पाणी पुरवठा योजना-**

बऱ्याच अति दुर्गम डोंगरी भागात नैसर्गिक झरे वाहतात अशा नैसर्गिक झऱ्या जवळील वाड्या/ वस्त्यांना वाहणाऱ्या झऱ्याचे पाणी पाईप लाईनद्वारे वस्तीजवळील टाकीत संकलित करून वस्तीस पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येते. डोंगराळ भागातील ज्या वाड्या/वस्त्यांजवळ नैसर्गिक झरे उपलब्ध आहेत अशा वाड्या/वस्त्यांकरिता ही अतिशय उपयुक्त योजना आहे.

या योजनेकरिता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा अंतर्गत अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. सदर योजना राबविण्याकरिता रु. १०.०० लक्ष एवढी खर्च मर्यादा आहे.

ही योजना शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. आपना-१०१०/प्रक्र. ५०/पापु-१५, दि. २०-२-२०१० व शुध्दीपत्रक क्र. आपना-१०१०/ प्रक्र. ५०/पापु-१५,दि. १७-१०-२०१२ अन्वये राबविण्यात येत आहे.

ही योजना वर्ष २००९-१० पासून राबविण्यात येत असून वर्ष २०१५-१६ पर्यंत अशा १४९ योजना राज्यात राबविण्यात आल्या आहेत.

तक्ता क्र. १८

## संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील कर्मचारीविषयक गोषवारा

| अनुक्रमांक | पदनाम | वेतनबँड | ग्रेड वेतन | एकूण मंजूर पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **राजपत्रित गट--अ** | | | |
| १. | संचालक ... ... | संवर्ग पद | ... | १ |
| २. | अतिरिक्त संचालक ... ... | ३७,४००–६७,००० | ८,७०० | १ |
| ३. | सहसंचालक ... ... | १५,६००–३९,१०० | ७,६०० | २ |
| ४. | सहसंचालक (अभियांत्रिकी) ... ... | १५,६००–३९,१०० | ७,६०० | १ |
| ५. | उपसंचालक ... ... | १५,६००–३९,१०० | ६,६०० | ८ |
| ६. | मुख्य खोदन अभियंता ... ... | १५,६००–३९,१०० | ६,६०० | २ |
| ७. | मुख्य भूभौतिकतज्ञ ... ... | १५,६००–३९,१०० | ६,६०० | १ |
| ८. | वरिष्ठ भूवैज्ञानिक ... ... | १५,६००–३९,१०० | ५,४०० | ५३ |
| ९. | वरिष्ठ खोदन अभियंता ... ... | १५,६००–३९,१०० | ५,७०० | ७ |
| १०. | वरिष्ठ भूभौतिकतज्ञ ... ... | १५,६००–३९,१०० | ५,४०० | ६ |
| ११. | प्रशासन अधिकारी ... ... | १५,६००–३९,१०० | ५,४०० | १ |
| १२. | सहायक संचालक (मविवलेसे) ... ... | १५,६००–३९,१०० | ५,४०० | १ |
| १३. | वरिष्ठ रसायनी ... ... | १५,६००–३९,१०० | ५,४०० | १ |
| १४. | उपअभियंता (यांत्रिकी) ... ... | १५,६००–३९,१०० | ५,४०० | ८ |
| | | | एकूण ... | ९३ |
| | **राजपत्रित गट--ब** | | | |
| १५. | सहायक भू-भौतिकतज्ञ ... ... | ९,३००–३४,८०० | ४,५०० | ७ |
| १६. | सहायक भूवैज्ञानिक ... ... | ९,३००–३४,८०० | ४,९०० | ७९ |
| १७. | नियोजन अधिकारी ... ... | ९,३००–३४,८०० | ४,४०० | १ |
| १८. | सहायक अभियंता (स्थापत्य) ... ... | ९,३००–३४,८०० | ४,४०० | १ |
| १९. | सहायक रसायनी ... ... | ९,३००–३४,८०० | ४,५०० | ६ |
| २०. | सहायक प्रशासन अधिकारी ... ... | ९,३००–३४,८०० | ४,४०० | ६ |
| २१. | लेखा अधिकारी ... ... | ९,३००–३४,८०० | ४,४०० | ७ |
| २२. | कनिष्ठ भूवैज्ञानिक ... ... | ९,३००–३४,८०० | ४,५०० | ११९ |
| २३. | सिस्टीम ॲनालिस्ट ... ... | ९,३००–३४,८०० | ४,५०० | १ |
| | | | एकूण ... | २२७ |
| | **अराजपत्रित गट--क** | | | |
| २४. | कनिष्ठ भू-भौतिकतज्ञ ... ... | ९,३००–३४,८०० | ४,४०० | ६ |
| २५. | कनिष्ठ रसायनी ... ... | ९,३००–३४,८०० | ४,४०० | १२ |
| २६. | वरिष्ठ सांख्यिकी सहायक ... | ९,३००–३४,८०० | ४,३०० | ८ |
| २७. | उच्च श्रेणी लघुलेखक ... ... | ९,३००–३४,८०० | ४,४०० | २ |
| २८. | उपलेखापाल ... ... | ९,३००–३४,८०० | ४,२०० | ४२ |
| २९. | तांत्रिक अधिकारी ... ... | ९,३००–३४,८०० | ४,२०० | ४१ |

तक्ता क्र. १८–(चालू)

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ३०. | लघुलेखक (निम्नश्रेणी) ... ... | ९,३००–३४,८०० | ४,३०० | १२ |
| ३१. | कार्यालय अधीक्षक ... ... | ९,३००–३४,८०० | ४,२०० | ४ |
| ३२. | कनिष्ठ अभियंता ... ... | ९,३००–३४,८०० | ४,३०० | ४१ |
| ३३. | प्रोग्रामर ... ... | ९,३००–३४,८०० | ४,३०० | १ |
| ३४. | सर्वेक्षक ... ... | ५,२००–२०,२०० | २,४०० | ६० |
| ३५. | यांत्रिकी ... ... | ५,२००–२०,२०० | २,४०० | ६१ |
| ३६. | भौगो. माहि. प्रणाली अधिकारी... ... | ९,३००–३४,८०० | ४,४०० | ७ |
| ३७. | भौगो. माहि. प्रणाली वरिष्ठ सहायक ... | ५,२००–२०,२०० | २,८०० | ४० |
| | (४ वर्षानंतर) | ९,३००–३४,८०० | ४,३०० | |
| ३८. | रोखपाल ... ... | ५,२००–२०,२०० | २,४०० | १ |
| ३९. | वरिष्ठ लिपिक ... ... | ५,२००–२०,२०० | २,४०० | ५१ |
| ४०. | लघुटंकलेखक ... ... | ५,२००–२०,२०० | २,४०० | ११ |
| ४१. | सहायक आवेदक ... ... | ५,२००–२०,२०० | २,४०० | ३० |
| ४२. | दोरखंडवाला (रिंगमन) ... ... | ५,२००–२०,२०० | २,००० | १६ |
| ४३. | भौगो. माहि. प्रणाली सहायक ... ... | ५,२००–२०,२०० | २,००० | ५७ |
| | | (७ वर्षानंतर) | २,४०० | |
| ४४. | दूरध्वनी चालक ... ... | ५,२००–२०,२०० | २,००० | १ |
| ४५. | कनिष्ठ लिपिक ... ... | ५,२००–२०,२०० | १,९०० | १०४ |
| ४६. | वाहन चालक ... ... | ५,२००–२०,२०० | १,९०० | १८४ |
| ४७. | प्रयोगशाळा सहायक ... ... | ५,२००–२०,२०० | १,९०० | ६ |
| ४८. | वेल्डर कम ड्रायव्हर ... ... | ५,२००–२०,२०० | २,००० | ६ |
| | | | एकूण ... | ८०३ |
| | **गट–ड** | | | |
| ४९. | नाईक ... ... | ४,४४०–७,४४० | १,६०० | १४ |
| ५०. | शिपाई ... ... | ४,४४०–७,४४० | १,३०० | ११३ |
| ५१. | पहारेकरी ... ... | ४,४४०–७,४४० | १,३०० | ९९ |
| ५२. | मदतनीस ... ... | ४,४४०–७,४४० | १,३०० | २४ |
| | | | एकूण ... | २५० |
| | | **गोषवारा–** | | |
| | | | **राजपत्रित गट–अ** ... | ९३ |
| | | | **राजपत्रित गट–ब** ... | २२७ |
| | | | **अराजपत्रित गट–क** ... | ८१३ |
| | | | **अराजपत्रित गट–ड** ... | २५० |
| | | | एकूण ... | १,३८३ |

**टिप**-उपअभियंता (यां.) या संवर्गात ३३ पदे, सहायक भूवैज्ञानिक गट-ब या संवर्गातील ३३ पदे, कनिष्ठ भूवैज्ञानिक गट-ब या सवंर्गातील ६६ पदे अशी एकूण १३२ पदे ३३ जिल्हापरिषदेकडे कार्यरत असून त्यांचे वेतन व भत्ते ज्या त्या जिल्हापरिषदेमधून आहंरित व वितरीत करण्यात येतात. सदर १३२ अधिकाऱ्यांची आस्थापना विषयक कामे शासन/सचांलनालयामार्फत करण्यात येतात.

मकामुना (एच-११४३)—३-२०१७—७०० पु.—पीए४*